न्या. मा. गो. रानडे यांनी दिलेली

# व्यापारासंबंधी व्याख्यानें

[ १८७२-७३ ]

प्रस्तावना : वी. वि. सोवनी

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४.

गोखले अर्थशास्त्र संस्था मराठी प्रकाशन १० वें

© गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४

१९६३

किंमत १-५०

प्रकाशक : ध. रा. गाडगीळ, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४
मुद्रक : द. वा. आंबेकर, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५ शिवाजीनगर, पुणे ४
वितरक : दि बुक सेंटर प्रायव्हेट लिमिटेड, रानडे रोड, मुंबई २८

## अनुक्रमणिका

प्रस्तावना : ले. नी. वि. सोवनी : एक

न्यायमूर्ति मा. गो. रानडे यांचीं
व्यापारसंबंधी व्याख्यानें

व्याख्यान पहिलें : : : : : १

व्याख्यान दुसरें : : : : : १९

परिशिष्ट : : : : : : ६५

# प्रस्तावना

प्रस्तुत प्रकाशन हें पुनर्मुद्रणाच्या स्वरूपाचें आहे. न्यायमूर्ति रानडे यांनी पुणें येथे फडतरे यांच्या वाड्यांत ८ डिसेंबर १८७२ रोजीं व विश्रामबागचे वाड्यांत २२ फेब्रुवारी १८७३ रोजीं हिंदुस्थानच्या व्यापारासंबंधी दोन व्याख्यानें दिलीं. तीं त्या वेळीं 'लोककल्याणेच्छु' वर्तमानपत्रांत आलीं होतीं. त्या पत्राचे व्यवस्थापक वि. बा. दामले यांनी तीं रानडे यांच्याकडून शुद्ध करून घेऊन पुस्तकरूपाने ऑगस्ट १८७३ मध्ये छापून प्रसिद्ध केलीं होतीं. त्यांचें पुनर्मुद्रण करून या प्रस्तावनेसह तीं येथें प्रसिद्ध केलीं आहेत.

न्यायमूर्ति रानडे यांचें अर्थशास्त्रविषयक लिखाण जरी विपुल असलें तरी तें बहुतेक इंग्रजींत आहे. त्यांचें मराठींतील अर्थशास्त्रीय लिखाण, हीं व्याख्यानें हें एकमेवच असावें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. दाते यांच्या ग्रंथसूचींतहि या पुस्तकाव्यतिरिक्त रानडे यांनी मराठींत अर्थशास्त्रावर लिहिलेल्या पुस्तकाची नोंद नाही. त्यांच्या आगामी लेखसूचीसंबंधी त्यांच्याकडे चौकशी करतां त्यांतहि रानडे यांचे मराठींत लिहिलेले अर्थशास्त्रीय विषयावरील लेख आढळत नाहीत असें कळलें. यासाठीच हें त्यांचें आर्थिक प्रश्नांवरील मराठी भाषेंतील एकमेव लिखाण आहे असें वर म्हटलें आहे.

हें पुस्तक छापल्याला आतां जवळजवळ ९० वर्षें झालीं व तें दुर्मीळ या सदरांतच घालावयास हरकत नाही. प्रा. न. र. फाटक यांनी लिहिलेल्या न्यायमूर्तींच्या चरित्रांत या व्याख्यानांचे विस्तृत उतारे दिले आहेत. परंतु तीं पुस्तकरूपाने दुर्मीळच आहेत. वाडिया कॉलेजांतील अर्थशास्त्राचे व्याख्याते श्री. नूलकर यांच्याजवळ या पुस्तकाची एक प्रत होती. तिचें अस्तित्व आम्हांला प्रथम त्यांच्याकडून समजलें. ती त्यांनी आम्हांला दिल्यावर ती छापून पुनर्मुद्रित करावी असें आम्हीं ठरविलें व त्याप्रमाणें तीं येथे प्रसिद्ध होत आहेत.

एक दुर्मीळ पण मूल्यवान पुस्तक नव्याने प्रसिद्ध करावें हा या प्रकाशनाचा एक हेतु. परंतु याशिवाय या पुस्तकाचें आणखीहि महत्त्व आहे. न्यायमूर्तींच्या अर्थशास्त्रीय विचारांचा विकास कसा झाला या दृष्टीने या पुस्तकाचें फार महत्त्व आहे. हीं व्याख्यानें दिलीं त्यावेळीं रानडे २९-३० वर्षांचे म्हणजे ऐन उमेदींत होते. त्यांचें इंग्रजीमधील अर्थशास्त्रीय लिखाण हें बऱ्याच पुढच्या काळांतील

आहे. त्यांचे बहुतेक इंग्रजी लेख १८९० ते १८९३ या काळांतलेच आहेत. दोन तीनच १८८० ते १८९० च्या दरम्यान लिहिलेले आढळतात. माणसांना मतें आणि मिशा जरी बरोबरच फुटत असल्या तरी मतांचा रंग व मिशांच्या केसांचा रंगहि पुष्कळ वेळां एकमेकांबरोबरच बदलतात असें आढळतें. या दृष्टीने हीं व्याख्यानें तपासलीं तर "हिंदुस्थानला इंग्रजी राज्यामुळें द्यावी लागणारी खंडणी" या विषयावर त्यांचीं आधींचीं मतें व त्यानंतरच्या लिखाणांत व्यक्त झालेलीं मतें यांच्यावर उत्तम प्रकाश पडतो. सर्वच तरुण माणसांप्रमाणें रानडे यांचीं या विषयावरील या प्रकाशनांत व्यक्त झालेलीं मतें थोडीं फार एकांगीं होतीं हें त्यांच्या त्या संबंधी पुढें व्यक्त झालेल्या मतांवरून उघड होतें. पोक्त विचाराबद्दल रानडे यांचा लौकिक होता पण तो त्यांच्या पोक्त वयांतील लिखाणावरून झालेला. त्यांच्या तरुणपणीं रानडे इतके पोक्त विचाराचे नव्हते हें या व्याख्यानांवरून लक्षांत येतें.

हीं दोन व्याख्यानें रानडे यांनी ८ डिसेंबर १८७२ व २२ फेब्रुवारी १८७३ या दिवशीं दिलेलीं आहेत. दोन व्याख्यानांच्या दरम्यान अडीच महिन्याचा काळ गेला. तथापि विवेचनाचें सूत्र पहिल्या व्याख्यानांतून दुसऱ्या व्याख्यानांत सलग नेलेलें आहे. त्यावरून या दोन व्याख्यानांत सांगावयाचा विषय एकसंध असा तयार करून अगर योजून न्यायमूर्तींनी वेळेच्या सोईप्रमाणे या दोन निरनिराळ्या व्याख्यानांत मांडला असावा.

हिंदुस्थानांतील द्रव्यसंपत्ति लोक ज्या मानानें उद्योग करतात त्या मानाने कां वाढत नाही ? या प्रश्नाचा विचार या दोन व्याख्यानांत मुख्यतः केला आहे. याचीं दोन कारणें सांगितलीं आहेत. (१) आपला देश परकीय सत्तेखाली आहे (२) येथे कलाकौशल्य अगर उद्योगधंदे पाहिजेत तितके वाढवण्याजोगें आपणांपाशी साधन नाही. हें साधन म्हणजे आपल्या उत्पन्नांतील बचतींतून करावयाची भांडवलाची गुंतवणूक होय. ही बचत पाहिजे तितकी न होण्याचीं कारणें : (अ) आपल्या बचतींतून आपल्याला दरवर्षी इंग्लंडला खंडणी द्यावी लागते. (आ) आपल्या बचतींतील बराचसा भाग आपण चांदीसोन्यांत दागिन्यांसाठी गुंतवून फुकट घालवितों. यामुळे आपला परदेशस्थ व्यापार जरी अलीकडे खूप वाढला आहे तरी तो फारसा फायद्याचा होत नाहीं हें न्यायमूर्तींनी विस्तारेकरून चर्चिलें आहे. यांत सुधारणा व्हावयाची असेल तर आपल्या जेवढ्या बचतीचा अनुत्पादक उपयोग होतो तेवढी बचत आपण आणखी करून

भरून काढली पाहिजे व ती व्यापारविषयक उद्योगांत गुंतविली पाहिजे. थोडी ज्यास्त किंमत पडली तरी आपल्या देशांत तयार होणाऱ्या वस्तूच घ्यावयाची आपण तयारी ठेवली पाहिजे. इंग्लंडशिवाय इतर देशांशीं जो आपला व्यापार वाढत आहे तो आणखी वाढवण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. परदेशी मालावर इतर देशांच्याप्रमाणे संरक्षक जकाती ठेवण्याचाहि विचार झाला पाहिजे असे विचार न्यायमूर्तींनी येथे मांडले आहेत.

या विवेचनांतील बहुतेक मुद्दे न्यायमूर्तींच्या नंतरच्या लिखाणांतहि सांपडतील. परंतु या व्याख्यानांत त्यांनी ज्या विशिष्ट मुद्यांवर जोर दिला आहे तो नवीन आहे. हिंदुस्थानला जी खंडणी इंग्लंडला दरवर्षी द्यावी लागते त्या संबंधींचें न्यायमूर्तींचें विवेचन त्यांच्या नंतरच्या इंग्रजी लेखांत पुष्कळच मवाळ व पोक्तपणाचें आहे आणि त्या मुद्यांवर त्यांनी पुढे फारसा भरहि दिलेला आढळत नाहीं. त्यांच्या पक्व बुद्धीला हें विवेचन फारसें मान्य नसावें असा यावरून ग्रह होतो. या व्याख्यानांतील या संबंधींचें विवेचन विशेष ठसठशीत असून त्याला न्यायमूर्तींनी पुष्कळच प्राधान्य दिलें आहे. खंडणीसंबंधी तोपर्यंत प्रसिद्ध झालेल्या चर्चेचा त्या वेळीं न्यायमूर्तींच्या मनावर बराच पगडा बसला होता असें मानतां येईल. या सर्वांचा नीट उलगडा व्हावा म्हणून या संबंधींच्या वादविवादाची पार्श्वभूमि प्रथम सांगितली म्हणजे न्यायमूर्तींच्या एतद्विषयक विवेचनाचें महत्त्व व मूल्यमापन योग्य रीतीने करणें शक्य होईल.

ईस्ट इंडिया कंपनी मुख्यतः हिंदुस्थान वगैरे पौर्वात्य देशांशी व्यापार करण्याच्या उद्देशाने १६०० सालीं स्थापन झाली. १८ व्या शतकाच्या मध्यापासून तिचें व्यापारी स्वरूप बदलावयास लागून तिला एका राजकीय शक्तीचें स्वरूप अधिकाधिक येऊं लागलें. इंग्लंडच्या पार्लमेन्टकडूनहि तिच्या स्वरूपावर व कारभारावर दर वीस वर्षांनीं निरनिराळीं नियंत्रणें घालण्यास सुरुवात झाली. जसजसा हिंदुस्थानांतील प्रदेश कंपनीच्या अधिराज्याखाली येऊं लागला तसतसें तिचें व्यापारी स्वरूप व कारभार कमी करणें आवश्यक झालें. पार्लमेंटनें या बाबतींत बराच पुढाकार घेतला. १८१३ च्या कायद्याने कंपनीची हिंदुस्थानच्या व्यापारांतील मक्तेदारी संपुष्टांत आणण्यांत आली आणि तो व्यापार सर्वांना खुला करण्यांत आला. त्याचवेळीं कंपनीचे हिशोब व मुलकी हिशोब यांची फारकत करण्यांत आली. १८१३ पूर्वी हिंदुस्थानांतील मुलकी वसुलांतून जी शिल्लक दरवर्षी राहील ती कंपनीची "शिल्लक" अथवा फायदा असें मानण्यांत येत

असे. म्हणजे ही शिल्लक विलायतेस खंडणी म्हणून जाई. १८१३ पासून अशा तऱ्हेनें दरवर्षी खंडणी देण्याचें बंद झालें. परंतु खंडणी बंद अगर माफ झाली नाही. ती निराळ्या स्वरूपांत देण्यांत येऊं लागली. ईस्ट इंडिया कंपनीचें भांडवल त्यावेळीं ६० लक्ष पौंड होतें. तें १०० पौंडांच्या रोख्यांच्या (शेअर्सच्या) स्वरूपांत लंडनच्या नाणें बाजारांत वावरत असे. या रोख्यांवर दरवर्षी १० टक्के नफा कंपनीने द्यावा असें पार्लमेंटने ठरवून दिलें. त्यासाठी हिंदुस्थानांतील मुलकी शिलकींतून अगर विलायतेंत कर्ज काढून भरपाई करावयाची होती. १० टक्के व्याजाची अशी हमी असल्यामुळें त्या रोख्यांची किंमत जवळ जवळ दुपटीवर गेली. म्हणजे १०० पौंड दर्शनी किंमतीच्या रोख्याची किंमत २०० पौंडांपर्यंत चढली. या व्याजाच्या निमित्ताने व त्या स्वरूपांत दरवर्षी खंडणी विलायतेस जाऊं लागली.

१८३३ च्या कायद्याने पार्लमेंटने कंपनीची व्यापारी बाजू कायमची बंद केली. त्यामुळें तिला संपूर्णपणे मुलकी स्वरूप आलें. कंपनीचें व्यापारी स्वरूप नष्ट करण्यासाठी तिचें भांडवल परत करणें आवश्यक होतें. तें मूळचें ६० लाख पौंड नव्हे तर त्यावेळच्या चालूं किंमतीप्रमाणे १२० लक्ष पौंड पार्लमेंटने हिंदुस्थान सरकारचें कर्ज म्हणून ठरविलें व त्यावर मुलकी वसुलींतून व्याज देण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारवर टाकण्यांत आली. त्यानंतर १८५७ साली शिपायांचें बंड झालें. तें मोडण्यासाठी इंग्रज सरकारला ४ कोटी पौंड खर्च आला. तोहि हिंदुस्थानवर कर्ज म्हणून लादण्यांत आला. खुद्द इंग्लंडनें आपल्या साम्राज्याच्या निरनिराळ्या मार्गांत पाळलेले स्वकृत संकेत पाहतांसुद्धा हें सर्वस्वी गैर होतें. आपलें अधिराज्य टिकविण्यासाठी झालेला खर्च इंग्लंडनेच सोसणें आवश्यक होतें. तसें न करतां तो जित हिंदुस्थानचे माथीं मारण्यांत आला. त्याचप्रमाणे अफगाण लढाईचाहि सर्व खर्च हिंदुस्थानांतील जनतेचा त्याच्याशी काडीचाहि संबंध नसता तिच्याच माथीं कर्जरूपाने मारण्यांत आला. या सर्व कर्जावरील व्याज दरवर्षी हिंदुस्थानला खंडणी म्हणून भरावें लागे.

या प्रकारच्या देण्यांत पुढें आगगाड्यांच्यासाठी काढलेल्या कर्जाची भर पडली. तथापि त्या कर्जावरील व्याज निव्वळ खंडणीच्या स्वरूपाचें नव्हतें हें सहज लक्षांत येईल. तो एक उत्पादक कर्जाचा प्रकार मानावा लागेल. हिंदुस्थानांत नोकरी करून निवृत्त झालेल्या इंग्रजी सनदी व इतर नोकरांचीं पेन्शनें व म्हातारदाम यांची अशा देण्यांत हळूहळू भर पडूं लागली. इंग्रज

व्यापारी व कारखानदार यांनी आपलें भांडवल गुंतवून हिंदुस्थानांत वाढविलेल्या उद्योगधंद्यांत त्यांना मिळालेला नफाहि दरवर्षी विलायतेस जाऊं लागला. अशा तऱ्हेच्या पुष्कळ प्रकारांनी हिंदुस्थानला दरवर्षी विलायतेला पाठवावी लागणारी रक्कम वाढत राहिली. त्यासंबंधीचे आंकडे न्यायमूर्तींनी आपल्या व्याख्यानांत दिलेलेच आहेत.

हिंदुस्थानला अशा प्रकारें दरवर्षी द्यावे लागणारे हे देणें सर्व एकाच प्रकारचे नव्हते. त्यापैकी कांही भाग निःसंशय अन्यायाने लादलेल्या खंडणीच्या स्वरूपाचा होता व त्याबद्दल कोणत्याहि स्वरूपाचा मोबदला हिंदुस्थानला मिळत नव्हता. उरलेला भाग खंडणीच्या स्वरूपाचा नव्हता. त्याबद्दल हिंदुस्थानला कमी जास्त प्रमाणांत मोबदला मिळत होता. आश्चर्याची गोष्ट अशी की हिंदुस्थानला द्यावी लागणारी खंडणी आणि तिचा अन्याय्य भाग याबद्दल हाकाटी प्रथम हिंदुस्थानशी संबंध आलेल्या इंग्रज लोकांनीच केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या विरुद्ध असणाऱ्या पक्षांतील लोकांचें हिंदुस्थानाच्या कारभारावर डोळ्यांत तेल घालून लक्ष असें आणि ज्या ज्या वेळी तिची सनद नवी करण्याचा प्रश्न येई त्यावेळीं या कारभाराची संपूर्ण झाडेझडती पार्लमेंटच्या निरनिराळ्या समित्यांच्या पुढे होई. यांतूनच निरनिराळे अन्याय उघडकीस येत व त्यांचें निराकरण करण्याची संधि अशा लोकांना मिळे. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी गुंडाळण्यांत आली आणि भारतमंत्र्यामार्फत पार्लमेंट हिंदुस्थानचा कारभार पाहूं लागलें आणि दिव्याखाली अंधार या म्हणीप्रमाणे हिंदुस्थानच्या कारभाराकडे पार्लमेंटचें पूर्वीप्रमाणे मुळीच लक्ष राहिलें नाही. त्यामुळे हिंदुस्थानच्या कारभारांत भारतमंत्री करील तें प्रमाण असें होऊं लागलें व पार्लमेंटपुढे निरनिराळ्या गाऱ्हाण्यांना वाट फुटण्याचा मार्ग बंद झाला. तो खुला करण्यासाठी हिंदुस्थानाच्या कारभारावर व तेथील आर्थिक व्यवहारावर देखरेख करणारी एक कायमची समिति नेमावी अशी मागणी हिंदुस्थानांतून होऊं लागली. ही मागणी उदारमतवादी पक्षास मान्य होऊन त्याचे अध्वर्यु ग्लॅडस्टन यांनी मुख्य प्रधान झाल्यावर १८७१ मध्ये अशा तऱ्हेची चौकशी करण्यासाठी फॉसेट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तिचें काम ३-४ वर्षें चाललें व मंत्रिमंडळ बदलल्यामुळे पुढे ती रद्द झाली.

तथापि या समितीपुढे पुष्कळांच्या साक्षी झाल्या व हिंदुस्थानांतील एकंदर करपद्धति वगैरेसंबंधी पुष्कळच माहिती उजेडांत आली. बऱ्याच अधि-

कार्‍यांच्या साक्षींतून त्यावर अधिक प्रकाश पडला. या समितीपुढे दादाभाई नौरोजी यांची साक्ष झाली व तशीच साक्ष देण्यासाठी न्यायमूर्ती रानडेहि विलायतेस जावयाचं घाटत होतें हें त्यांच्या चरित्रांत नमूद आहे. पुढें ती समितीच रद्द झाल्यामुळे व अितर कारणांनी त्यांचें विलायतेस जाणें झालें नाही. तथापि या समितिपुढे आलेल्या पुराव्याचा गोषवारा देणारा *Revenue Manual of the Indian Empire* हा ग्रंथ न्यायमूर्तींनी १८७८ सालीं प्रसिद्ध केला.

हा तपशील येथे देण्याचें कारण असें की रानडे यांनी हीं जीं दोन व्याख्यानें १८७२–७३ सालीं दिलीं त्यावेळीं फॉसेट कमिटीपुढे काय मांडावयाचें याचा न्यायमूर्तींचा अभ्यास चालू असावा. त्यांनी खंडणीबाबत मांडलेले विचार व दादाभाईनी आपल्या साक्षींत मांडलेले विचार यांत फार साम्य आहे. दादाभाईंची लेखी कैफीयत त्यांच्या *Poverty and Un-British Rule In India* या ग्रंथांत छापली आहे.

खंडणीबाबतचे दादाभाईंचे आणि न्यायमूर्तींचे विचार यावेळीं (१८७३) जरी जवळजवळ सारखे होते तरी पुढे ते तसे राहिले नाहीत. दादाभाईंचे विचार पुढे फार बदललेले दिसत नाहीत. परंतु रानडे यांचे विचार मात्र पुढे पुष्कळच सौम्य झालेले दिसतात. त्यांच्या उपलब्ध इंग्रजी लिखाणांत "खंडणी" या विषयाचा उल्लेख फक्त एकाच वेळी आला आहे आणि तो सुद्धा या विषयावर वाद करून व्यर्थ कालक्षेप करूं नये, आपल्या राजकीय पुढाऱ्यांसाठीं तो ठेवावा अशा उपरोधिक अर्थाचा आहे. तो उतारा असा :

"There are some people who think that, as long as we have a heavy tribute to pay to England, which takes away nearly twenty Crores of our surplus Exports, we are doomed and can do nothing to help ourselves. This is, however, hardly a fair or manly position to take up. A portion of the burden represents interest on moneys advanced to, or invested in, our Country, and so far from complaining, we have reason to be thankful that we have a Creditor who supplies our needs at such a low rate of interest. Another portion represents the value of Stores supplied to us, the like of which we cannot produce here. The remainder is alleged to be more or less necessary for the purposes of Administration, Defence and payment of Pensions, and though there is good cause for complaint that it is not all necessary, we should not forget the

fact that we are enabled by reason of this British connection to levy an equivalent tribute from China by our Opium Monopoly. I would not, therefore, desire you to divert and waste your energies in the fruitless discussion of this question of tribute, which had better be left to our Politicians."*

(कांही लोकांना वाटतें की, आपल्याला दरवर्षी जी २० कोटी रुपयांची खंडणी जादा निर्यातीच्या स्वरूपाने जोपर्यंत द्यावी लागते तोपर्यन्त आपण हतबल आहोत आणि आपल्याला कांहींच करतां येणार नाही. हा विचार योग्य अगर आपल्या पुरुषार्थास साजेसा आहे असें वाटत नाही. या खंडणीपैकी एक भाग आपल्याला कर्जाऊ दिलेल्या रकमांवरील अगर येथे गुंतविलेल्या परदेशी भांडवलावरील व्याजाच्या रूपाचा आहे आणि त्याबद्दल तक्रार करण्याऐवजी इतक्या कमी व्याजावर आपल्या गरजा भागविणारा सावकार आपल्याला मिळाला आहे याबद्दल आपण कृतज्ञ राहिले पाहिजे. खंडणीचा आणखी कांही भाग सरकारी कामास लागणारा माल (stores) विकत घेण्यासाठी दिला जातो. अशा प्रकारचा माल आपल्याकडे होत नसल्याने (तो बाहेरून आणणें व त्याची किंमत देणें) हें यथायोग्यच आहे. खंडणीचा जो भाग राज्यकारभार, संरक्षण, म्हातारदाम वगैरे गोष्टींसाठी द्यावा लागतो त्याची मुळीच गरज नाही अशी त्याबद्दल तक्रार करतां येण्यासारखी आहे. परंतु इंग्रजी अधिराज्यामुळे ही खंडणी जशी द्यावी लागते तशीच इंग्रजांच्या अधिसत्तेमुळेच आपल्याला चीनकडून आपल्या अफूच्या मक्त्याने जवळजवळ तेवढीच खंडणी वसूल करतां येते. म्हणून या खंडणीच्या वायफळ चर्चेत आपला वेळ अगर बुद्धि तुम्ही खर्च करावी असें मला वाटत नाही. हा प्रश्न आपल्या राजकीय पुढाऱ्यांच्यासाठी राखून ठेवावा हें बरें!)

यावरून या विषयावरचे रानडे यांचे विचार किती बदलले होते हें लक्षांत येईल. रानडे यांच्या स्वतःच्या विचारांच्या विकासाच्या दृष्टीने ही व्याख्यानें महत्त्वाचीं आहेत असें जें वर म्हटलें आहे तें याच संदर्भांत.

---

* Inaugural Address of the First Industrial Conference, Poona, 1890. *Essays on Indian Economics*, G. A. Natesan and Co., Madras, 1906, p. 200.

रानडे यांचे स्वतःचेच या विषयावरचे विचार पुढे पुष्कळच बदलले हें उघड आहे. त्यांचें हें विवेचन आज जवळ जवळ ९० वर्षांनंतर जसेंच्या तसें मान्य करतां येईल अशी अपेक्षा करणेंहि चुकीचें ठरेल. अशा प्रश्नावर लिहिणारा कोणीहि मनुष्य देश काल परिस्थिति यांच्या बंधनापलीकडे जाऊन लिहूं शकत नाही. रानडे यांचें विवेचन त्यांना त्याकाळीं उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारलेलें होतें. त्या वेळच्या अर्थशास्त्रीय निदान पद्धतीचाहि त्यांच्या मनावर पगडा असणें स्वाभाविक आहे. शिवाय रानडे यांचें त्यावेळचें वय व त्यांच्या विचाराच्या विकासक्रमांतील या व्याख्यानांचें स्थान हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. रानडे यांचें नांव काढलें की सहजपणें ध्यानांत येणाऱ्या मवाळ राष्ट्रवादापेक्षा या त्यांच्या व्याख्यानांतील राष्ट्रवाद जास्त तीव्र आणि आवेशी आहे. या आवेशांमुळे कांही ठिकाणीं शुद्ध शास्त्रीय विवेचन न होणें अटळ होतें. हा आवेश कमी होऊन शास्त्रीय विवेचनाकडे जास्त लक्ष दिल्यावर रानडे यांना स्वतःलाच या व्याख्यानांत प्रतिपादलेलीं कांही मतें अग्राह्य वाटूं लागावीं हेहि स्वाभाविकच होतें. म्हणून हीं व्याख्यानें आज वाचतांना त्यांतील विवेचनाबद्दल कांही शंका निघणें अपरिहार्य आहे. त्यांपैकी कांहींची चर्चा पुढे केली आहे. ह्या चर्चेंत आपल्या शहाणपणाचा टेंभा पाजळून रानडे यांच्या विवेचनांतील दोष दाखविण्याचा हेतु नसून आज उपलब्ध असलेल्या माहितीवरून व आजच्या अर्थशास्त्रीय चिकित्सेच्या आधाराने त्यांनी विवेचिलेल्या विषयांचा कोणत्या दृष्टिकोणांतून विचार करावा लागतो याचें दिग्दर्शन करण्याचा आहे. त्यामागील वृत्ति अगदी विनम्र आहे. अशा विवेचनामुळे रानडे यांचा मोठेपणा कमी न होतां तावून सुलाखून जास्तच खुलून दिसेल अशी त्यामागची भूमिका आहे.

या दोन्ही व्याख्यानांत पुष्कळ पुनरुक्ति आहे; तथापि या सर्वच विवेचनांत इंग्लंडला द्यावी लागणारी खंडणी व त्याचे होणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दुष्परिणाम हें सूत्र सर्वत्र खेळवलें आहे. न्यायमूर्तींच्या विवेचनाचें आज परिशीलन करतांना मुख्यतः या सूत्राचें परीक्षण केल्यास कार्यभाग होईल.

'खंडणी' या शब्दाची काटेकोर व्याख्या जरी न्यायमूर्तींनी केलेली नाही तरी त्याचे दोन अर्थ त्यांच्या विवेचनांत स्पष्टपणें दिसतात. (१) जी रकम इंग्लंडला प्रतिवर्षी द्यावी लागते परंतु ज्याबद्दल कांहीहि मोबदला मिळत नाही ही संपूर्ण अर्थाने खंडणी (निव्वळ खंडणी) होय. (२) जी रकम द्यावी लागते अगर दिली जाते परंतु ज्याबद्दल वस्तु अगर सेवारूपाने हिंदुस्थानला मोबदला

मिळतो परंतु ज्याचे अप्रत्यक्ष आर्थिक परिणाम वाईट होतात तीहि खंडणीच होय. या दोन्ही अर्थाने खंडणी हा शब्द न्यायमूर्तींनी या विवेचनांत वापरला आहे.

या शिवाय (अ) हिंदुस्थान सरकारला आपल्या वसुलांतून द्यावी लागणारी खंडणी व (ब) ती व इतर मार्गाने (व्यापाराच्या वगैरे) दिली जाणारी एकंदर खंडणी असे आणखी दोन भाग त्यांत विवेचनाच्या सोयीसाठी पाडले पाहिजेत. पैकी ज्यासाठी कांहींच मोबदला मिळत नाही अशा स्वरूपाची खंडणी हिंदुस्थान सरकारमार्फतच जात असल्यामुळें (१) चा समावेश (अ) मध्येच होतो. परंतु (अ) मध्ये याशिवाय (२) पैकीहि कांही बाबींचा समावेश होतो हें सहज ध्यानांत येईल.

विवेचनाच्या सौकर्यासाठी असे दोन भाग करण्याचें प्रयोजन असें की, खंडणीसंबंधीच्या विवेचनांत दोन प्रकारच्या हिशोबांचा आणि ताळेबंदाचा संबंध येतो. (१) हिंदुस्थान सरकारचा फडणिशी ताळेबंद, आणि (२) परदेशी देण्याघेण्याचा सर्व देशाचा ताळेबंद. हिंदुस्थान सरकारमार्फत दिल्या जाणाऱ्या खंडणीच्या विवेचनासाठी सरकारी फडणिशी ताळेबंद महत्त्वाचा तर एकंदर खंडणीच्या विवेचनासाठी परदेशी देण्याघेण्याचा ताळेबंद महत्त्वाचा. हे दोन्ही हिशोब अगदी स्वतंत्र आहेत आणि त्यांची गल्लत झाल्यास विवेचनांत घोटाळे होतात.

प्रथम या दोन हिशोबांबद्दल व ताळेबंदांबद्दल थोडीशी तपशीलवार माहिती घेऊं.

(१) हिंदुस्थान सरकारच्या ताळेबंदांत जमेच्या बाजूस निरनिराळे कर व त्यांपासून होणारे उत्पन्न हे मुख्यतः आहेत. खर्चाच्या बाजूंत सर्व सरकारी खर्च व जुन्या कर्जावरील व्याज व त्याची फेड यांचाहि समावेश होतो. हें नीट लक्षांत येण्यासाठी १८६९-७० च्या हिंदुस्थान सरकारच्या फडणिशी व्यवहाराचा ताळेबंद पुढे दिला आहे.

| 1870 Sources of Revenue | £ |
|---|---|
| Land revenue | 21,088,019 |
| Tributes & Contributions from Native States | 765,126 |
| Forest | 471,590 |
| Excise | 2,253,655 |
| Assessed Taxes | 1,110,224 |
| Customs | 2,429,185 |
| Salt | 5,888,707 |
| Opium | 7,953,098 |
| Stamps | 2,379,316 |
| Mint | 157,214 |
| Post Office | 711,698 |
| Telegraph | 247,042 |
| Law & Justice ( fees etc. ) | 801,954 |
| Police | 287,549 |
| Marine ( Pilot dues, sale of Stores etc. ) | 329,953 |
| Education | 74,889 |
| Interest on bonus & advances | 336,376 |
| Gain by exchange on Transactions with London | 245,500 |
| Miscellaneous ( including inland navigation ) | 1,575,167 |
| Army ( Sale of Stores etc. ) | 1,032,605 |
| Public works ordinary | 169,155 |
| Irrigation | 534,979 |
| State Railways | 8,080 |
| Total | 50,901,081 |

| 1870 Expenditure | £ |
|---|---|
| In India | 41,363,021 |
| In England | |
| Stores : | 1,414,116 |
| Guaranteed Railway interest and surplus profits | 1,547,064 |
| Other charges | 6,458,211 |
| Total | 9,419,391 |
| Total expenditure | 50,782,412 |
| Surplus revenue | 118,669 |

(२) परराष्ट्रीय देण्याघेण्याचा आन्तरराष्ट्रीय आय-व्ययाचा ताळेबंद :

| जमा | खर्च |
|---|---|
| १. निर्यात वस्तूंची किंमत | १. आयात वस्तूंची किंमत |
| २. हिंदुस्थानांतील लोकांना बाहेरून पाठवलेले पैसे (मनिऑर्डर्स) | २. हिंदुस्थानांतील लोकांनी बाहेरच्या देशांतील लोकांना पाठवलेले पैसे |
| ३. हिंदी जहाजें बंदरें वगैरे वापरण्याबद्दल परदेशांनी दिलेलें भाडें वगैरे | ३. परदेशी जहाजांतून आपला माल वगैरे पाठवण्यासाठी हिंदी लोकांना द्यावे लागणारे पैसे |
| ४. हिंदुस्थानने दिलेल्या कर्जावर इतर देशांनी दिलेलें व्याज | ४. हिंदुस्थानला परदेशी कर्जावर द्यावें लागणारें व्याज. |
| ५. परदेशांतून हिंदुस्थानला मिळालेलें कर्ज-भांडवल वगैरे | ५. हिंदुस्थानने परदेशांना पुरवलेलें कर्ज, मागच्या कर्जाची फेड वगैरे |

यापैकी (५) भांडवली स्वरूपाचे तथापि एकंदर हिशेबाचे दृष्टीने महत्त्वाचे.

सर्वच खंडणीचा प्रथम विचार करूं. ज्यांचा मोबदला मिळतो व मिळत नाहीं अशा दोन्ही बाबी हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नतीस हानिकारक ठरतात हा मुख्य मुद्दा रानडे यांनी मांडला आहे. देशाचा आर्थिक विकास हा दरवर्षी त्यांत होणाऱ्या उत्पादनांतून बचत करून गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलावर अवलंबून असतो हें तत्त्व आजच्या नियोजनाच्या दिवसांत प्रत्येकास ठाऊकच आहे. दरवर्षी अशा तऱ्हेने होणाऱ्या संचयांतून हिंदुस्थानला द्यावी लागणारी एकंदर खंडणी वजा जाते व त्यामुळे त्या रकमेच्या उत्पादक उपयोगामुळे जो आर्थिक विकास साधतां आला असता, जो रोजगार वाढला असता, तो होत नाहीं असें रानडे यांनी प्रतिपादिलें आहे. त्यांनी मांडलेलें हें तत्त्व आणि निष्कर्ष अगदी अनाक्षेपार्ह आहेत. परंतु या विवेचनाच्या पोटतपशीलांत त्यांनी केलेलीं कांहीं विधानें व काढलेले निष्कर्ष मात्र तितके तर्कशुद्ध अगर अनाक्षेपार्ह नाहीत असें आढळतें.

(अ) खंडणीमुळे बचतींतील किती भाग वाया जातो या संबंधीचें विवेचनच प्रथम घेऊं. प्राप्तीवरील कराच्या माहितीच्या अनुरोधाने न्यायमूर्तींनी हिंदुस्थानांतील दरवर्षीच्या एकंदर बचतीचा अंदाज केला आहे व त्याचा पाव हिस्सा खंडणीपायीं जातो असें मत मांडलें आहे. येथे केलेला बचतीचा अंदाज बऱ्याच दृष्टींनी आक्षेपार्ह आहे. (१) प्राप्तीवरील कर देणाऱ्यांखेरीज देशांतील इतर

लोकांना बचत करण्याइतकें उत्पन्नच नव्हतें हें त्यांचें गृहीत कृत्य सहज मान्य करण्यासारखें नाही. त्यांनी प्राप्तीवरील कर साधारणपणे उत्पन्नाच्या एक टक्का असतो असें म्हटलें आहे यावरून त्यांना १८६९ मधील परिस्थिति येथे अभिप्रेत आहे. कारण त्या आधींच्या अगर नंतरच्या वर्षांत या कराचें मान यापेक्षा निराळें होतें. १८६९ मध्यें ५८००६२ इतकेच लोक या करास पात्र झालेले होते. त्यावेळच्या साधारणपणे १५ कोटी लोकसंख्येपैकी एवढ्याच लोकांना बचत करणें शक्य होतें व इतरांना नव्हतें हें सकृद्दर्शनीहि चमत्कारिक दिसतें. (२) बचत करणारांची संख्या त्यांनी फार कमी धरली तर त्यांच्या सरासरी बचतींचें मान फारच मोठें धरलें. साधारणपणे प्राप्तीच्या $\frac{1}{3}$ किंवा ३३ टक्के हे लोक बचत करतात असें त्यांनी मानलें तें अतिरंजित दिसतें. $\frac{1}{5}$ किंवा $\frac{1}{6}$ हें जास्त वास्तविक ठरलें असतें. (१) आणि (२) यांची वजावाट करतां त्यांचा एकमेकांस छेद जातो असें आपण समजूं व रानडे यांचा ब्रिटिश हिंदुस्थानांतील बचतीचा रु. ६५ कोटींचा अंदाज हा साधारणपणे बरोबर आहे असें धरून चालूं.

परंतु देशाच्या एकंदर बचतीचा अंदाज करावयाचा तर त्यांत हिंदी संस्थानांतील प्रजेच्या बचतीचा अंदाज मिळवावयास पाहिजे. कारण देशांतून जाणारी एकंदर खंडणी फक्त ब्रिटिश हिंदुस्थानांतूनच जात असें हें सकृद्दर्शनीहि पटण्यासारखें नाही. हिंदुस्थान सरकारमार्फत जाणारी खंडणी जरी एक वेळ रानडे म्हणतात त्याप्रमाणे फक्त ब्रिटिश हिंदुस्थानांतील जनतेवरील करांतून जाते असें मानलें तरी ब्रिटिश व्यापारी वगैरे मंडळींनी स्वदेशी पाठवलेली रक्कम सर्व देशांतील त्यांच्या आर्थिक व्यवहारांतूनच येत असल्याकारणाने संस्थानी प्रजेकडूनहि तिचा कांही भाग वसूल होणें अपरिहार्य होतें. निर्यात होणारा व आयात होणारा माल हा फक्त ब्रिटिश हिंदुस्थानांत व ब्रिटिश हिंदुस्थानांतूनच होत होता असें कदापि म्हणतां येणार नाही. हिंदुस्थान सरकारने द्यावयाच्या खंडणीचा बोजा संस्थानी प्रजेवर पडत नाही हें रानडे यांचें विधान जरी खरें असलें तरी सर्व खंडणीबाबत तसें मुळींच म्हणतां येणार नाही. यासाठी एकंदर खंडणीपायीं आपल्या एकंदर बचतीपैकी किती भाग वजा जातो याचा हिशोब करतांना संस्थानी प्रजेची बचतहि हिशोबांत धरणें आवश्यक आहे. संस्थानांतील एकंदर प्रजासंख्या, मुलूख व तेथील वसूल लक्षांत घेतां, त्या मुलुखांतील बचतीचा अंदाज ब्रिटिश हिंदुस्थानच्या तिसऱ्या

हिश्याइतका, म्हणजे जवळ जवळ २० कोटी धरण्यास प्रत्यवाय नसावा. तो वरील अंदाजांत मिळविता देशांतील एकंदर बचतीचा अंदाज ८५ कोटीपर्यंत जाईल.

हें बचतीच्या अंदाजासंबंधी झालें. बचतीशी पडणारें एकंदर खंडणीचें प्रमाण काढतांना वट खंडणी ध्यानांत न घेतां ऐन खंडणी घेतली पाहिजे. म्हणजे रानडे यांनी स्वतःच पुढे म्हटल्याप्रमाणें दरवर्षी हिंदुस्थानांत चीनकडून अफूच्या व्यापारावर मिळणारी ७ कोटी रुपयांची खंडणी वट खंडणींतून वजा करून ऐन खंडणी काढली पाहिजे. एकंदर १६ कोटींतून ही रकम गेल्यास ९ कोटी ऐन खंडणी राहते आणि ती एकंदर बचतीच्या १/९ हून कमीच भरते.

(आ) ज्याबद्दल मोबदला मिळतो परंतु ज्याचे अप्रत्यक्ष आर्थिक परिणाम आम्हांला अहितकारक होतात, त्या खंडणीच्या भागाबद्दल रानडे यांनी केलेलें विवेचन तर्कशुद्ध आहे. विलायतेहून येणाऱ्या पक्क्या मालामुळे आमचे देशी धंदे नाहींसे झाले व आम्ही फक्त कच्च्या मालाचे उत्पादक झालों आहोंत. त्यामुळे आमच्याकडे औद्योगीकरण होण्याऐवजी शेतकीकरणच झालें आहे. शेतकीकरणांत विकास साधत नाही. त्यासाठी औद्योगीकरणाचीच कांस धरली पाहिजे ही रानडे यांची विचारसरणी सर्वांस परिचित आहेच. ती प्रथम कशी मांडली गेली हें या व्याख्यानांच्या द्वारां आपल्यास कळतें.

या संदर्भातच रानडे यांनी आपला इंग्लंडशी चालणारा व्यापार व इतर देशांशी चालणारा व्यापार यासंबंधी जें विवेचन केलें आहे त्याचा परामर्श घेणें जरूर आहे. कारण त्यांत दिलेली माहिती खरी असली तरी त्यांची त्यांनी लावलेली संगति व अन्वयार्थ आणि त्यांतून काढलेला निष्कर्ष हीं शंकास्पद आहेत. पान ४२-४४ वर हिंदुस्थानच्या मागच्या १०-१५ वर्षांतील आयात निर्यात व्यापाराचा आढावा रानडे यांनी घेतला आहे व त्यांत आपला व्यापार इंग्लंडशिवाय इतर देशांशी जास्त प्रमाणांत वाढत आहे या गोष्टीकडे लक्ष वेधून ही गोष्ट आपल्या फायद्याची आहे असें प्रतिपादिलें आहे. त्याचीं कारणें अशीं : (१) विलायतेशी आपला व्यापार सरळ व्यापाराच्या स्वरूपाचा होत नाही. (२) विलायतेहून येणारा माल येथे होणाऱ्या मालापैकीच असल्यामुळे आमचे धंदे बसतात. (३) याखेरीज जो माल विलायतेहून येतो तो आपल्या लोकांच्यासाठी येत नसून येथील तद्देशीय लोकांच्यासाठी येतो. विलायतेशिवाय इतर देशांहून येणाऱ्या मालाची परिस्थिति याच्या अगदी उलट आहे आणि

म्हणून तो आपल्या फायद्याचा आहे असें रानडे यांनी प्रतिपादिलें आहे. त्यांच्या या कारणांचा क्रमशः विचार करूं.

(१) विलायतेस खंडणी द्यावी लागत असल्यामुळे आपण विलायतेस जेवढी निर्यात करतों त्याहून कमी आयात आपणांस करतां येते. म्हणून हा व्यापार सरळ व्यापाराच्या स्वरूपाचा नाही असें रानडे यांचें म्हणणें. इतर देशांना आपण जेवढें निर्यात करतों तितकेंच आपल्याला आयात करतां येतें म्हणून त्यांच्यांशी होणारा व्यापार बरोबरीच्या नात्याचा व फायद्याचा. यांतील एकेक विधान बरोबर असलें तरी हिंदुस्थानच्या एकंदर व्यापाराचा व परराष्ट्रीय देण्याघेण्याचा साकल्याने विचार केल्यास त्या दोन विधानांच्या एकत्रीकरणांतून रानडे यांनी काढलेला निष्कर्ष बरोबर नाही असें दिसतें. खंडणी ही अटळ आहे आणि ती तशी होती असें गृहीत धरलें की ती कोठून तरी भरली पाहिजे हें ओघानेच आलें. विलायतेशी असणारा व्यापार काय किंवा इतर देशांशी असणारा व्यापार काय सर्व व्यापारांत मिळून होणाऱ्या उत्पन्नामधूनच ती द्यावयाची. इंग्लंडशी आपला मुळीच व्यापार नसता आणि तेवढाच व्यापार इतर देशांशी असता आणि इंग्लंडला खंडणी देणेंहि जरूर असतें तर त्यामुळे तो जास्त फायद्याचा झाला असता असें समजावयाचें कांहीच कारण नाही. खंडणी त्यांतून गेली असती एवढेंच. किंवा होता तो सर्व व्यापार इंग्लंडशीच असता तरी त्यामुळे हिंदुस्थानचें जास्त नुकसान होणार होतें असाहि भाग नाहीं. इंग्लंडचे व्यापारी हिंदी मालास इतर देशांपेक्षा कमी भाव देतात असें कोठे न्यायमूर्तींनी सूचितसुद्धा केलेलें नाही. परदेशीं पाठविलेल्या मालाबद्दल मिळावयाची रक्कम इंग्रज व्यापाऱ्यांमार्फत परस्पर देण्याघेण्याची वजावट होऊन हिंदुस्थानला मिळते हा सरळ व्यापाराचा प्रकार नव्हे असा त्यांनी पान ४७ वर यासंबंधी खुलासा केला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि देवघेवी यांचा व्यवहार असाच वजावटीने नेहमी चालत आलेला आहे ही गोष्ट रानडे यांच्या लक्षांत आली नसावी. याशिवाय ते ज्या विशिष्ट काळाबद्दल लिहीत होते त्या काळीं व त्यानंतरहि अर्ध्या शतकाहून अधिक काळपर्यंत सर्व आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचे व्यवहार लंडनच्या बाजारपेठेंतूनच होत असत. त्यामुळे इतर देशांशी होणारे हिंदुस्थानचे व्यापारी व इतर व्यवहार लंडनमधून इंग्रज व्यापाऱ्यांमार्फत होत यांत कांहीं गैर अगर सरळ व्यवहारास बट्टा लागणारें होतें असें म्हणतां येणार नाही.

( २ ) हें विधान स्थूल मानानें खरें होतें परंतु तें तसेंच राहील अशी जी रानडे यांची कल्पना होती ती मात्र बरोबर नव्हती. १८७० पर्यंत इंग्लंड हें औद्योगीकरणांत सर्वांत पुढे व अग्रेसर राष्ट्र असल्यामुळे यांत्रिक बनावटीचा मालच मुख्यत: तेथून इतर देशांना निर्गत होत असे. इतर देशांतून अजून औद्योगीकरण होत होतें आणि त्यांच्या निर्यातीचा माल इंग्लंडइतका यांत्रिक बनावटीचा नव्हता. म्हणून त्यांच्याकडून येणाऱ्या मालामुळे हिंदुस्थानांतील धंद्याची पिछेहाट होण्याचा संभव कमी होता. हें जरी खरें तरी ही परिस्थिति फार झपाट्यानें बदलत होती. जर्मनीच्या नवीन रासायनिक रंगांच्या शोधामुळे रानडे लिहीत होते त्यानंतरच्या १०–१२ वर्षांतच हिंदुस्थानांतील निळीच्या धंद्याची खच्ची भराभर झाली. जर्मनी, ऑस्ट्रियामधून १८९० नंतर येणाऱ्या बीट साखरेच्या आयातीमुळे हिंदुस्थानांतील साखरेचा धंदा बुडाला. ह्या गोष्टी पुढे झाल्या त्या रानडे यांना या वेळी दिसल्या नाहीत याबद्दल त्यांना दोष देण्याचें कारण नाही. तथापि इतर देशांतून औद्योगीकरण किती झपाट्याने पसरत आहे याची त्यांना तितकीशी कल्पना आली नसावी असें या त्यांच्या विवेचनावरून वाटतें. यामुळेच इतर देशांशी होणाऱ्या हिंदुस्थानच्या व्यापाराचें स्वरूप त्या वेळी होतें तसेंच राहील अशी त्यांची समजूत झाली असावी.

( ३ ) विलायती कोळसा, रेल्वेचें सामान, दारू (उडवावयाची, बंदुकीची), स्टोअर ह्या जिनसांचा खप बहुशा आपल्या लोकांच्यांत होत नाही. साहेब लोकांची वस्ती व कारखाने इकडे वाढल्यामुळें हे जिन्नस पूर्वींपेक्षा जास्त आयात होतात. "यामुळे त्या प्रमाणानें आपल्या देशांतील लोकांचें सामर्थ्य वाढलें असें होत नाहीं." (पान ५३) असें रानडे यांचें यासंबंधीचें विवेचन आहे, हें मुळीच मान्य करण्यासारखें नाही. साहेब लोकांच्या येथील कारखान्यांना लागणारा माल प्रत्यक्षपणे नाही तरी अप्रत्यक्षपणे आमच्याच उपयोगी पडतो याकडे रानडे यांचें दुर्लक्ष झालें. आगगाड्यांसाठी येणारे सामान आम्हीच आगगाड्यांचा उपयोग करून वापरतों आणि त्याचा अप्रत्यक्ष उपभोग घेतों. मुंबईमधील गिरण्यांसाठी पहिली पुष्कळ वर्षें कोळसा विलायतेहून येत असे. त्या कोळशावरच त्यांचें उत्पादन अवलंबून असल्यामुळे त्यांनी उत्पादिलेलें कापड, सूत वापरलें म्हणजे आम्हीच त्या कोळशाचा अप्रत्यक्ष उपभोग घेतला असें होतें. बंदुका, त्यांना लागणारी दारू वगैरे देशाच्या संरक्षणासाठी व शांततेसाठी आम्हीच वापरत होतों. यासंबंधीचें रानडे यांचें विवेचन जरा एकांगी आहे. त्यासंबंधी ते फारसे खोलवर गेले नाहीत असेंच म्हटलें पाहिजे. खंडणीसंबंधी

रानडे यांच्या नंतरच्या लिखाणांतील जो उतारा या पूर्वीच्या भागांत दिला आहे त्यावरून त्यांना स्वतःलाहि हें त्यांचें पूर्वीचें विवेचन पुढे मान्य नव्हतें असें वाटतें.

( इ ) रानडे यांनी हिंदुस्थानच्या व्यापारासंबंधी लिहितांना आन्तरराष्ट्रीय व्यापारासंबंधी मूलभूत असा एक सिद्धान्त दोनदां ( पा. ८–५२ ) सांगितला आहे. तो त्यांच्या विवेचनास एका दृष्टीने मूलभूत असल्यामुळे त्यासंबंधीहि थोडेसें लिहिणें क्रमप्राप्त आहे. "एकंदरींत पृथ्वीतील सधन देशांतील व्यापाराचें मुख्य लक्षण हें आहे कीं, बाहेरून येणारा माल बाहेर जाणाऱ्या मालापेक्षां जास्त किंमतीचा असतो. याउलट या देशाच्या व्यवहाराचें साधारण स्वरूप आहे." ( पा. ५२ ) "साधारणपणे जितका माल या देशांतून बाहेर जातो त्याहून अधिक किंवा तितका तरी तिकडचा माल या देशांत यावा असा सिद्धान्त असून..." (पा.८) हा सिद्धान्त बरोबर नाही. हिंदुस्थानांतून होणारी निर्यात आयातीपेक्षा जास्त असे हें बरोबर आहे. परंतु त्याच्या उलट स्थिती असणें हें सधनतेचें लक्षण आहे असा जो सिद्धान्त म्हणून सांगितला आहे तो बरोबर नाही. इंग्लंडची आयात निर्यातीपेक्षा जास्त होती. परंतु फ्रान्सची स्थिती १८५९ ते १८६९ या काळांत त्या उलटी होती. अमेरिकेंतील आयात निर्यातीपेक्षा १८७० पर्यंत जास्त होती. परंतु नंतर कित्येक दशकें निर्यातच आयातीपेक्षा जास्त होती. इतर कांही देशांच्या व्यापाराची स्थितीहि हिंदुस्थानप्रमाणेच होती आणि ते देश सधन होते. रानडे यांनी जो सर्वसामान्य सिद्धान्त म्हणून सांगितला तो या वस्तुस्थितीस धरून नाही आणि म्हणून त्यास मान्यता देतां येणार नाही. दुसरी गोष्ट अशी कीं, व्यापाराशिवाय ज्या इतर देवघेवींच्या चालू आणि भांडवली व्यवहारांतील गोष्टी असतात त्या या सिद्धान्तांत सर्वस्वी दुर्लक्षिल्या जातात. परराष्ट्रीय व्यापारी देवघेवींत आयात होणारा माल जर निर्यात मालाहून जास्त असेल तर त्याबद्दल सोनें अगर इतर मार्गाने किंमत भरावी लागते. ती इतर मार्गाने मिळवलेल्या हुंडणावळीने म्हणजे इतर देशांना कांही सेवा ( जहाजें, विमा वगैरे ) पुरवून त्यांतून येणाऱ्या उत्पन्नांतून अगर पूर्वी त्यांना दिलेल्या कर्जावरील व्याजांतून अगर मुद्दलांतून मिटवावी लागते. इंग्लंडचा जादा आयात व्यापार अशा इतर मार्गाने मिळवलेल्या उत्पन्नामुळेच शक्य होत होता. हिंदुस्थानला अशा प्रकारें वागणें अशक्यच होतें आणि त्यावेळीं इतर पुष्कळ देशांनाहि तसें वागतां येणें शक्य नव्हतें. जादा निर्यात करून आम्हांला खंडणी द्यावी लागते व त्यामुळे आमच्या निर्यातीचा संपूर्ण मोबदला आम्हांला मिळत नाही ही न्यायमूर्तींची मीमांसा अगदीं तर्कशुद्ध

होती त्याबद्दल दुमत असण्याचें कारण नाहीं. परंतु यापुढे जाऊन जेव्हां ते एक सर्वसामान्य सिद्धान्त त्यांतून काढतात तेव्हां त्यांची यासंबंधीची विचारसरणी मान्य करतां येत नाही.

( ई ) आगगाड्यांच्यासंबंधी रानडे यांनी कटाक्षाने लिहिलें आहे. त्यांचा यासंबंधीचा मुख्य आक्षेप त्यांत गुंतवलेल्या भांडवलावर ५ टक्के व्याजाची सरकारने हमी देण्यावर होता. त्यासंबंधी येवढेंच म्हणावयाचें की अशी हमी त्या वेळी पुष्कळ देशांतून दिली जात होती. अमेरिकेसारख्या स्वतंत्र देशांतहि अशा तऱ्हेची हमी देऊनच आगगाड्या बांधण्यासाठी भांडवल आणविण्यांत आलें होतें. तेव्हां हिंदुस्थान सरकार त्या वेळच्या प्रथेप्रमाणेच वागत होतें. जित हिंदुस्थानावर कांही विशेष निराळ्या अटी त्यांच्याकडून लादल्या गेल्या होत्या असें नाही.

रानडे यांचा दुसरा मुद्दा आगगाड्यांच्या वाढीमुळे रोजगारवाढ होत नाही किंवा पर्यायाने आर्थिक विकास होत नाही असा होता. आगगाड्यांसाठी खर्च झालेल्या रु. १०० कोटींपैकी ५५ कोटींचा येथे रोजगार उत्पन्न होण्यांत व्यय झाला परंतु तो तेवढ्यापुरताच. त्यानंतर दरसालीं आगगाड्यांना तोटा होत असल्यामुळें त्यांतून कांहीच निर्माण न होतां आमच्याच पदरास क्षार लागतो असें त्यांनी प्रतिपादन केलें आहे. आज हें प्रतिपादन बहुतेकांना अमान्य होईल. परंतु रानडे यांच्या वेळची विचाराची पार्श्वभूमि लक्षांत घेतल्यास तसें वाटणार नाही. त्यांची यासंबंधीची मीमांसा आज आपल्याला पटत नसली तरी त्यांनी ती तशी कां केली हें कळल्यावर आपल्याला त्यांच्या विचारांचें मर्म जास्त चांगल्या तऱ्हेने आकलन होईल.

आगगाड्या बांधतांना जो रोजगार उत्पन्न झाला तेवढाच रानडे यांना मान्य होता. परंतु आगगाड्या चालूं राहिल्या, त्या तशा चालूं राहण्यासाठी पुष्कळ माणसांना त्यांत कायमचा रोजगार मिळाला हें त्यांच्या दृष्टीआड झालें. तसेंच आगगाड्यांना दरवर्षी होणारें उत्पन्न आणि त्यांचा होणारा खर्च आणि त्यांतून होणारा तोटा यांवरच त्यांचें लक्ष केन्द्रित झालें होतें. त्यामुळे आगगाड्यांच्या वाढीमुळे झालेले कित्येक अप्रत्यक्ष फायदे त्यांनी विचारांतच घेतले नाहीत. नवीन उद्योगधंद्यांची सुरुवात व औद्योगीकरणाच्या पूर्व तयारींतील आगगाड्यांच्या विस्ताराचें महत्त्वाचें स्थान रानडे यांच्या निदर्शनास आलें नाही अगर त्यांना जाणवलें नाही असें म्हणणें भाग आहे. कारण आगगाड्यांमुळे

ज्या इतर उद्योगांना चालना मिळाली त्यांत रोजगार वाढलाच. रानडे म्हणतात त्याप्रमाणे आगगाड्या चालू होईपर्यंतच त्यांच्या बांधणावळीमुळे काय रोजगार वाढला तो, त्यानंतर फक्त नुकसान, हें वस्तुस्थितीस धरून नाही.

आगगाड्यांच्यासंबंधीचा हा विचित्र दृष्टिकोण कां असावा याचें उत्तर रानडे यांच्या लिखाणांत मिळालें नाही, तरी दादाभाईंच्या त्या वेळच्या लेखांत मिळतें.* त्या काळीं प्रचलित असलेल्या एका मिलप्रणीत अर्थशास्त्रीय सिद्धांतावर ही मीमांसा आधारलेली होती. दादाभाईंनी तो सिद्धांत उद्धृत करूनच वर दर्शविलेल्या टीकेला उत्तर दिलें आहे. " Demand for commodities is not demand for labour. " हाच तो महत्सिद्धांत होय. हा ज्याला समजला त्यालाच अर्थशास्त्र समजलें असें म्हणतां येईल अशी लेस्ली स्टीफनची त्यासंबंधी उक्ति होती.

---

* The last theorem of Mill is a clear answer to those who say that, because the railways open up a market for the commodities, the produce of the country *must* increase. I need only repeat the " demand for commodities is not demand for labour " and that " industry cannot be employed to any greater extent than there is capital to invest." ( Dadabhai Naoroji, *Poverty and Un-British Rule in India,* Swan Sonnenschein & Co. Ltd., London, 1901, p. 56. )

आगगाड्यांच्या वाढीसंबंधीचा हा दृष्टिकोण त्या वेळी थोड्या अधिक व्यापक भूमिकेवरूनहि मांडण्यांत येत असे. हिंदुस्थानांतील आगगाड्यांची वाढ इथल्या लोकांच्या गरजा भागविण्यासाठी झाली नाही. लष्करी हालचाल सुगम होण्यासाठी व येथून कच्चा माल सुलभतेने जावा यासाठी त्या परकीय सरकारने लोकांना गरज नसतांना बांधल्या. परदेशी वस्तु आयात होण्यास त्यांचें सहाय्य झालें व त्यामुळे आपल्या देशांतील उद्योगधंदे वाजवीपेक्षा जास्त वेगाने ऱ्हास पावले. येथील लोकांस शेतीशिवाय दुसरा धंदाच राहिला नाही. आगगाड्यांनी या अनिष्ट परंपरेसच सहाय्य केलें. तेव्हां त्यांच्यापासून आर्थिक फायदा अप्रत्यक्ष तरी कसा झाला म्हणावा ? रानडे यांनी असें विवेचन येथे अगर अन्यत्र केलेलें नाही. परंतु असा दृष्टिकोण पत्करल्यास तो चुकीचा आहे असें म्हणतां येणार नाही. मग आगगाड्यांपासून होणारे सर्व फायदे व तोटे लक्षांत घेऊन एकंदर फायदा की तोटा असें गणित केलें पाहिजे. तें करणें फार दुर्घट आहे हें सांगावयास नको.

मिल्लचा हा सिद्धान्त मजुरीचे दर कसे ठरतात यासंबंधी त्याने मांडलेल्या सिद्धान्तावरून निघालेला होता. कोणत्याहि अर्थव्यवस्थेंत उत्पादनासाठी उपयोगांत आणावयाचें भांडवल व त्यासाठी कामावर लावावयाचे कामगार यांच्या परस्पर प्रमाणावर मजुरीचे दर ठरतात असें मिल्लने विवेचन केलें होतें. उत्पादकाला जें भांडवल उत्पादनासाठी पुरवावें लागतें त्यापैकी एक ठराविक भाग उत्पादन होऊन तें बाजारांत येईपर्यंतच्या काळांत कामावरील कामगारांना मजुरी देण्यासाठी म्हणून उत्पादक ठेवतात आणि त्याचें कामगारांच्या संख्येशी जें प्रमाण असतें त्यावर मजुरींचे दर ठरतात. स्थूलमानाने मजुरी देण्यासाठी लागणारा हा निधी कमी जास्त होत नाही. त्यामुळे कामास लावलेल्या मजुरांच्या कमीजास्त संख्येमुळेच मजुरींचे दर जास्तकमी होण्याची शक्यता असते किंवा मजुरींचे दर ठरले तर किती कामगारांना कामावर लावतां येईल हें मजुरीसाठी राखून ठेवलेल्या या निधीवरूनच ठरतें. त्यामुळे कामगार ज्या वस्तू निर्माण करतात त्यांना मागणी वाढली तरी त्यामुळे जास्त कामगारांना रोजगार मिळेल असें नाही. तें सर्वस्वी मजुरीसाठी राखून ठेवलेल्या या निधीवर अवलंबून असतें. सकृद्दर्शनी चमत्कारिक वाटणाऱ्या मिल्लच्या सिद्धान्ताचा उगम या मूळ सिद्धांतांत आहे. हा सिद्धांत वास्तव नाही. प्रत्यक्ष व्यवहारांत उत्पादक अशा प्रकारचा निधि ठेवीत नाहीत अगर कल्पितसुद्धा नाहीत असें मिल्लच्या वेळच्या अर्थशास्त्रज्ञांनी त्याच्या नजरेस आणलें. आपल्या सिद्धांताविरुद्धचा हा पुरावा मिल्लने ग्राह्य मानला व आपला पूर्वीचा सिद्धांत बरोबर नाही असें जाहीरपणें कबूल केलें. मूळ सिद्धांत अशा रीतीने बरोबर नाही असें मान्य झालेलें असल्या-मुळे त्यावर आधारलेले इतर सिद्धांत व आनुषंगिक विवेचनें हींहि बरोबर नाहीत असें ओघानेच येतें. तेव्हां त्यासंबंधी अधिक लिहावयास नको.

( ए ) हिंदुस्थान सरकार मार्फत दिल्या जाणाऱ्या खंडणीचा आतां विचार करूं. १०$\frac{३}{४}$ कोटींचा तपशील यासंबंधांत न्यायमूर्तींनी दिला आहे. त्यापैकी ४$\frac{१}{२}$ कोटींची बाब ही निव्वळ खंडणी स्वरूपाची आहे. हिंदुस्थानवर अन्यायाने लादलेल्या १०० कोटी कर्जावर दरवर्षी द्यावें लागणारें व्याज ही ती बाब होय. वर सांगितलेल्या ( १ ) मधील हींच मुख्य आणि एकमेव बाब होय.

न्यायमूर्तींनी उल्लेखिलेल्या इतर बाबींबाबत हिंदुस्थानला मोबदला मिळे.-सरकारी कामासाठी लागणारा १$\frac{३}{४}$ कोटींचा माल, संरक्षण व आरमारावर होणारा २$\frac{१}{२}$ कोटींचा खर्च, विलायतेंतील नोकरांना द्यावा लागणारा पगार $\frac{३}{४}$ कोट या

सर्व खर्चाबद्दल हिंदुस्थानला मोबदला मिळत असला तरी हा खर्च परकीय सरकार येथे होतें म्हणूनच करावा लागे हें उघड आहे. परकीय सरकार येथे नसतें तर अशा प्रकारचा खर्च हिंदी शासनास करावा लागलाच असता. फक्त त्याबद्दल इतके पैसे परदेशीच लोकांना गेले नसते व त्याचे दुष्परिणाम टाळतां आले असते येवढेच.

हिंदुस्थान सरकारमार्फत जाणारी खंडणी १०३/४ कोटी असा एकंदर हिशोब रानडे यांनी दिला आहे. त्याच्याच अनुषंगाने येणारी खंडणीहि विचारांत घेतली पाहिजे तिचा उल्लेख पहिल्या व्याख्यानांत ओझरता व दुसऱ्या व्याख्यानांत अधिक विस्तृत व ठळक केला आहे. चीनला निर्यात होणाऱ्या अफूवरील कराचें उत्पन्न ही हिंदुस्थान सरकारला चिनी लोकांकडून मिळणारी खंडणी. अफूच्या निर्यातीवरचा कर अफू विकत घेणारे चिनी लोकच प्रायः देत असल्यामुळे त्यापासून येणारा वसूल हा सरकारला मिळणाऱ्या खंडणीच्या स्वरूपाचाच. (चीनला त्याऐवजी कांही मोबदला मिळत नाही ही त्याची दुसरी बाजू.) हिंदुस्थान सरकारला द्यावी लागणारी ऐन खंडणी काढावयाची तर यांची वजावट केली पाहिजे. अफूवरील या करापासूनचें दरवर्षींचें उत्पन्न ७–८ कोटींच्या घरांत असें. आपण हिशोबासाठी सरसकट ७ कोटी धरूं. हें १०३/४ कोटींतून वजा टाकल्यास ऐन खंडणी ३३/४ कोटीचीच उरते. सरकारी वसुलांतील किती भाग खंडणीपायीं परदेशीं जातो याचें विवेचन करतांना रानडे यांनी एकंदर वसुलांतून अफूच्या कराचें उत्पन्न वजा करून त्याच्याशी १६ कोटी खंडणीचें प्रमाण १:३ आहे असें म्हटलें आहे. त्यामुळे खंडणीसंबंधीची वाचकांची विकृत कल्पना होते. (पान ५). वर केलेल्या हिशोबाने हिंदुस्थान सरकारच्या ५० कोटी वसुलाशी किंवा अफूच्या कराचें उत्पन्न वजा करून ४३ कोट वसुलाशी, या ३३/४ कोटीचें प्रमाण १४ वा किंवा १२ वा हिस्सा असें पडतें. रानडे यांनी तिसरा हिस्सा असा हिशोब करतांना हिंदुस्थान सरकारनेच द्यावयाच्या खंडणीचा विचार न करतां सर्व खंडणीचा केला आणि येणारी चीनची खंडणी जाणाऱ्या खंडणींतून वजा न करतां ती एकंदर वसुलांतून वजा केली. त्यामुळे खंडणीचें वसुलाशी प्रमाण फारच फुगलें, म्हणजे १:३ झालें. वरच्याप्रमाणें नीट हिशोब केल्यास तें १:१४ ते १:१२ येतें व मग तें प्रमाण फार अवाढव्य भासत नाही. येथे रानडे यांचा हिशोबाचा घोटाळा झालेला दिसतो.

(ऐ) याच अनुषंगाने दुसरी एक लक्षांत घ्यावयाची गोष्ट म्हणजे हिंदुस्थान सरकारचें देणें व देशाचें देणें यांतील फरक. हिंदुस्थान सरकारला

जी खंडणी द्यावी लागते. ती त्यांच्या वसुलांतून खर्च पडते. म्हणजे ते रुपये खर्चून खंडणी द्यावयासाठी लागणारी हुंडणावळ (पौंड) त्या खात्याकडून विकत घेऊन ते इंग्लंडला भरले जातात. हुंडणावळ खात्याकडे जमणारे पौंड यापूर्वींच दाखविलेल्या सर्व हिंदुस्थान देशाच्या परदेशी आयव्ययाच्या तक्त्यांतील तपशिलाप्रमाणे आहेत. त्यांतील आयव्ययाचे पोटतपशील फक्त सरकारी आयव्ययाचा नसून सर्व देशाच्या परदेशी आयव्ययाचा आहे हें सहज लक्षांत येईल. हिंदुस्थान सरकारला द्यावयाची खंडणी वाढली तर त्यांच्या वसुलांतील अधिक भाग त्यासाठी खर्च होईल. पर्यायाने हिंदुस्थान सरकारला ही रक्कम उभारण्यासाठी आपला वसूल वाढवावा लागेल. म्हणजेच कर वाढवावे लागतील. हें कर हिंदी लोकांवर बसले म्हणजे त्यांना आपल्या उत्पन्नांतून ते द्यावे लागतील त्यासाठी त्यांना आपल्या जवळचा जादा माल विकावा लागेल. तो या देशांत विकला काय किंवा परदेशीं विकला काय (म्हणजे निर्यात केला काय) सारखेंच. जेथे फायदा जास्त येईल—भाव जास्त चांगला मिळेल, तेथे तो विकणेंच श्रेयस्कर—परंतु या सर्व व्यवहारांत तो परदेशींच विकला पाहिजे असें मात्र मुळींच नाही. देशांत विकूनहि कर भरतां आले तरी चालते. रानडे यांच्या विवेचनांत यासंबंधी घोटाळा झालेला आहे. हिंदुस्थान सरकारचा वसूल वाढल्यामुळे हिंदुस्थानांतून निर्यात होणाऱ्या मालाचें प्रमाण वाढलें आहे असें त्यांनी प्रतिपादिलें आहे. त्यांतील कार्यकारण भाव चुकीचा आहे. खंडणी वाढली, वसूल वाढला, निर्यातहि वाढली हें आंकड्यांनीच सिद्ध आहे. परंतु तें परस्पराचें कारक आहेत असें त्यावरून मानणें बरोबर नाही.

रानडे यांनी स्वतःच दिलेल्या आंकड्यांवरून पाहतां सरकारी वसूल १८३४–३९ साली सरासरीने २२ कोट होता तो १८६९–७२ मध्ये सरासरीने ५० कोटीवर आला. (पान ३५). याच मुदतींत निर्यात व्यापार १८३४-३५ सालीं ८ कोटींचा होता तो १८६९–७० मध्ये ५३ कोटीपर्यंत वाढला (पान ६). एकंदर खंडणी ३॥ कोटीवरून १८५६ मध्ये १६ कोटीपर्यंत वाढलेली दिसते. सरकारी वसूल वाढला तो करवाढीमुळे सर्वस्वी वाढला नसून नवीन मुलूख (नागपूरचें राज्य, सिंध वगैरे) इंग्रज सरकारचे अंमलाखाली आल्यामुळेंहि वाढला होता. निर्यात वाढीचें मुख्य कारण हिंदी मालास वाढती परदेशची मागणी. ह्या वेळीं हिंदुस्थानांतील शेतीचें व्यापारीकरण होत होतें व खाऊ पिकाऐवजी विकाऊ पिकें काढण्याची प्रवृत्ति बळावत होती. कापूस, ताग, चहा, नीळ यांचें उत्पादन वाढत होतें आणि त्यांना परदेशची मागणीहि पुष्कळ

होती. परदेशाला पाठविण्यासाठींच यापैकी बराचसा माल येथे निर्माण होत होता; आणि त्याला किंमतहि परदेशीं चांगली येत असल्यामुळे तो निर्यात करणें हें आर्थिकदृष्ट्या हिंदुस्थानच्या फायद्याचेंच होतें. त्या मालाला मागणी नसती तर तो निर्यात करतां आला नसता हें उघड आहे. सर्वसाधारणपणें कर वाढल्यामुळें हा माल बाहेर पाठवावा लागतो असें जें रानडे यांनी प्रतिपादिलें आहे तें बरोबर नाही.

रानडे यांच्या या व्याख्यानांतील विवेचनाबद्दल आज येणाऱ्या ठळक शंकांचा येथपर्यंत निर्देश केला. आतां कांही किरकोळ गोष्टींकडे वळूं.

हीं व्याख्यानें जशीं १८७२ मध्यें छापलीं होतीं तशींच येथे छापलीं आहेत. जेथे अगदी उघड उघड मुद्रणदोष होता तेथे तो दुरुस्त केला आहे. त्याचप्रमाणे कोष्टकांतील आंकडे मुळाशी ताडून पाहतां कांही ठिकाणी ते चुकले आहेत असें आढळलें. यासाठी या मूळ पुस्तकांत छापलेले आंकडे व त्यांच्याच साली रानडे यांनी जेथून ते आंकडे घेतले त्या प्रकाशनांतील संपूर्ण आंकडे कोष्टकांतून दिले आहेत. त्यामुळे वाचकांची सोय होईल. परिशिष्टांत दिलेल्या कोष्टकांवरील टीपांतून यांचा संपूर्ण खुलासा केला आहे. स्वतः रानडे यांनी एकाच बाबीसंबंधीचे आंकडे दोन ठिकाणी निरनिराळे दिले आहेत. त्यांत बदल केलेला नाही. उदाहरणार्थ, पान १० वर देशांतील एकंदर बचतीचा अंदाज ६०–६५ कोट रुपये केला आहे पण पान १५ वर दरसालच्या संचयाचा आंकडा ७५ कोटी रुपये धरला आहे. किंवा पान ४–५ वर एकंदर खंडणीचा हिशोब १६ कोट रुपये केला आहे. परंतु दुसऱ्या व्याख्यानाच्या आरंभीं (पान १९) खंडणीचा अंदाज १२ ते १५ कोटी रुपये इतकाच केला आहे. नजरचुकीने किंवा मुद्रणदोषाने असा प्रकार होऊं शकेल. परंतु त्याचें नकी स्वरूप ठरविणें शक्य नसल्यानें मूळचेंच कायम ठेवलें आहे.

हिंदी अर्थशास्त्राचा पाया घालणाऱ्या न्यायमूर्ती रानडे यांच्या या दुर्मीळ मराठी व्याख्यानांचें हें पुनर्मुद्रण करून तें प्रसिद्ध करण्यास गोखले अर्थशास्त्र संस्थेस आनंद आणि अभिमान वाटत आहे.

गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणें ४.
२० नोव्हेंबर १९६३

नी. वि. सोवनी

# व्यापारसंबंधी व्याख्यानें

रा० ब० माधवराव गोविंद रानडे फर्स्टक्लास

फर्स्टग्रेड स० जज्ज,

यांणीं

## पुणें व्यापारोत्तेजक मंडळीपुढें दिलीं.

तीं,

लोककल्याणेच्छु वर्तमानपत्रावरून

पुनः तपासून शुद्ध करून,

रा० रा० विनायक बाळकृष्ण दामले, म्यानेजर

लोककल्याणेच्छु यांणीं सर्वांच्या उपयोगाकरितां सर्व एकत्र करून

त्यांचें हें लहानसें पुस्तक छापून तयार केलें आहे.

किंमत ४ आणे, टपाल व बंगी खर्च० ०२

हें पुस्तक पुणें येथें " विठ्ठल सखाराम अग्निहोत्री " यांचे
छापखान्यांत छापिलें. माहे आगष्ट. १८७३. इसवी.

# प्रस्तावना

तारीख ८ दिसेंबर सन १८७२ इसवी रोजीं फडतरे यांचे वाड्यांत हिंदुस्थानांतील द्रव्यसंपत्ती कमी झाली ती वाढविण्याविशीं व हिंदुस्थानांत कलाकौशल्य ज्यास्ती वाढविण्याचें कामीं लोकांस उत्तेजन मिळण्याकरितां कोणते उपाय करावे या विषयावर रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांणीं पुणें व्यापार कंपनीच्या सभेंत त्या कंपनीस जो रपोट केला त्यापैकीं राव बहादूर माधवराव गोविंद रानडे यांणीं :—

१. मित व्यय व्हावा आणि तो असा व्हावा कीं, जो आपला खर्च आहे त्यापैकीं निदान एकतृतीयांश बचून आपले संग्रहास पडेल.

२. कलाकौशल्य व कारखाने वाढविणेंविषयीं लोकांस उत्तेजन येण्याकरितां मितव्ययापासून संग्रह होईल तो आपले देशांत तयार झालेले अगर उत्पन्न झालेले जिनसांचा खप हल्लीं होते आहे त्यापेक्षां आपल्या संसाराच्या कामीं ज्यास्ती होण्याकडे लागावा.

या दोन विषयांवर दोन व्याख्यानें दिलीं. त्या दोन व्याख्यानांचा सारांश या पुस्तकांत घेतला आहे.

सदहू दोन्ही व्याख्यानें लोककल्याणेच्छु वर्तमानपत्रांत छापिलेलीं आहेत. परंतु तीं वेगळ्या वेगळ्या पत्रांतून थोडथोडीं असल्यामुळें वाचणारांस एकदम सर्व व्याख्यान पहाण्यास व पूर्वापर संबंध जुळण्यास अडचण पडते, ती अडचण पडू नये व हा अत्यंत उपयुक्त विषय निरंतर सर्वांच्या डोळ्यांपुढें रहावा या हेतूनें तीं सर्व व्याख्यानें पुनः रा० ब० माधवराव गोविंद रानडे यांकडून तपासून घेऊन आम्हीं त्यांचें हें लहानसें पुस्तक करून सर्व स्वदेशाभिमानी लोकांस नजर केलें आहे.

विनायक बाळकृष्ण दामले
म्या. लो.

# राव बहादूर माधवराव गोविंद रानडे यांचीं व्याख्यानें

आज ही सभा ज्या संबंधानें भरली आहे, व ज्या गोष्टींचा विचार आमचे मित्र रा. रा. गणेश वासुदेव जोशी यांणीं आपले रपोटांत करण्याविषयीं सूचना केली, त्यांपैकीं मजला फक्त दोन विषयांवर चार शब्द बोलावे अशी सूचना आहे, त्या विषयांचें स्वरूप नीट ध्यानांत येण्यास (१) राजकीय व (२) व्यापार संबंधानें या देशांतील संपत्तीची कशी काय व्यवस्था आहे तिची प्रथम थोडी समजूत करून घेतली पाहिजे. त्याशिवाय या गोष्टींचा विचार लोकांचे मनांत येणार नाहीं, सबब त्याजबद्दल मी प्रथम थोडी हकीकत कळवीत आहे.

## (१) राजकीय संबंधानें संपत्तीची स्थिती

हिंदुस्थानांतील लोक हल्लीं जे कांहीं उद्योग करीत आहेत, त्या उद्योगानें जितकी द्रव्यसंपत्ति हिंदुस्थानांत वाढावी असें वाटतें त्या मानानें वाढत नाहीं. या संबंधानें लोकांची अशी ओरड आहे कीं, आपण करावयाची तितकी मेहनत करीत असतां व उद्योग करीत असतां असें कां व्हावें? असें बोलून नेहमी लोक कुरकुर करतात, परंतु त्यांस त्याची कारणें काय हें समजत नाहीं. जसे एखाद्या रोग्यास धातुक्षयाचा विकार झाला म्हणजे बाह्य दर्शनीं प्रकृतींत विपरीत प्रकार दिसत नाहीं, तथापि दिवसें दिवस शक्तीचा ऱ्हास होतो, व आपणास काय होतें हें ज्याचें त्यास कळत नाहीं, तद्वत् या देशाच्या संपत्तीची दशा झाली आहे. त्यास अशी दशा आपल्या देशास प्राप्त झाली आहे त्याची कारणें मुख्य दोन आहेत. परदेशस्थ लोक हिंदुस्थानांत राज्य करणारे आहेत हें एक, आणि हिंदुस्थानांत कलाकौशल्य व कारखाने पाहिजेत तितके वाढविण्याजोगें आपल्यापाशीं साधन नाहीं, हें दुसरें कारण होय.

परदेशस्थ राज्यकर्ते हिंदुस्थानांत असले कारणानें जी देशांतील संपत्तीची व्यवस्था होत आहे त्या विषयीं विचार पाहातां, हिंदुस्थानांत खुद्द इंग्रज सरकारचे ताब्यांत जो मुलुख आहे त्याचें क्षेत्र ९ लक्ष चौरस मैल आहे. त्यांत सुमारें १५ कोटींहून थोडी जास्त प्रजा राहते. तिजपासून इंग्रज सरकारास दर साल ५० कोट रुपये वसूल येतो. त्यापैकीं लोकांवर कर व धारे आहेत त्यांचें उत्पन्न पंचेचाळीस कोटींहून जास्ती आहे. बाकी सुमारें सहा कोट रुपये चिनी लोकांकडून अफूचे व्यापाराचे संबंधानें सरकारास ऐन नफ्याचे येतात, ह्मणून ते रुपये आपले देशास मिळतात असें ह्मटलें पाहिजे. हें कराचें ओझें वरील प्रजेवर सारिखें वाटलें असतां दर माणशीं दर साल ३ रुपये बसतात. आतां पंधरा कोटी प्रजेपैकीं एक तृतीयांश बायका व एक तृतीयांश मुलें आहेत तीं वजा केलीं असतां काम धंदा करणारीं ५ कोट मनुष्यें राहतात, त्यांवर ४५ कोट सारखे वांटले तर दरसाल दर माणशीं ९ रुपये प्रमाणें बसतात.

हिंदुस्थानांत जे नेटिव मांडलिक राजे रजवाडे व संस्थानी वगैरें आहेत त्यांचे ताब्यांत जो मुलुख आहे त्याचें क्षेत्र सुमारें ६ लक्ष चौरस मैल आहे. त्यांत पांच कोट प्रजा राहते. तिजपासून त्यांजला दरसाल २० कोट रुपये वसूल येतो. त्या लोकसंख्येवर कर व धाऱ्याचे रुपये सारखे वांटलें असतां दरसाल दर माणशीं ४ रुपये प्रमाणें आकार बसतो. त्या लोकसंख्येपैकीं बायका मुलें मिळून दोन तृतीयांश कमी करून फक्त काम करणाऱ्या पुरुष संख्येवर कराची रक्कम सारखी वांटली असतां दरसाल दर माणशीं १२ रुपये कर बसतो.

वर लिहिलेले ठोकळ तपशिला वरून असें दिसतें कीं, इंग्रज सरकारचे ताब्यांत राहणारे लोकांस दर मनुष्यास सरकार देणें रुपये ९ व आपले राजे व संस्थानिक यांच्या प्रजेस दर मनुष्यास सरकार देणें रुपये १२ या प्रमाणें पडतें. यावरून इंग्रज सरकारचे प्रजेवर कर व धाऱ्याचा बोजा आहे, त्याहून नेटिव संस्थानांतील प्रजेवर जास्ती धाऱ्याचा अजमास

दिसतों, तथापि त्यांच्यापेक्षां इंग्रजी अंमलांत प्रजेची ज्यास्ती नागवण होत आहे असें पुढील दृष्टांतावरून दिसून येईल.

एका कुटुंबाचे संबंधानें हा विचार सहज ध्यानांत येतो. पाहा, एका कुटुंबांत कांहीं माणसें श्रम करितात, व कांहीं आळशी बसून खातात, तथापि एकत्र कुटुंबाचा संसार चालत आहे तोंपर्यंत कुटुंबांतील कुटुंबांतच एकाच्या हातून किंवा दोघांच्या हातून त्या समाईक प्राप्तीचा व्यय होतो हा एक प्रकार. आतां असें न होतां सदर्हू कुटुंबांत कोणी आळशी माणसें नाहींत अशी कल्पना केली. व मेहेनती माणसांस आपल्या कुटुंबांतील आळशी माणसें पोसण्याचें कमी झालें, त्या ऐवजीं त्या कुटुंबाखेरीज दुसऱ्या कुटुंबास, वर्षास जो कांहीं पैसा पूर्वीं आळशी माणसें खाऊन जात होतीं त्याहून कमी पैसा वरात करून पाठवून द्यावा असा हुकूम झाला, तर एकंदर कुटुंबाचे व प्रपंचाचे संबंधानें पहिल्या गोष्टीपासून जितकी त्या कुटुंबाचे समुदायाची हानी होते, त्यापेक्षां दुसऱ्या व्यवस्थेनें अधिक हानी होतें. तद्वत् आपली सांप्रतची स्थिति आहे.

वर लिहिल्याप्रमाणें इंग्रज सरकार उत्पन्न करीत आहे त्यापैकीं हिंदुस्थानांतील हिंदुस्थानांत किती पैसा राहतो त्याचा तपशील पाहूं जातां दरसालाचा अजमास असा आहे कीं, पन्नास कोटी वसुलापैकीं अजमासें साडे दहा कोट रुपयांची वरात हिंदुस्थानचे सरकारास विलायतेंत हिंदुस्थानचे संबंधानें जें राज्यप्रकरणीं खर्चाबद्दल देणें पडतें त्याचे तजविजीकरितां धाडून द्यावी लागते त्याचा पोट तपशील येणेंप्रमाणें.

१॥ कोट रुपये हिंदुस्थानच्या सरकारी कामाकरितां विलायतेस माल खरेदी होऊन येतो त्याचा अजमास.

॥ कोट जे रुपये नौकर लोक विलायतेस आहेत, त्यांचा पगार व इस्टाब्लिशमेंटचा खर्च अर्धा कोट.

२॥ कोट लष्करांत उमेदवार लोक नवीन ठेवतात त्याचा खर्च व आरमार संबंधीं खर्च.

४॥ कोट हिंदुस्थानचें राज्य ब्रिटिश लोकांनीं प्रथम काबीज केलें व त्याचें वेळोवेळीं संरक्षण केलें, त्या संबंधानें सरकारास जें कर्ज झालें त्याचा एकंदर अजमास सुमारें १०० कोट रुपये आहे. त्यांपैकीं अजमासें पांच पासून दहा कोट रुपये कर्ज नेटिव लोकांनीं सरकारास दिलें आहे त्याचें व्याज आपल्या लोकांस मिळतें तें खेरीज करून बाकी ९० कोट रुपयांचें सालीना व्याज विलायतेचे लोकांस आपण भरतों त्याचा अजमास.

१॥ सदहू रकमेशिवाय विलायतेच्या लोकांनीं या देशांत रेल्वे बांधून गाड्या चालूं केल्या त्या रेल्वेच्या कामांत सुमारें ९० कोट रुपये खर्च केले त्याबद्दल दरशेंकडा पांच रुपये प्रमाणें व्याज देण्याची जामीनकी सरकारानीं घेतली आहे. त्या रकमेचें व्याज ४॥ कोट रुपये होतें. पैकीं रेल्वेचा खर्च भागून उत्पन्न राहतें तें वजा करून निवळ सरकारास नुकसान भरून द्यावें लागतें त्याचा आकार अलिकडे कांहीं वर्षें सुमारें १॥ कोट रुपये होतो.

---

१०॥

५॥ कोट रुपये सदहू शिवाय या देशांत लष्करचे अंमलदार युरोपियन लोक सुमारें ७००० आहेत व लष्करचे युरोपियन शिपाई सुमारें ६०००० आहेत. तसेंच सिविल अंमलदार लहान मोठे युरोपियन सुमारें ५००० आहेत. बाकी व्यापारी उदमी वगैरे लोक मिळून युरोपियन दीड लाख लोकांचा अजमास आहे. त्या सर्व लोकांस पगार व प्राप्त्या मोठ्या असोन त्यांचा संचय होतो तो सर्व विलायतेस जातो. त्याचा आपले लोकांचे निर्वाहाचें कामीं कांहीं उपयोग होत नाहीं. या रकमेचा आकार करवत नाहीं, परंतु साधारण अजमास पुष्कळ विचारानें साडेपांच कोट रुपये धरला असतां ज्यास्ती धरल्याचा दोष येणार नाहीं.

एकंदर १६ कोटि रुपये यावरून असें दिसेल कीं, परदेशस्थ

लोकांचें राज्य हिंदुस्थानांत असल्या कारणानें दरसाल १६ कोट रुपये विलायतेस खंडणी धाडावी लागते.

आपले नेटिव राज्यकर्ते यांचें उत्पन्न दुसरीकडे कोठेंही जात नाहीं. तें सर्व आपले देशांतच राहतें. राजे लोकांनीं पैसा उधळला तरी त्याचा ज्या लोकांत व्यय झाला असतां पैशास बरकत येणार तशा लोकांत व्यय न होतां दरबारी लोक किंवा रांडा पोरें व भट भिक्षुक यांत उधळला जातो, तथापि हे लोक सधन झाल्यानें शेवटीं एकंदर देशांतील लोकांस रोजगार व आश्रय मिळण्याचें कामीं ह्या पैशाचा विनियोग होतो.

वर जो तपशील सांगितला आहे त्याजवरून असें दिसेल कीं, हिंदुस्थानांत जो इंग्रज सरकारचा मुलख आहे त्यांतील प्रजेपासून जें उत्पन्न होत आहे त्या उत्पन्नापैकीं आजमासें दोन हिस्से उत्पन्न येथें खच होतें, व एक हिस्सा म्हणजे १६ कोट रुपये विलायतेस जातात, आणि नेटिव राजे यांचें सरकार देणें त्यांच्यो प्रजेस जरी ज्यास्ती पडतें, तथापि तो पैसा देशाचें बाहेर जात नसल्यामुळें त्या द्रव्याचा उपयोग दुसरें द्वारानें प्रजेस होतो, याजविषयीं कुटुंबाचा दृष्टांत वर सांगितला आहे त्याप्रमाणें नेटिव संस्थानाच्या प्रजेची इंग्रजी अंमलांतल्या प्रजेप्रमाणें नागवण होत नाहीं.

## (२) व्यापाराच्या संबंधानें या देशांतील संपत्तीची स्थिती.

आपल्या देशाचा परदेशस्थ लोकांशीं व्यापार चालला आहे त्याचा तपशील खालीं लिहिला आहे. हल्लीं दहा पांच वर्षे हिंदुस्थानचा माल बाहेर जातो व हिंदुस्थानांत परदेशांतील माल येतो त्याची एकंदर बेरीज सरासरी शंभर कोट रुपये होत आहे. सन १८३४–३५ सालीं ही बेरीज सुमारें पंधरा कोट होती. तेव्हां पासून वाढत वाढत १८४८–४९ सालीं तीस कोट रुपये झाली. त्या पुढील दहा वर्षांत ५० कोट झाली. व त्याच्या पुढील दहा वर्षांत शंभर कोट होऊन बसली आहे. मध्यंतरी कापसाचे गर्दींत

दोन सालें १२५ कोटीपर्यंत आंकडा चढला होता. सन १८३४–३५ सालीं बाहेर मुलुखांतून पांच कोट रुपयांचा माल आपले देशांत आला. आणि आठ कोट रुपयांचा माल परदेशांत गेला. सन १८४८–४९ सालीं नऊ कोट रुपयांचा माल आपले देशांत बाहेरून आला, आणि पंधरा कोट रुपयांचा बाहेर गेला. सन १८५८–५९ सालीं १६ कोट रुपयांचा माल बाहेरून आला, आणि पंचवीस कोट रुपयांचा माल बाहेर गेला. पुढें १८६४–६५ व १८६५–६६ सालांत मिळोन ५८ कोट रुपयांचा माल आला व १३३ कोट रुपयांचा माल गेला. आलीकडे १८६९–७० सालीं ३३ कोट रुपयांचा माल आला व ५३ कोट रुपयांचा माल बाहेर गेला असा अजमास आहे. सदरील तपशिलावरून जितका माल बाहेर जातो त्यापेक्षां माल बाहेरून देशांत कमी येतो अशी नेहमीं व्यवस्था आहे असें दिसून येईल. सदरील जें अंतर राहतें त्या ऐवजीं कांहीं रुपें व सोनें येतें त्याचा अनमास १८३४–३५ सालीं दोन कोट रुपयांचा होता. तीन कोट रुपयांचें सोनें १८४८–४९ सालीं आलें. मध्यें १८६५ व १८६६ सालीं सुमारें २५ पासून ३० कोटी रुपयांचें सोनें रुपें आलें. आलीकडे हें मान पुनः कमी म्हणजे सुमारें दहा कोट रुपये झालें आहे. याप्रमाणें व्यवस्था आहे.

विलायतेहून माल येतो त्याचा तपशील. कापड व सूत पूर्वीं १८५०–५१ सालीं ५॥ कोट रुपयांचें आलें, १८६९–७० सालीं १३॥ कोट रुपयांचें आलें. लोंकरी व रेशमी कापड पूर्वीं १८५०–५१ सालीं ५० लाख रुपयांचें आलें. आलीकडे एक कोट रुपयांचें येतें. दारू वगैरे मादक जिन्नस ४० लाख रुपयांचा १८५०–५१ सालीं आला. हल्लीं एक कोट दहा लक्ष रुपयांचा माल येतो. कोळसे वगैरे सात लाख रुपयांचा माल १८५०–५१ सालीं आला. हल्लीं एक कोट रुपयांचा दरसाल सदर माल येतो. तांबें, पितळ, लोखंड कच्चें व तयार केलेलें वगैरे दीड कोट रुपयांचे १८५०–५१ सालीं आलें. हल्लीं तीन कोटी रुपयांचा

सदर माल येतो. आगगाडीचे संबंधाचा माल सन १८५०–५१ सालापर्यंत कांहीं येत नव्हता पण हल्लीं एक कोट रुपयांचा माल येतो. मीठ पूर्वी ४० लाख रुपयांचें येत होतें. हल्लीं ७० लाख रुपयांचें मीठ विलायतेहून येतें. पुस्तकें कागद वगैरे पूर्वी १८५०–५१ सालीं १४ लाख रुपयांचा माल येत होता. हल्लीं ३० लाख रुपयांचे सदर जिन्नस येतात. सदर्हूप्रमाणें या बाहेरून येणाऱ्या मालाचा तपशील आहे.

इकडून माल विलायतेस व अन्य देशी जातो त्याचा तपशील:— काफी, १८५०–५१ सालीं सहा लाख रुपयांची बाहेर गेली. हल्लीं ४० लाख रुपयांची काफी जाते. कापूस १८५०–५१ सालीं २ कोट रुपयांचा गेला. हल्लीं १५ कोट रुपयांचा कापूस जातो. नीळ पूर्वी १॥ कोट रुपयांची जात असे. हल्लीं दोन कोट रुपयांची जाते. धान्य १३ लक्ष रुपयांचें जात होते. हल्लीं सव्वा कोट रुपयांचें जातें. कातडीं पूर्वी म्हणजे १८५०–५१ सालीं वीस लाख रुपयांची जात होतीं. हल्लीं सव्वा कोट रुपयांचीं जात आहेत. करडई वगैरे तेलाचे जिन्नस ४० लक्ष रुपयांचे जात होते. हल्लीं पावणे तीन कोटींचा सदर माल जातो. सोरा मीठ २० लक्ष रुपयांचें सन १८५०–५१ सालीं गेलें. हल्लीं २३ लाख रुपयांचें जातें. १३ लाख रुपयांच्या शाली सन १८५०–५१ सालीं गेल्या. हल्लीं ६० लाख रुपयांचा सदर माल जातो. रेशीम ६० लाख रुपयांचें १८५०–५१ सालीं गेलें. हल्लीं एक कोट दहा लक्ष रुपयांचें जातें. साखर पूर्वी पावणे दोन कोटींची जात होती. हल्लीं २४ लाख रुपयांची जाते. लोकर पूर्वी ६ लाख रुपयांची जात होती. हल्लीं ४० लाखांची जाते.

सदर्हू तपशिलावरून आपले देशाचा व्यापार वाढत आहे. असें सहज दिसून येईल. मात्र त्यांत दोष येवढाच आहे कीं, एकंदरींत कच्चा उत्पन्न झालेला माल इकडून फार जातो व कलाकौशल्यानें तयार झालेला माल तिकडून फार येत आहे. ही सांप्रतची व्यापाराची स्थिति आहे.

वर जो सविस्तर तपशील दिला आहे त्यावरून दोन तीन गोष्टी सर्वांच्या ध्यानांत येतील त्या येणेंप्रमाणें.

१ परदेशस्थ लोकांचा अंमल हिंदुस्थानांत असल्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांच्या मेहनतीनें उत्पन्न झालेले द्रव्यापैकीं १६ कोट रुपयें दरसाल विलायतेस धाडावे लागतात. त्या ऐवजीं राजकीय दृष्टीनें स्वस्थता, व समर्थ देशाचा आश्रय आपणांस मिळतो, या गोष्टी कबूल आहेत; परन्तु व्यापाराच्या संबंधानें हल्लींचे प्रभु विलायतेस न राहतां याच देशांत वस्ती करून सत्ता चालवितें, तर वर सांगितल्याप्रमाणें १६ कोट रुपये दरसाल या देशांतून न जातां, त्यांतील दोन हिस्से तरी याच मुलखांतील लोकांस धंदे व रोजगार मिळण्याचें कामीं खर्च झाले असते. आपल्या देशासारख्या दरिद्री देशांस दहा पासून बारा कोटींचा रोजगार नवीन मिळाल्यास किती जीवन होणार आहे याची कल्पना सर्वांनी करावी.

२ दुसरी गोष्ट अशी आहे कीं, विलायत व इतर देशाशीं आपला जो व्यापार चालतो त्या व्यापारांत साधारणपणें जितका माल या देशांतून बाहेर जातो त्याहून अधिक किंवा तितका तरी तिकडचा माल या देशांत यावा असा सिद्धान्त असून, या देशाचे व्यापारांत या संबंधानें उलट व्यवस्था दिसून येते, म्हणजे इकडून माल जातो त्याऐवजीं तितक्या किंमतीचा माल या देशांत येत नाहीं. मागील सालीं ५२ कोटींचा माल गेला त्याचे ऐवजीं ३२ कोटींचा माल देशांत आला. याप्रमाणें बहुतकरून प्रारंभापासून व्यवस्था आहे. अशी व्यापाराची स्थिति दुसरे देशाची नाहीं. मागील वीस वर्षांत आपला व्यापार पुष्कळ वाढला असून ह्या व्यवस्थेंत बदल झाला नाहीं. असा प्रकार जोंपर्यंत चालत आहे तोंपर्यंत व्यापारांत एकंदर देशास बरकत येण्यास अडचण आहे हें उघडच आहे.

३ विलायतेशीं आपला व्यापार चालतो. त्या संबंधानें ध्यानांत ठेवण्याजोगी तिसरी गोष्ट आहे ती अशी कीं, पूर्वीं तपशिलवार कळविल्या-

प्रमाणें दिवसेंदिवस कच्चा माल आपल्या देशांतून ज्यास्ती जातो व कलाकौशल्याच्या योगानें कमावून पक्का केलेला माल विलायतेहून आपले देशांत ज्यास्ती येतो, यामुळें या देशांतील कारागार लोकांस उद्योग राहिला नाहीं असें झालें आहे. सर्वांची प्रवृत्ती विलायती जिनसाकडेस दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें स्वदेशीय जिनसांचा खप संसाराच्या सर्व कामांत कमी कमी होत आहे.

ह्या तीनहि गोष्टी सर्वत्रांनीं ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. अदमासें १६ कोट रुपये देशांतील संचयापैकीं विलायतेस दर साल जातात, त्या संबंधानें या देशास दरिद्र येईल किंवा नाहीं, याचा विचार क्षणभर करूं. हिंदुस्थानांतील इंग्रजी अंमलाखालच्या प्रजेची दर सालची प्राप्ति काय आहे याचें मान पाहूं गेलें असतां दर शेंकडा एक रुपया इन्कमटाक्स बसला असतां सुमारें एक कोट रुपये उत्पन्न होतात, असा अजमास इन्कमटाक्स आज दहा बारा वर्षें या देशांत रूपांतरानें चालू आहे त्यावरून ठरविलेला आहे. ज्याअर्थीं एक कोट रुपयांचें उत्पन्न दर शेंकडा एक रुपया कर घेतल्यानें होतें, त्याअर्थीं संचय करणारे लोकांची प्राप्ति शंभर कोट रुपये सुमारें होती असा निश्चय होतो. या कर देणाऱ्या प्रजेपाशींच संचय होण्याचा संभव आहे, कर न देणारे जे लोक आहेत त्यांच्या प्राप्तीचा सर्व व्यय चरितार्थाकडेसच होतो, यामुळें देशांतील संचयाच्या संबंधानें त्या लोकांविषयीं विशेष विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. आतां प्राप्तीचा अजमास सरकारी अंमलदारास बरोबर लागत नसेल, कारण लोक आपलें उत्पन्न लबाडीनें कमी सांगतात, असें मानलें तरी दोनशें कोट रुपयांहून ज्यास्ती आपल्यांतील समर्थ व संचय करणारे लोकांची दर सालाची प्राप्ती नाहीं हें उघड सर्व कबूल करतील. आतां या दोनशें कोट रुपयांतून सर्व खर्चवेच वजा केला पाहिजे तेव्हां संचय किती होतो हें समजेल. आपले प्रत्येकाचे अनुभवावरून प्राप्तीच्या निम्मे

मानानें खर्च करणारे कांहीं थोडे लोक आहेत ते खेरीज करून वरकडांचे प्राप्तीचा एक तृतीयांश संचय झाला असतां ते लोक आपल्यास मोठे भाग्यशाली मानतात. तसें मान धरलें असतां सुमारें साठ पासष्ट कोट रुपये आपल्यांतील समर्थ लोकांचा संचय आहे, म्हणजे इंग्रजी अंमलाखालील एकंदर देशांतील संचय दरसाल साठ पासष्ट कोट रुपये होतो, असें म्हटलें असतां चालेल. आतां सरकारी वसुलाची बेरीज चाळीस पंचेचाळीस कोटी आहे ती सर्व संचय करणारांपासूनच सरकार उत्पन्न करितें असें नाहीं. त्यांतील दोन हिस्से वसूल गरीब प्रजेपासूनच प्राप्त होतो, तथापि तूर्त प्रसंगीं कराचें ओझें हल्कें किंवा जबर आहे हा विचार नाहीं, एकंदर संचयाच्या संबंधानें विलायतेस जी खंडणी धाडावी लागते तिचें प्रमाण किती आहे हें पाहणें आहे. त्या मानानें पाहतां देशांतील जो निवळ संचय आहे त्याचा चवथा हिस्सा दरसाल विलायतेस जातो. म्हणजे आपले देशांतील लोकांनीं केलेल्या संचयांतील बारा आणे येथें राहतात, आणि चार आणे विलायतेस जातात. या चार आणे संचयाचा विनियोग याच देशांतील लोकांस रोजगार मिळण्याचें कामीं झाला तर किती लोकांचें पोषण होईल याची कल्पना सर्व लोकांनीं करावी. वर कुटुंबाचा दृष्टांत घेतला आहे. त्यास कुटुंबांतील म्हातारे व निकामी आईबापानीं अगर बायका मुलांनीं आपले कष्टार्जित द्रव्यापैकीं दर रुपयास सहा आणे खाऊन भस्म करावेत हें बरें, किंवा तीं सर्व माणसें आपण हाकून लावलीं, व त्यां ऐवजीं दर रुपयास चार आणे प्रमाणें कुटुंबाखेरीज तिऱ्हाइतास आपण खंड द्यावा असें ठरल्यास तें बरें? कुटुंबाचे एकंदर सुखास कोणती गोष्ट विशेष अनुकूळ किंवा प्रतिकूळ आहे हें सर्वत्रांनीं पाहावें. देशांतील उद्योगास बरकत कां नाहीं, सर्व लोक जिग जिग झालेले कां दिसतात, याचें कारण कोणीं विचारील तर या देशांतील संपत्तीचें वृद्धीस मोठा क्षार लागला आहे, तेणेंकरून आपल्या कष्टसाध्य

सामर्थ्याचें पाणी होऊन दिवसें दिवस आपणांस अशक्तता वाटते. ही अशक्तता एकंदरींत आपल्यास सुखकारक पुढें होणार असेल. परंतु व्यवहार दृष्टचा पाहिलें तर, जसें भांड्याच्या बुडीं मोठें छिद्र राखून आपण कितीही पाणी ओतलें तथापि भांडें भरून येणार नाहीं, त्याचप्रमाणें देशांतील लोकांचा इतका उद्योग वाढला असून देशाचें सामर्थ्य दिवसें दिवस शुष्क कां होत चाललें आहे, याचा विशेष चमत्कार कोणास वाटण्याचें कारण नाहीं.

असो, आपल्या इच्छेविरहित या देशांतील संचयाचा जो भाग विलायतेस परदेशस्थ लोकांच्या अमलाच्या संबंधानें जातो तो कमी करणें आपल्या स्वाधीनचें नाहीं. येवढें जबर ओझें आपणांस दरसाल वाहून वेठ वारावी लागते, तेणेंकरून आपल्या दृष्टीस अदृश्य असे अनेक लाभ होत असतील, त्याबद्दल तूर्त इतकाच विचार तहकूब ठेवून आपल्या देशाच्या संपत्तीस क्षयकारक असा दुसरा प्रकार आपल्या सर्वत्रांचे देखत सर्वत्रांच्या हातून घडत आहे त्याचा विचार करणें विशेष जरूरीचें आहे. तो प्रकार असा घडून येतो. जो संचय साठ पांसष्ट कोटी रुपयांचा दरसाल होतो ह्मणोन वर सांगितलें त्याच्या प्रमाणानें विलायतेस चवथ्या हिशाची खंडणी जाते, ती खेरीज करून दुसरी खंडणी आपण समुद्रास देतों, म्हणजे एकंदर संचयापैकी सुमारें अठवा हिस्सा आपण पाण्यांत नेऊन बुडवितों. हें बोलणें कोणाला अतिशयोक्तीचें वाटेल, परंतु यांत अतिशयोक्ति नाहीं. दरसाल आपणांमध्यें जेवढी संचय करणारी प्रजा आहे तिच्या हातून हा अनर्थ घडत आहे. याचा प्रकार येणेंप्रमाणें:—

या देशांत सोनें व रुपें पर मुलखांतून आलें, व आपल्या देशांतून बाहेर गेलें, याबद्दल सन १८६० पासून सन १८७० पर्यंत तपशिल पुढें लिहिल्याप्रमाणें कळून येतो :—

| साल | या देशांत किती सोनें व रुपें आलें त्याचा आकार — सोनें | रुपें | या देशांतून सोनें व रुपें बाहेर गेलें त्याचा आकार — सोनें | रुपें |
|---|---|---|---|---|
| १८६१ | ४ कोटी<br>४,२४,२४,४१० | ६⅓ कोटी<br>६,४३,४६,३६० | १ लाख<br>९८,७२० | ११० लाख<br>११०,६६,२७० |
| १८६२ | ५⅙ कोटी<br>५,१९,०४,३२० | ९¾ कोटी<br>९,७६,१५,४५० | ½ लाख<br>६०,०७० | ६७½ लाख<br>६७,५०,८९० |
| १८६३ | ७ कोटी<br>६,८८,१५,६९० | ७¾ कोटी<br>१३,६२,७३,९८९ | ३⅓ लाख<br>३,३४,१०० | १०७ लाख<br>१०७,७२,४२० |
| १८६४ | ८$\frac{1}{10}$ कोटी<br>८,९२,५४,१२० | १४ कोटी<br>१४,०३,७१,६९० | २¾ लाख<br>२,७१,०६० | १२४ लाख<br>१२४,०३,५२० |
| १८६५ | ९$\frac{1}{10}$ कोटी<br>९,८७,५०,३२० | ११½ कोटी<br>११,४८,८३,२०० | ३½ लाख<br>३,५०,६८० | १४१ लाख<br>१४०,९५,२२० |
| १८६६ | ६¾ कोटी<br>६,३७,२८,९४० | २०⅙ कोटी<br>२०,१८,४४,०७० | ६४½ लाख<br>६४,८४,१८० | १५४ लाख<br>१५३,८७,७४० |
| १८६७ | ४⅔ कोटी<br>४,५८,१४,७२० | ८⅔ कोटी<br>८,६५,५४,३२० | ७४ लाख<br>७३,९१,४३० | १७१ लाख<br>१७१,०७,९५० |
| १८६८ | ४¾ कोटी<br>४,७६,२३,७७० | ७ कोटी<br>६,९६,८०,८२० | १६ लाख<br>१६,५८,११० | १३७ लाख<br>१३१,५२,७८० |
| १८६९ | ४⅙ कोटी<br>५,१६,१७,५६० | १० कोटी<br>९,९८,७६,६८० | १२ लाख<br>१,७३,४९० | १३७ लाख<br>१३७,२९,९५० |
| १८७० | ५½ कोटी<br>५,६८,१३,६४० | ८½ कोटी<br>८,२३,४२,०३० | १२ लाख<br>९,७७,०२० | ८२ लाख<br>९२,२८,९६० |
| एकूण | ६० कोटी<br>६१,६७,४७,४९० | १०५ कोटी<br>१०९,३७,८८,६०० | १०९ लाख<br>१७७,९८,८६० | १२१५ लाख<br>१२२६,९५,७०० |

*परिशिष्ट टीप १ पहा.*

याची एकंदरींत बेरीज करितां सरकारी व खासगी व्यापाराचें संबंधानें मागील दहा वर्षांत १६५ कोट रुपयांचें सोनें व रुपें या देशांत आलें, व या देशांतून सुमारें १३ कोट रुपयांचें सोनें व रुपें बाहेर गेलें. बाकी सुमारें दीडशें कोटी रुपयांचें सोनें व रुपें शिल्लक राहिलें तें दहा वर्षांमध्यें वाटलें तर दरसाल १५ कोट रुपयांचें सोनें व रुपें या देशांतच राहिलें

असें कळून येतें. त्यापैकीं सरकारी नाण्यांकरितां सोनें व रुपें किती खर्च झालें याचा तपास पाहतां सरकारी टंकसाळींत सोनें, रुपें व तांबें यांचें नाणें मागील नऊ वर्षांत पाडलें त्याचा आकार.

सरकारी टंकसाळींत नाणें पाडण्यास सोनें, रुपें व तांबें दिलें तें

| साल | सोनें | रुपें | तांबें | एकूण |
|---|---|---|---|---|
| १८६१ | ७ लाख | ५$\frac{1}{5}$ कोटी | २४ लाख | ५$\frac{1}{2}$ कोटी |
| | ६,९३,७४० | ५,१९,१६,८२० | २४,२५,१२० | ५,५०,३५,६८० |
| १८६२ | ६ लाख | ७ कोटी | १५ लाख | ७$\frac{1}{3}$ कोटी |
| | ५,८६,६६० | ७,०७,०३,५२० | १५,०६,८१० | ७,२७,९६,९९० |
| १८६३ | १३ लाख | ९ कोटी | १५ लाख | ९$\frac{1}{2}$ कोटी |
| | १३,०६,६५० | ९,२५,१४,९७० | १५,०२,५४० | ९,५३,२४,१६० |
| १८६४ | ५$\frac{1}{2}$ लाख | ११ कोटी | २९ लाख | ११$\frac{4}{5}$ कोटी |
| | ५,४३,५४० | ११,४७,९६,८५० | २८,९१,०१० | ११,८२,३१,४०० |
| १८६५ | ९$\frac{1}{2}$ लाख | १० कोटी | २३ लाख | १०$\frac{4}{5}$ कोटी |
| | ९,५६,७१० | १०,४८,५८,६५० | २२,९८,६१० | १०,८१,१३,९७० |
| १८६६ | १$\frac{3}{4}$ लाख | ६$\frac{1}{2}$ कोटी | १४ लाख | ६$\frac{1}{3}$ कोटी |
| | १,७६,६२० | १४,५०,७०,७९० | २६,९३,३७० | १४,७९,४०,७८० |
| १८६७ | २$\frac{3}{4}$ लाख | ६$\frac{1}{5}$ कोटी | १४ लाख | ६$\frac{1}{6}$ कोटी |
| | २,७७,१७० | ६,१८,२६,६८० | १४,३५,६६० | ६,३५,३९,५१० |
| १८६८ | २ लाख | ४$\frac{2}{5}$ कोटी | २$\frac{1}{2}$ लाख | ४$\frac{1}{2}$ कोटी |
| | २,१५,३४० | ४,३८,२३,५९० | २,६३,६१० | ४,४३,०२,५४० |
| १८६९ | २$\frac{1}{2}$ लाख | ५$\frac{1}{3}$ कोटी | ९ लाख | ५$\frac{1}{2}$ कोटी |
| | २,५१,५६० | ५,३४,१७,०८० | ९,०२,१९० | ५,४५,७०,८३० |
| एकूण | ४० लाख | ७५ कोटी | १५८ लाख | ७७ कोटी |
| | ५०,०७,९९० | ७३,८९,२८,९५० | १५९,१८,९२० | ७५,९८,५५,८६० |

*पारिशिष्ट टीप २ पहा.*

सन १८७०–७१ सालाबद्दलची माहिती मिळाली नाहीं, परंतु त्या सालाबद्दल वरील नऊ सालांचें सरासरीनें प्रमाण धरलें असतां सुमारें ऐशीं कोट रुपयांचें सोनें, रुपें व तांबें दहा सालांत नाणें पाडण्याचें कामीं

गुंतलें गेलें. एकंदर १६५ कोट रुपयांचें सोनें व रुपें देशांत दहा वर्षांत आलें, त्यापैकीं पंधरा कोटी रुपयांचें सोनें व रुपें बाहेर गेलें, तें वजा करून बाकी १५० कोटी देशांत शिल्लक राहिल्यापैकीं सुमारें निंमें सोनें व रुपें नाणें पाडण्याचें कामीं गुंतलें, म्हणजे पैशाची चलन होऊन व्यवहारांत शिरलें. बाकी ७५ कोट रुपयांचें सोनें व रुपें काय झालें याचा जर कोणी बारीक रीतीनें शोध करील तर त्यास ह्या गोष्टीचा आचंबा वाटल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थान देश खेरीज करून बाकी मुलखांतील व्यवस्था अशी आहे कीं, जेवढें सोनें व रुपें नाणें पाडण्याचें कामीं लागतें, तसेंच किरकोळ कलाबुत वगैरे व्यापारास लागतें, तें खेरीज करून बाकी सोन्यारुप्याचा खप त्या देशांत होत नाहीं. त्याचा लागलाच व्यवहारांत उपयोग होऊन इतर द्रव्याचें त्यास रूपांतर मिळून देशांत रोजगार धंदे वाढण्याचें कामीं तें उपयोगीं पडतें, तशी या देशाची स्थिति नाहीं. येथें विलायतेची वरात संभाळून जें सोनें, रुपें देशांत येतें, तें या देशांत आलें म्हणजे निंमें सरकारी टंकसाळींत जाऊन नाणें बनतें, व बाकी निंमें देशांतच मुरतें म्हणजे भुईंत गढून जातें. लोक आपल्या बायका मुलांचे अंगावर त्याचे दागिने बनवून तें सोनें रुपें जशी तापलेली भूमी पाणी शोषून घेते त्याप्रमाणें अंगावर झिजवितात. त्यास एकदां दागिन्याचें रूप पावलें म्हणने व्यापाराचें कामीं त्याचा तादृश उपयोग होत नाहीं. मालकावर प्रसंग आला असतां तें बाहेर येतें. परंतु बहुशा लाख व झीज यांचे योगानें सर्वस्वी लय होईपर्यंत त्याचें रूप बदलत नाहीं. परदेशास मागील दहा वर्षांत या देशांतून माल धाडला गेला त्याचे ऐवजीं देशांत बाहेरून माल आला तो वजा जातां बाकी जी तूट राहते त्याबद्दल पूर्वीं तपशील सांगितला आहे. त्या तुटीपैकीं जितकें सोनें रूपें येतें त्याची व्यवस्था आपलें देशांत आल्यावर काय होते हें आतांच दाखविलें आहे. म्हणजे जें सोनें येतें तें निंमें नाणें बनून चलन होतें, व बाकीचें निंमें म्हणजे सुमारें सात पासून आठ कोट रुपये दर वर्षास मातींत मिसळतात, म्हणजे लोक त्याचा व्यापाराचें कामीं

उपयोग न करितां दागिने वगैरे करून आपला संचय सर्वथा व्यापाराचें कामीं पडूं नये अशी त्याची व्यवस्था करितात. आधींच आपला संचय थोडा, त्यांत विलायतेकडे १९ कोट रुपये खंडणी धाडावी लागते. शिवाय आपल्या लोकांच्या मूर्ख समजुतीमुळें व एकमेकांच्या अविश्वासामुळें या अत्यल्प संचयापैकीं सुमारें आठ कोट रुपये दागिन्याच्या रूपानें मातींत मिसळले जातात. मिळून रोजगार धंद्याचें कामीं उपयोग होण्याची पात्रता ज्या संचित द्रव्याचे ठायीं आहे अशा द्रव्याचा वर सांगितल्याप्रमाणें विनियोग होऊन देश निर्द्रव्य होत आहे, या गोष्टीचा सर्वत्रांनीं विचार करावा कारण ही दुसरी गोष्ट सर्वत्रांच्या स्वाधीनची आहे. जो आपले गांठीशीं संचय बांधला त्याचा देशांतील उदीम व्यापार वाढविण्याचें कामीं उपयोग न करितां तो भुईंत पुरून ठेविला, अगर अंगावर दागिने करून झिजविला, अथवा लाखेचा डाग लावून नासून टाकिला, तर तेणेंकरून तितकें द्रव्य दरसाल समुद्रांत बुडविल्यासारखें आहे. ज्या देशांत संचय मोठा होतो तेथें असा प्रकार थोडा बहुत असल्यानें विशेष हानी होत नाहीं. परंतु आपल्या सारख्या दरिद्री देशांत परदेशस्थ लोकांच्या अंमलामुळें व आपल्या गैरसमजुतीच्या वर्तनामुळें दरसाल पंचवीस कोटींची नागवण होत आहे, याचा सर्वत्रांनीं आपल्या योग्यतेप्रमाणें विचार करावा.

वर तपशिलवार सांगितल्याप्रमाणें ज्याचे मनांत विचार ठरतील, त्यास दिवसें दिवस लोकविशेष खपत असून लोकांची स्थिती इतकी निःसत्व कां दिसते याचें खरें कारण सहज कळून येईल. देशांतील संपत्ति वाढण्यास देशाचा जो संचय रोजगार धंद्याच्या कामीं लागला जातो त्याची रक्कम वाढली पाहिजे. आपल्या देशाची कायमची स्थिति अशी होऊन गेली आहे कीं, मूळ उद्योग थोडा यामुळें संचय थोडा, त्या थोडक्या संचयापैकीं परदेशस्थ अमलाच्या संबंधानें व लोकांच्या आळसामुळें व अविश्वासामुळें सर्व संचय रोजगार धंद्याचें कामीं लागत नाहीं. एकंदर दरसालच्या ७५ कोटी संचयापैकीं सुमारें २५ कोटी रुपये संचित झाले नव्हते अशा व्यव-

स्थेप्रत पावतात. अर्थातच हा जो मोठा पाझर लागला आहे त्याच्या योगानें आपल्या सर्व राष्ट्ररूप शरीरांत अवसान कांहीं राहिलें नाहीं असें झालें आहे. मोठा जवान माणूस असला, आणि त्याचे डोक्यावर त्यास न तोलणारें वजन दिलें, व त्याचे पायांत वजनाच्या बिड्या घातल्या व त्यास उंच डोंगरावर चढण्यास लावलें तर त्याचें सामर्थ्य दिवसें दिवस कमी होईल यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

तथापि याही प्रसंगीं हिम्मत सोडून उपयोग नाहीं. चार हजार वर्षांपासून हा देश हल्लींचे प्रसंगापेक्षांहि दुर्धर प्रसंग अनुभवून पृथ्वीचे पाठीवर कायम राहिला आहे. तेव्हां आपल्या जीवनाचीं मुळें फार खोल गेलीं आहेत यांत संशय नाहीं. इतक्या ओझ्यानिशीं व या बिड्यांतूनही आपली सुटका होईल या गोष्टीची सर्वत्रांनीं खात्री बाळगून झटावें.

आपल्या समक्ष फ्रान्स देशाच्या बादशहाच्या चुकीनें व मूर्खपणानें त्या देशावर एका सहा महिन्यांत सुमारें ५०० कोट रुपयांचें कर्जाचें ओझें बसलें. ज्या शत्रूंनीं त्यांस जिंकलें त्यांचे दंडाबद्दल २०० कोट सुमारें रुपये देणें ठरलें. शिवाय लढाई संबंधीं खर्च फ्रेन्च लोकांस झाला होता, तो अंगावर पडला. तथापि लढाई संपल्यानंतर त्या लोकांनीं हिम्मत न सोडतां सर्व प्रपंचांतील विनाकारण खर्च बेतावर धरून शत्रूचें दंडाचें माप भरलें. त्यामुळें दरसाल त्या देशांतील प्रजेस सुमारें तीस कोट रुपयांचें नवीन करांचें ओझें व्याजाऐवजी सोसावें लागेल. फ्रान्स देशावर हा जो एकाएकी दुर्धर प्रसंग आला त्याच योग्यतेचा आपणांवर नेहेमीचा प्रसंग आला आहे. परदेशस्थ अंमलाच्या संबंधानें आपणांस जी खंडणी द्यावी लागते ती खंडणी तूर्त कमी होण्याचे अगर चुकण्याचे विचार फार दूर आहेत. तेव्हां तें ओझें आपल्या शिरावर नेहेमी आहे असें धरून सर्व प्रयत्न झाले पाहिजेत.

त्यास ज्याप्रमाणें फ्रान्स देशांतील लोकांनीं हिम्मत धरून आपल्यावर आलेला प्रसंग विनाकारण मिजाशीचे खर्च जेवढे कमी

होतील तेवढे कमी करून टाळला, व सरकारी सारा दुप्पट तिप्पट वाढला तेवढा देण्याविषयीं कंबर बांधली, त्याच हिम्मतीनें आपणही आपले निष्कारणी खर्च कमी करून संचय विशेष वाढवावा, व तो संचय आपल्या लोकांस जेणें करून रोजगार धंदा लागेल अशा उद्योगांत लावण्याची तजवीज सर्वदा करावी.

आपण सर्वत्र सरकारानीं एखादे सालीं जास्त कर वाढविला तर तो कर बिनबोभाट देतो, व आपला इतर खर्च असतो तो कमी करितों, तद्वतच आपल्यावर न कळत हा जो खंडणीचा दंड पडत आहे त्याविषयीं ही तजवीज ठेविली पाहिजे. आपला विनाकारण जो खर्च होतो त्यांतील बचत करून आपण बाहेर देशास खंडणी पाठवितों त्या मानाइतका संचय वाढविल्यास आपण खंडणी दिली तरी न दिल्याप्रमाणें होणार आहे. संचयाचा विचार प्राप्ति व खर्च यांच्या संबंधानें कमी जास्त प्रमाणाचा आहे. तेव्हां प्रथम सर्वत्रांनीं हें संचयाचें एकंदर मान स्वदेशीय राजांचा अंमल असता तर जेवढें असतें त्या प्रमाणावर आणून ठेवण्याविषयीं झटलें पाहिजे. म्हणजे खंडणी पंधरा कोटींची आपणांस द्यावी लागते, ती देऊन संचय पूर्वीइतका झाला पाहिजे. अर्थात् निष्कारणी खर्च कमी करून संचय वाढविला पाहिजे, अथवा अन्य रीतीनें सर्वांनीं मितव्यय केला पाहिजे, म्हणजे आपोआप संचय वाढेल, व त्याचे पायीं सर्व कांहीं होईल.

आपल्याजवळ शंभर रुपये असल्यास त्यांचा सहा प्रकारांनीं विनियोग करितां येईल. एक ते रुपये नेऊन गंगेंत बुडविले असतां नाहींसे होतात. अथवा रुपये आपल्याजवळ पेटींत अगर गाडग्यांत पुरून ठेवले तरी कित्येकांस त्याची ऊब वाटून अगर दृष्टीनें पाहून आनंद होतो. अथवा अंगावर सोन्या रुप्याचे दागिने करून घातले तरी नेत्रांस सुख होईल, अथवा देहास शोभा येईल. अथवा त्या रुपयांची मेवामिठाई किंवा मिजाशीचे पदार्थ विकत घेऊन त्यांचा आपण उपभोग घेतला तरी

इंद्रियांस सुख होणार आहे. किंवा दहा माणसें चाकरीस ठेवून एकाकडून हात चेपून घेतले, एकाकडून वारा घालविला, एकाकडून गाणें गावविलें, तरी एक प्रकारचें सुख आहे. शेवटीं सदर रुपयांचा उपयोग नफा येणाऱ्या व्यापारधंद्यांत करून पुनः रुपयांचे रुपये व्याजासहित परत येण्याची तजवीज करण्यासही आपण मुकत्यार आहोंत.

वरील सहा प्रकारांपैकीं संचयाचा उपयोग शेवटचे रीतीनें ज्या मुलखांत विशेष होतो तो देश लवकर संपत्तिमान् होतो. जेथें पूर्वीचे प्रकारांपैकीं अनुक्रमाप्रमाणें प्रकार ज्यारी असतात तेथें त्याच मानानें संपत्तीचा पायही मार्गें येतो.

संचय होतो त्याचा खरा मितव्यय करणें असेल तर जेणेंकरून संचित झालेलें द्रव्य रूपांतर व वृद्धि पावून पुनः परत आपल्या हातीं येईल अशी तजवीज झाली पाहिजे. सर्व जातीचें द्रव्य आपले जिवाशीं बाळगून ठेविलें असतां माती होते, हा विचार सर्वत्रांनीं ध्यानांत ठेवावा.

सदरील कारणाकरितां हल्लींचे स्थितींत आपण सर्वत्रांनीं मितव्यय केला पाहिजे ह्मणजे पहिले पांच प्रकारचा व्यय जितका कमी होईल तितका करून सहाव्या प्रकारचा व्यय वाढविला पाहिजे. साधारण मितव्यय केला पाहिजे असें ह्मटल्यानें पैसा हातचा सोडूं नये अशी भ्रांति वेळेस होण्याचा संभव आहे, ह्मणून इतकें स्पष्टीकरण करून दाखविणें जरूर पडलें.

( पहिलें व्याख्यान समाप्त )

# व्याख्यान दुसरें

रावबहादुर महादेव गोविंद रानडे ह्यांनीं गेले फेब्रुवारी महिन्याचे बाविसावे तारखेस विश्रामबागचे वाड्यांत "हिंदुस्थानच्या व्यापाराची स्थिति" ह्या विषयावर दिलेलें व्याख्यानः—

मागील एका प्रसंगीं या देशावर परस्थ लोकांचा अंमल असल्या-मुळें आपल्या देशांतील संपत्तीची व्यवस्था कशी होत आहे, आपल्या अल्प संचयांतून परस्थ अमलाच्या खंडणीच्या निर्वाहाबद्दल किती कोटी रुपये दरसाल आपणांस दंड द्यावा लागतो, व त्या योगानें आपल्या संप-त्तीचा व सामर्थ्याचा दिवसेंदिवस कसा ऱ्हास होत चालला आहे, या गोष्टींचें विवरण केलें. आपल्यासारख्या दरिद्री देशास सुमारें १२ पासून १५ कोटी रुपयांची खंडणी द्यावी लागते, हा विचार मनांत आला असतां वाईट वाटतें यांत नवल नाहीं. तथापि या संबंधानें एकदेशीय विचार मनांत आणून उपयोग नाहीं. परस्थ लोकांच्या अमलानें ज्याप्रमाणें ही जबर खंडणी आपणांस दरसाल देणें पडते, त्याचप्रमाणें त्या लोकांचें साह्यानें आपण इतर मुलखां-पासून सात आठ कोटी रुपयांची खंडणी घेतों, हा प्रकार विसरतां कामा नये. आपणां सर्वत्रांस माहित असेल कीं, आपल्या देशांत जी अफू पिकते त्या अफूसारखी अफू पृथ्वींत होत नाहीं. निदान ती अफू चीनचे लोकांस फार आवडते. ह्या संबंधानें जी कोट्यावधी रुपयांची अफू चीनचें बंदरांत आपण पाठवितों त्यावर फार जबर जकात सरकारची आहे, त्या जकातीचें रूपानें आपणांस चीनचे लोक खंडणी देतात असें म्हटलें असतां चालेल. पूर्वीं बादशाईत किंवा पेशवाईत हें उत्पन्न बिलकूल नसे, व आज सर-कारांनीं ह्याविषयीं विशेष बंदोबस्त ठेविला नाहीं तर आपणांस हें उत्पन्न मिळणार नाहीं. दरसाल अफूचें उत्पन्न, खर्चवेंच जाऊन सात कोट सुमारें आपल्यास होतें. हा नफा हल्लींच्या प्रभुचे सत्तेनें आपणांस होत आहे.

याचप्रमाणें दुसरी एक गोष्ट घ्यानांत ठेवण्याजोगी आहे ती ही कीं, ज्या परस्थ लोकांचा अंमल आपणांवर आहे त्या लोकांनीं पूर्वीं या देशांत जिन्नस पिकत नवते ते पिकविण्याचा उद्योग कोट्यावधी रुपये खर्च करून बहुत वर्षें सुरू केला आहे. पूर्वीं या देशांत चाहा ह्मणजे काय हें ठाऊक देखील नवतें. तसेंच काफी म्हणजे बुंद हेंही आपणांस ऐकून मात्र ठाऊक होतें. याचप्रमाणें निळीचा व्यापारही कमीच होता. हे तिन्ही उद्योग इंग्रज लोकांनीं फार वाढविले आहेत, आणि त्यायोगानें कोट्यावधी रुपयांचें उत्पन्न होत आहे. हे जिन्नस पिकविणारे बहुतेक साहेब लोक आहेत, ते या मुलखांत येऊन येथील जमिनींतून सदर जिन्नस पैदा करितात. त्याचें मान एका ठिकाणीं लिहिलें आहे तें येणेप्रमाणें :— चाहा दहा वीस वर्षांपासून आसाम वगैरे हिमालयाचे पायथ्याचे प्रांतांत होतो, त्याचें सालीना पीक सुमारें ५० लाख रुपयांच्या किंमतीचें होतें. व चाहा सुमारें एक कोट पौंड, म्हणजे पन्नास लाख शेर वजनाचा, उत्पन्न होतो. त्या उद्योगांत आपले मजूर लोक सुमारें सत्तर हजार लागले आहेत. याच मानानें काफी पूर्वीं १८५० सालीं सहा लाखांची बाहेर देशीं गेली. १८६८—६९ सालीं सत्तर लाखांची काफी बाहेर देशीं गेली. निळीविषयीं बंगाल प्रांतांत साहेब लोकांचे मोठे कारखाने पुष्कळ दिवसांपासून म्हणजे पांच पन्नास वर्षांपूर्वींपासून आहेत हें सर्वांस ठाऊक आहेच. १८५० सालीं दीड कोट रुपयांची नीळ बाहेर देशीं गेली. १८६९—७० सालीं दोन कोट रुपयांचीं नीळ बाहेर देशीं गेली. याशिवाय इतर किरकोळ जिन्नस पिकविण्याचे कारखाने साहेब लोकांनीं पदरचे पैसे लावून पुष्कळ काढिले आहेत. हे तीन जिन्नस मुख्य धरिले तरी चार पासून पांच कोट रुपये दरसाल साहेब लोकांचे या देशांत या कामीं गुंतले जातात. इतका नवीन रोजगार आपल्या लोकांस मिळतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या लोकांचा अंमल या देशावर नसता तर हा लाभ आपणांस होण्याचा संभव नव्हता. एकंदरींत परदेशस्थ लोकांच्या अंमलाच्या संबंधानें आपणांस जबर खंडणी देणें पडतें हें पाहून जितकें

आपणांस वाईट वाटतें, तितकें वाईट वाटण्यास कारण नाहीं. त्या ऐवजीं आपणांस अन्य देशांतून त्याच अम्मलाच्या सत्तेनें लढाई न करितां खंडणी अंशतः येते, व आपल्या देशांत साहेब लोकांचे उद्योगानें रोजगार कोट्यावधी रुपयांचा मिळतो, हे विचार ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

ज्याप्रमाणें चाहा, काफी, नीळ ह्यांचे कारखान्यांत साहेब लोकांचे पैसे असल्यामुळें आपल्या लोकांस नफा होतो म्हणून वर लिहिलें आहे, त्याचप्रमाणें जे सुमारें शंभर कोटी रुपये या देशांत आगगाडीचा रस्ता सुरूं करण्याच्या कामीं साहेब लोकांचे खर्च झाले आहेत, त्या शंभर कोट रुपयांपासून आपला देश धनाढ्य झाला आहे अशी कित्येकांची समजूत आहे, त्यास असा प्रकार मात्र मनांत आणतां कामां नये. ज्या मंडळ्यांनीं हें आगगाडीचें काम उचलिलें आहे त्यांणीं जर आपल्या जोखीमीवर नफ्या तोट्यास जबाबदार होऊन या कामीं आपलें भांडवल घातलें असतें, तर त्यांणीं जें भांडवल खर्च केलें त्याचा आपणांस उपयो॰ पूर्वीं लिहिल्याप्रमाणें झाला असता, प्रस्तुत व्यवस्था तशी ना ? आगगाडीच्या कामीं ज्या साहेब लोकांनीं पैसे खर्चले आहेत, त्या संबंधानें त्यांजवर जोखीम मुळींच नाहीं, कारण त्यांस सरकारांतून बहादुरी मिळाली आहे. त्या उद्योगांत नफा होवो न होवो, शेकडा पांच रुपये व्याज पैसा भरल्यापासून त्यांस मिळेल असा सरकारांनीं त्यांजबराबर करार केला आहे. आगगाडीचें कामीं जेवढा पैसा खर्च झाला आहे, तेवढा हिंदुस्थानांतील लोकांस उसनवार दिला आहे हें सर्वत्रांस ठाऊकच आहे, व त्या उसनवार पैशावर व्याजाचा पैसा पहिल्यापासून आजतलख आपण देत आहों. जे सुमारें नव्वद कोटी रुपये या कामीं रेल्वे कंपन्यांनीं खर्च केले आहेत, त्यांपैकीं पस्तीस कोट रुपयांचा आपल्या लोकांस रोजगार पुरविण्याचें कामीं कांहींच उपयोग झाला नाहीं. ते पस्तीस कोट रुपये माल खरेदीकडे गेले, तो सर्व माल विलायतेस खरेदी झाला. त्या माल॰ खरेदीच्या रकमेवर आपणांस व्याज मात्र देणें पडतें. हे पस्तीस कोट

रुपये वजा केले असतां बाकी ५५ कोट रुपये या मुलखांत लोकांस उद्योग मिळवून देण्याच्या कामीं खर्च झाले. एकदम प्रथम आगगाडीच्या रस्त्याचें काम सुरू झालें म्हणजे दोन दिवस रोजगारास तेजी येते, तेवढा नफा खेरीज करून बाकी कायमचा नफा आपल्या लोकांस आज तागाईत किती झाला हें पाहिलें असतां, असें दिसून येतें कीं, आगगाडी सुरू झाल्यापासून ते आज तागाईत उत्पन्न झालेलें जमेस धरून शिवाय रेल्वे कंपनींतील भागीदार लोकांस हिंदुस्थान सरकारानें सुमारें २० कोट रुपये व्याजा पोटीं भरले आहेत. म्हणजे आगगाडी सुरू झाल्यास सुमारें वीस वर्षें झालीं, येवढ्या अवकाशांत वीस कोट रुपये, जे पंचावन्न कोटी रुपये आगगाडीचा रस्ता चालू करण्याचें कामीं या देशांत खर्च झाले, व ज्यांचा मात्र या देशांतील लोकांस रोजगार मिळवून देण्याच्या कामीं उपयोग झाला, त्यांच्या व्याजाऐवजीं भरावे लागले. अशाच रीतीनें पांच फूट सहा इंच रुंदीच्या जेवढ्या लाईनी आहेत, म्हणजे बहुतकरून सर्व प्रस्तुतचे चालू असलेले रस्ते यांची व्यवस्था आणखी वीस वर्षें अशीच चालल्यास आलीकडे दरसाल दहा पांच वर्षें ज्याप्रमाणें दीडपासून दोन कोटी रुपयांची बुड भरावी लागते, त्याप्रमाणें आपणांस भरणें पडेल, म्हणजे एकंदरींत चाळीस वर्षांचें आंत ह्या बुडीची रकम भांडवला येवढी होणार आहे. आगगाडीच्या संबंधानें हा विचार सर्वत्रांनीं ध्यानांत ठेवणें जरूर आहे. आगगाडीचे रस्ते चालू करण्याचें कामीं १८७१ अखेर ९० कोट रुपये खर्च झाले होते. जे नव्वद कोट रुपये खर्च झाले, ते नव्वद कोट रुपये खर्चून बांधलेल्या लाईनीचें उत्पन्न १८७१ सालीं ६ कोट १४ लाख रुपये झालें. १८७० सालीं सहा कोट तीन लाख रुपये उत्पन्न झालें होतें. यापैकीं निम्मेहून अधिक म्हणजे तीन पासून चार कोटी रुपये आगगाडी चालू ठेवण्याचें कामीं दरसाल खर्च होतात. बाकी निव्वळ नफा राहतो तो ९० कोटींच्या मानानें शेंकडा तीन रुपये प्रमाणें देखील पडत नाहीं. म्हणून सरकार तिजोरींतून दीडपासून दोन कोटि रुपये दरसाल भरतीस घालावे

लागतात. असा अतोनात खर्च दुसऱ्या कोणत्याहि येवढ्या मोठ्या कारखान्यांत होत नसेल. अशा रीतीनें चाललेल्या कारखान्याचा आपल्या देशांतील रोजगाराच्या संबंधानें कितपत उपयोग आहे हें सर्वत्रांचें ध्यानांत येईल.

वर तपशिलवार जो प्रकार लिहिला आहे त्यावरून परस्थ लोकांची सत्ता या देशावर असल्यानें येथील व्यापारांस जी खंडणी द्यावी लागते, व त्यांचे ऐवजीं जो आपणांस अंशतः मोबदला मिळतो, त्याचें स्वरूप सर्वत्रांचें ध्यानांत येईल. या एकंदर विचाराचें पर्यवसान पूर्णपणें ज्याचें लक्षांत येईल त्यास हा देश परस्थ लोकांच्या अंमलाखालीं असल्यानें आपल्या व्यापाराची सर्वस्वीं हानी आहे, किंवा आपला सर्वस्वीं लाभ आहे, अशा ज्या बहुतेक लोकांच्या एकदेशीय समजुती असतात, त्यांत तथ्यांश किती मानानें आहे हें कळून येईल. राज्यसत्तेच्या संबंधानें आपण एका दूर द्वीपस्थप्रभूची प्रजा झालों आहों. परंतु त्याच सत्तेच्या आश्रयानें व्यापाराच्या कामीं आपला निकट संबंध सर्व पृथ्वींतील देशांबरोबर दिवसेंदिवस वाढत चालला आहे, यामुळें आपल्या देशाची खरी योग्यता केव्हांना केव्हां तरी फळास येईल. आज इतके दिवस पृथ्वींतील सर्व लोकांपैकीं धनाढ्य लोकांशीं राज्यसत्तेच्या व व्यापाराच्या संबंधानें आपली सांगड असतांना आपली दशा इतकी दीन कां असावी याविषयीं प्रसंगवशात् आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. तथापि थोराची संगत सर्वकाळ गरिबास धनिक करिते असें घडत नाहीं. आपण क्षणभर जर सर्वत्रांनीं अशी कल्पना केली कीं, आपण जेवढे पुण्यांत प्रमुख लोक राहतों हे सर्व इनामदार असून आपलीं इनामें दूर कोंकणांत आहेत, तेथें आपण कारकून पाठवून मक्त्यानें सर्व वसूल करून तो वसूल तिकडून इकडे आणून या शहरांत आपल्या प्रपंचांत व इषकबाजींत खर्च करितों. आपण कधीं आपल्या इनाम गावीं जात नाहीं, वसूल मात्र येथें आणून मोठे वाडे बागबगीचे बांधून सुख भोगितों. अशी क्षणभर कल्पना केली असतां

ह्या गोष्टीचा समज कांहीं अंशीं होईल. अशा कल्पना करण्यास विशेष अडचणही नाहीं, कारण स्वकीय अमलांत या शहराची स्थिति याच तऱ्हेची होती, व हल्लींहि याच संबंधानें या शहरास जुन्या रीतीची कांहीं शोभा आहे. तेव्हां अशी जर कल्पना केली तर आपण इनामदार श्रीमंत आहोंत या संबंधानें आपल्या इनाम गांवांतील रयतही सुखी असावी असें होत नाहीं, ज्यांचीं इनामें व शेतभाती मावळांत व कोंकणांत आहेत, त्यांची व मावळांतील आणि कोंकणांतील रयतेची स्थिति त्यांनीं लक्षांत आणली ह्मणजे उलट या दोन्ही गोष्टींत व्युत्क्रम प्रमाण असतें हें त्यांस उघड दिसून येईल. तसेंच हिंदुस्थानचें राज्य हें साहेब लोकांस इनाम आहे. ते श्रीमंत आहेत ह्मणून आपणहि त्यांचे सुखाचे विभागी असावें असें अवश्य होत नाहीं. दुःखांत सुख येवढेंच आहे कीं, जसा एकादा इनामदार आपल्या इनाम गांवांत देऊळ बांधतो, किंवा नदीला धरण बांधितो, किंवा विहीर खणतो, अगर चावडी बांधतो, त्या योगानें त्याच्या गांवची प्रजा त्याचा धर्म अगर हौस पाहून जशी खुष असते, तद्वत् जो थोडा बहुत अंश विलायतेंतील संपत्तीचा पाझरत इकडे येतो, त्याच्या ओलाव्यानें आपलें जीवन होत आहे. ह्मणून आपण खुष असावें, व तें जीवन वाढविण्याचा नेहमीं आपला उद्योग चालू असावा.

याप्रमाणें हा विचार आहे. आतां आपल्या लोकांचें हें भाग्य मोठें आहे कीं, परमेश्वर कृपेनें ज्या भूमिमातेच्या ओटयांत आपण पडलों आहों तिची समृद्धि व फलद्रुपता अशा मानाची आहे कीं, सर्व पृथ्वींतील हवा, पाणी व जमीन आपल्या मुलखांत आहे, सर्व देशांतील झाडें, वनस्पति, औषधें, द्रव्यें, धान्यें, आपल्या जमिनींत विपुल व सहज पिकतात, असें ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थानाच्या व्यापाराच्या संबंधानें या गोष्टींचा विचार विशेष रीतीनें मनांत ठसतो. येथील प्रजा दुर्बल, दुर्भिक्षानें पिडलेली, यंत्रांचीं साधनें वगैरे माहीत नाहींत, उद्योग नाहीं, संपत्ती नाहीं, संचया-

विषयीं वासना नाहीं, अशा प्रजेच्या हांतून पृथ्वींतील अन्य देशांबरोबर आपल्या देशाचा टिकाव कसा लागेल ही नेहमीं भीति मनांत वाटते. त्या भीतीचें निराकरण परमेश्वरानें आपल्या जनकभूमिमातेचें अंगीं जी विलक्षण कामधेनूसारखी सिद्धि दिली आहे त्या सिद्धीच्या योगानें होतें. ज्या ज्या वेळीं व्यापाराच्या संबंधानें एखाद्या उपयोगी व्यवहारांतील जिनसाची तूट अन्य देशीं पडण्याचा प्रसंग आला, त्या त्या वेळीं आपला देश पुढें होऊन आपणांसारख्या दुर्बळ लोकांचे प्रयत्नानेंहि ती तूट भरून आली येवढेंच नाहीं, परंतु ज्या देशांत ती तूट झाली त्या देशांवर त्या पदार्थाच्या संबंधानें जो आपला पगडा बसला तो पुढें पहिली अडचण संपली असतांहि आपण सोडला नाहीं. ह्यांत कोणास अतिशयोक्ति वाटेल तर अतिशयोक्तीचा कांहीं प्रकार नाहीं. मागील वीस वर्षांत असे चार प्रसंग भिन्न काळीं भिन्न देशांच्या संबंधानें आले, त्या चारी प्रसंगीं आपल्या देशानें पुढें होऊन प्रसंगीं पुरवठा केला येवढेंच नाहीं, परंतु पुढें नेहमीचीच किफायत आपली करून दिली. अशी समृद्धि व असें वैभव दुसऱ्या कोणत्याही देशाच्या आंगीं नाहीं. मनुष्यकृतीनें व महत्प्रयासानें कष्टसाध्य गोष्टी आपल्यापेक्षां बहुत पटीनें जास्त इतर देशांत होतात. परंतु आपले देशाचें जें सामर्थ्य वर वर्णिलें, व त्याची तपशीलवार हकीगत पुढें सांगतों, तें आपल्या देशासच भूषण होऊन राहिलें आहे. मागील वीस वर्षांत ह्या देशांत काफीची व चाहाची लागवड सुरू झाली. मागील वीस वर्षांत जेव्हां प्रथम रूस देशाशीं इंग्रज लोकांची लढाई सुरू झाली, तेव्हां त्या देशांतून विलायतेस ताग व ज्यूट व जवस वगैरे जात होतें तें बंद झालें. ती संधि आपल्या देशानें पाहून एक हात पुढें केला तेणेंकरून विलायतेंत पडलेली तूट भरून आली एवढेंच नाहीं, परंतु पुढें लढाई संपल्यावरही रूस देशांतील मालास कोणी हातांत धरीनासा झाला. त्याचप्रमाणें अमेरिकेशीं लढाई सुरू झाल्यावेळीं अमेरिकेंतून उत्तम क्यारोलिना तांदूळ परदेशांत जात असे तो बंद झाला. त्या वेळीं पेगु व

ब्रह्मदेश व बंगाल या प्रांतांतील तांदुळांनीं जो पुरवठा केला तो अशा तऱ्हेनें केला कीं, लढाई संपली तरी इकडच्या तांदुळांची चाहा दिवसें-दिवस वाढून माल ज्यास्ती बाहेर जाऊं लागला. 'त्याचप्रमाणें सर्वत्रांस विदित आहे अशा तऱ्हेच्या कापसाचा व्यापार अमेरिकेंतील लढाईच्या संबंधानें विशेष उदयास आला. त्यानें हलीं लढाई संपली तरी पिछेहाट वजनाच्या संबंधानें म्हणण्यासारखी घेतली नाहीं. याच मानानें लोकरीच्या व्यापाराचाही विचार आहे. प्रत्येक जिनसांच्या व्यापाराचा उदय व वृद्धि कशी झाली ह्याबद्दल तपशिलवार हकीगत संक्षिप्त रीतीनें पुढें सांगतों.

१८५० सालीं बाहेर देशाशीं ज्या जिनसाचा आपला मुख्य व्यापार होत होता तें मान मनांत घेऊन त्या नंतर आलीकडे वीस वर्षांत जो प्रत्येक जिनसाचे संबंधानें फरक पडला आहे तो फरक ज्या ज्या संबंधानें पडला ते संबंध समजणें म्हणजे देशाचा इतिहासच ठाऊक असला पाहिजे. तितक्या तपशिलानें माहिती देण्याचा माझा विचार नाहीं. आपल्या देशाचें वैभव कोणच्या तऱ्हेचें आहे हें साधारणपणें लक्षांत आलें म्हणजे पुरे आहे. प्रथम चाहाचा जिन्नस घेतला असतां चाहा चीन देशांत पिकतो हें सर्वत्रांस ठाऊक आहे. चीन देशाशीं कंपनी सरकारचा व्यापार होता, त्यांत चाहाच्या संबंधानें एकंदर व्यापार कंपनी सरकाराशिवाय दुसरे कोणी करूं नये असा प्रतिबंध पुष्कळ वर्षें होता. तो प्रतिबंध १८३४–३५ सालीं अखेर नाहींसा झाला. पुढें हिंदुस्थानांत चाहा उत्पन्न करण्याची सोय आहे असें साहेब लोकांस वाटल्यावरून हिमालय पर्वताच्या पायथ्याशीं जे प्रदेश आसाम, काचार, छोटानागपूर, आदिकरून आहेत, तेथें चाहा उत्पन्न करण्याचा उद्योग सुरूं झाला. त्यास पुर्ती पंचवीस वर्षें झालीं नाहींत. चाहास या देशांत युरोपियन वस्तीशिवाय खप विशेष नाहीं, यामुळें बहुतेक चाहा बाहेर विलायतेस जातो. १८५१ पासून १८५५ सालापर्यंत दरसाल सुमारें ४॥ लाख रुपयांचा चाहा परदेशीं गेला. १८५५–६० सालांत हें सरासरीचें मान दरसाल ८॥

लाख रुपयांवर येऊन बसलें. १८६१–६५ सालांत हें मान तिप्पट वाढलें, म्हणजे २२॥ लाख रुपयांचा चाहा सरासरीनें दरसाल बाहेर गेला १९६५–७० चे दरम्यान हें मान फार वाढलें आहे, त्याचें प्रमाण खालीं लिहिलें तपशिलावरून दिसून येईल. चाहाच्या बागा सुमारें ४५९ सदर प्रांतांत हल्लीं झाल्या आहेत. एकंदर चाहाखालीं गुंतलेली जमीन ६०–६५ हजार एकर आहे. चाहाचें पीक १८७० सालीं १। कोट पौन्ड, दर पौन्डास आठ आणेप्रमाणें पन्नास लाखापासून ६० लाख रुपयांचे किंमतीचें झालें. व सत्तर हजार मजूर लोक या भागांत कामावर असून त्यांचा उत्तम चरितार्थ होत आहे. हा एक चाहाचा तपशिल झाला. याप्रमाणेंच काफीचाहि तपशिल आहे. काफी आरबस्थानांत पिकते हें सर्वत्रांस विदीत आहेच. ज्याप्रमाणें उत्तरेस हिमालयाचे पायथ्याशीं चीन देशांत मुख्यत्वेंकरून पिकणाऱ्या चाहास फरमाशी हवा, पाणी, व जमीन मिळाल्यामुळें तिकडे तें पीक वाढलें, त्याचप्रमाणें दक्षिणेंत निळगिरी पर्वताच्या माथ्यावर व बाजूवर, तसेंच सिंव्हलद्वीपांत, काफीचें पीक होईल असें साहेब लोकांस वाटल्यावरून आपल्या देखत, म्हणजे सुमारें २५ वर्षांचे आंत, हा उद्योग तिकडे सुरू झाला. निळगिरीचे पहाडांत हल्लीं साहेब लोकांच्या काफीच्या बागा २८२ आहेत, व २१५०० आपल्या लोकांनीं त्यांचें उदाहरण पाहून केल्या आहेत. एकंदर दोन्ही मिळून एक लाख एकर जमीन या कामीं गुंतली आहे. याशिवाय मद्रासेंतील दुसरे प्रांतीं व त्रावणकोर संस्थानाचे अमलांतील मुलखांत काफी पिकते ती खेरीज आहे. काफीचा जिन्नसही एतद्देशीय लोकांच्या खपाच्या जिन्नसांपैकीं नाहीं. यामुळें युरोपियन वस्तींत जो खप होतो त्याशिवाय बाकीचा सर्व माल विलायतेस जातो. १८५०–५५ पर्यंत दरसाल सरासरी ९॥ लाख रुपये किंमतीची काफी बाहेर देशीं गेली. १८५५–६० सालापर्यंत हें सरासरीचें मान १३॥ लाख रुपयांचे झालें. पुढील पांच सालांत हें मान ५५॥ लाख रुपये झालें; त्याच्या पुढील

पांच सालांत हें मान फारच वाढलें. एकंदर १८७० सालीं २८ पौन्डाचा मण अशा मणावर चार आणे जकातीचें उत्पन्न ३॥ लाख रुपये झालें, म्हणजे ८५॥ लाख रुपयांचा जिन्नस बाहेर देशीं गेला असें ह्मटलें असतां चालेल. ह्याप्रमाणें ह्या जिनसांची हवाल आहे.

ह्याप्रमाणें अरबस्तानाचा मुख्य जिन्नस काफी, व चीन देशाचा मुख्य जिन्नस चाहा, ह्यांचें कायमचें वास्तव्य आपल्या देशांत झालें आहे येवढेंच नाहीं, परंतु त्यांचा फैलाव दिवसें दिवस होत आहे. आतां कापसाच्या संबंधानें आपल्या देशाच्या सामर्थ्याचें वर्णन करणें जरूर आहे. अमेरिकें-तील लढाई सुरू होण्यापूर्वी या देशांतून कापूस विलायतेस वगैरे बाहेर देशीं जात असे, परंतु त्याचें मान फार किरकोळीनें होतें. बहुशा कापूस देशाचा देशांतच खपत असे. अमेरिकेच्या कापसापुढें आपल्या देशांतील वाईट कापुसास कोणीं विलायतेच्या बाजारांत पुसत नसत. १८६० सालापासून १८६८ पर्यंत अमेरिकेंतून व हिंदुस्थानांतून विलायतेस कापूस गेला त्याचें मान खालील कोष्टकावरून कळून येईल.

| | अमेरिकेंतील कापूस गठे | हिंदुस्थानांतील कापूस गठे |
|---|---|---|
| १८६०–६१ | २८३८००० | ४२२००० |
| १८६१–६२ | २०२६००० | ७४०००० |
| १८६२–६३ | ८०००० | ८०५००० |
| १८६३–६४ | १४५००० | १०४८००० |
| १८६४–६५ | २१७००० | १३४९००० |

२८३८००० ४२२०००
२०२६००० ७४००००
८०००० ८०५०००
१४५००० १०४८०००
२१७००० १३४९०००

| | अमेरिकेंतील कापूस गठ्ठे | हिंदुस्थानांतील कापूस गठ्ठे |
|---|---|---|
| १८६५–६६ | ४८८००० | १०५६००० |
| | ४८८००० | १०५६००० |
| १८६६–६७ | १२८२००० | १६१९००० |
| | ११८२००० | १६११००० |
| १८६७–६८ | १३६१००० | १३५००० |
| | ११६१००० | ११५०००० |
| १८६८–६९ | १३५०००० | १३७०००० |
| | ११५०००० | ११७०००० |

*परिशिष्ट टीप १ पहा.*

यावरून हें ध्यानांत येईल कीं, विलायतेच्या बाजारांत १८६०–६१ सालीं जितका कापूस खपला त्यांतुन दर शंभर गठ्ठ्यांपैकीं ८२ गठ्ठे अमेरिकेंतील होते, व आपल्या इकडील शेंकडा १२ गठ्ठे होते. तेंच मान दोन वर्षांत ज्या वेळेस कापसाची चणचण झाली तेव्हां दुप्पट, तिप्पट, चौपट वाढलें. हल्लीं कापसाची किंमतही उतरली आहे, व अमेरिकेंतून कापूस पुनः पूर्ववत् येऊं लागला, तरी आपलें चढलेलें मान विशेष कमी झालें नाहीं. १८६८–१८६९ सालीं निमा कापूस अमेरिकेंतील व निमा आपल्या देशांतील पिकलेला विलायतेच्या बाजारांत खपला. ह्या कापसाच्या व्यापाराच्या संबंधानें मुंबई बंदराचें महत्त्व विशेष आहे. एकंदर १६ लाख गठ्ठे १८७०–७१ सालीं या देशांतून बाहेर देशीं गेले, त्यांपैकीं १२। लाख गठ्ठे कापूस एकट्या मुंबई बंदरांतून बाहेर गेला. बाकी चार लाख सुमारें बंगाल, मद्रास, वगैरे इलाख्यांतील बंदरांतून गेला. मुंबई बंदराच्या व्यापाराच्या हकीकतीचे जे रपोट दरवर्षीं छापतात त्यांतील शेवटल्या रपोटांत मागील दहा सालांत मुंबई बंदरांतून कापूस किती पौंड वजनाचा व किती किंमतीचा बाहेर देशीं गेला व त्यांपैकीं खुद्द विलायतेस किती कापूस गेला, ह्याबद्दल तपशिलवार माहिती दिली आहे. ती पुढील कोष्टकावरून ध्यानांत येईल:—

| | मुंबई बंदरांतून बाहेरदेशीं एकंदर किती कापूस गेला त्याचे | | पैकीं खुद्द विलायतेस किती कापूस गेला त्याचे | |
|---|---|---|---|---|
| | वज़न पौंड | किंमत रुपये | वजन पौंड | किंमत रुपये |
| १८६२–६३ | ३६॥ कोटी | १५ कोटी | ३४॥ कोटी | १४ कोटी |
| | ३६,५७,८४,८६५ | १४,८१,४६,४०० | ३४,७६,०२,४९७ | १३,९७,२३,२७३ |
| १८६३–६४ | ४०॥ कोटी | २८ कोटी | २८॥– कोटी | २६॥ कोटी |
| | ४०,५०,७१,५०८ | २७,९१,२२,१७२ | २८,६३,५०,७९६ | २६,५४,१७,२३० |
| १८६४–६५ | ३८ कोटी | ३०¼ कोटी | ३६ कोटी | २९ कोटी |
| | ३८,०५,२३,७०७ | ३०,३७,०४,८२७ | ३५,९५,६०,५०४ | २८,८१,४९,०८७ |
| १८६५–६६ | ५२॥। कोटी | २५॥ कोटी | ५०॥ कोटी | २४॥ कोटी |
| | ५२,७०,६५,७१४ | २५,५३,४१,७९१ | ५०,५०,५७,८८२ | २४,५६,१२,२९० |
| १८६६–६७ | २७⅔ कोटी | १२ कोटी | २६⅙ कोटी | ११⅓ कोटी |
| | २७,६९,१३,६४६ | ११,९९,९६,६३१ | २६,१६,४७,५९६ | ११,३४,२९,३४४ |
| १८६७–६८ | ४४॥ कोटी | १५॥ कोटी | ३९। कोटी | १३॥ कोटी |
| | ४४,५४,९४,७८८ | १५,५०,७१,४७४ | ३९,२२;५२,५८७ | १३,७४,६९,७८० |
| १८६८–६९ | ४९⅓ कोटी | १५ कोटी | ४० कोटी | १२ कोटी |
| | ४९,३१,४४,१३४ | १४,९७,२०,६१९ | ३९,८०,७८,२८५ | १२,०७,७९,८४६ |
| १८६९–७० | ३८॥ कोटी | १४⅕ कोटी | ३१ कोटी | ११॥ कोटी |
| | ३८,४६,९१,१६९ | १४,१९,७७,०१० | ३१,१९,६४,२९३ | ११,४८,६६,५२९ |
| १८७०–७१ | ४३⅓ कोटी | १५॥ कोटी | ३५॥ कोटी | १३ कोटी |
| | ४३,३०,६१,६७४ | १५,६२,१०,६५८ | ३५,४७,७६,६४४ | १३,०२,०८,४३१ |
| १८७१–७२ | ५३⅓ कोटी | १४॥ कोटी | ३८ कोटी | १०⅓ कोटी |
| | ५३,३४,५९,६७० | १४,६२,६६,५४८ | ३७,८१,१५,९९४ | १०,३६,७२,८२१ |

ह्या कोष्टकांत ध्यानांत ठेवण्याजोग्या पुष्कळ गोष्टी आहेत. परंतु मुख्य ही कीं, किंमतीच्या तेजीवर आपला कापसाचा व्यापार हल्लीं अवलंबून नाहीं मागील दोन चार सालांत किंमती साधारण असूनही एकंदरींत १८७१-७२ सालीं जितका कापूस आपल्या बंदरांतून बाहेर गेला, इतका अमेरिकेंतील लढाई चालू होती तेव्हां देखील गेला नाहीं. तेव्हां आपल्या मालाची चहा वाढली आहे म्हणून इतका पुष्कळ कापूस बाहेर खपला गेला हें उघड आहे. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी ही आहे कीं, एकट्या विलायतेवर जसे आपण दहा वर्षांमागें कापसाच्या संबंधानें अवलंबून होतों तसे आतां अवलंबून नाहीं. विलायतेशीं पूर्वीं जो आपला व्यापार होता तो कमी झाला नाहीं व वाढलाही नाहीं, . परंतु इतर देशांशीं जो मुळींच व्यापार नसे, तो मात्र दिवसेंदिवस वाढत चालला आहे. म्हणजे १८६३–६४ सालीं ४०॥ कोट पौंड कापूस एकंदर बाहेर धाडला, त्यापैकीं दोन कोट पौंड कापूस खेरीज करून बाकी सर्व माल विलायतेंत खपला. त्याच मानानें एकंदर २८ कोटी रुपये किंमतीपैकीं २६ कोटी रुपये त्या देशांतून इकडे आले. ती स्थिति हल्लीं नाहीं. म्हणजे विलायतेस जो ३८ कोट पौंड कापूस १८६३–६४ सालीं आपण धाडला, तितकाच कापूस १८७१–७२ सालीं धाडला; परंतु विलायतेखेरीज इतर देशांत १८६३–६४ सालीं दोन कोट पौंड धाडला होता त्या ठिकाणीं १४ कोट पौंड कापूस १८७१–७२ सालीं धाडला. तसेंच आलीकडे कापसाची किंमत कमी आहे त्या मानानें देखील चार कोट रुपये विलायतेशिवाय मुलखांतून आपणांस १८७१–७२ सालीं मिळाले. हा प्रकार ज्याचे समजुतीस येईल त्यास आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण विलायतेशीं जेव्हां प्रथम कापसाचा व्यापार वाढूं लागला तेव्हां ही मोठी भीति सर्व लोकांच्या चित्तांत होती कीं, लढाई संपली, व पुनः अमेरिकेकडून कापूस विलायतेस येऊं लागला, म्हणजे इकडील मालास कोणी विचारणार नाहीं. ती भीति धरण्याचें आतां पुष्कळ अंशीं कांहीं कारण उरलें नाहीं. कारण आपला

कापूस वजनाच्या मानानें विलायतेस कमी जात नाहीं. एवढेंच नाहीं, परंतु विलायतेखेरीज इतर देशांत पूर्वी आपला कापूस मुळींच जात नसे तो आतां बराच जाऊं लागला आहे. एकंदरींत कापसाच्या व्यापारानें आपणांस दगा दिला अशी जी कित्येक लोकांची समजूत आहे ती निष्कारण आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. १८५०–५१ पासून १८५५–५६ पर्यंत सरासरीनें दरसाल कापूस तीन सव्वातीन कोटी रुपयांचा बाहेर गेला, तेंच मान १८६० सालापर्यंत होतें, म्हणजे १८५५–६० पांच सालांची सरासरी काढतां ३॥ कोटी रुपयांचा कापूस बाहेर गेला, असें दिसून येतें. १८६० पासून १८६५ सालांत जें कापसाला तेज आलें होतें तेणेंकरून सरासरीचें मान २२ कोटी रुपये झालें; व दोन सालें १८६४ व ६५ सालीं, ३६ पासून ३७ कोटी रुपये कापसाचे व्यापारांत या देशास मिळाले. त्या पुढील पांच सालांत हें मान उतरलें आहे तरी १५ कोटी रुपये दरसालचे सरासरीनें या देशांत येतात, म्हणजे लढाईच्या पूर्वींच्या मानापेक्षां चौपटीनें सुमारें हल्लीं कापसाची किंमत आपणांस मिळते; याप्रमाणें कापसाच्या व्यापाराची स्थिति आहे. लोकरीचे व्यापाराचीही स्थिति अशीच आहे. १८५०-५५ सालापर्यंत १५ लाख रुपयांची लोकर सरासरीनें दरसाल बाहेर गेली, पुढील पांच सालांत हें मान ३५ लाखांचें झालें. त्याच्या पुढील पांच सालांत हें मान ७७ लाख झालें. त्याच्या पुढील पांच सालांत हें मान थोडें कमी झालें आहे. तथापि ६० पासून ६५ लाख किंमतीची लोकर हल्लीं बाहेर जाते. त्याचप्रमाणें जवसाचे व तिळाचे व्यापाराची वृद्धि झाली आहे. प्रथम वरील जिन्नस विलायतेस रूस देशांतून जात असत. १८५४ सालीं रूस लोकांबरोबर इंग्रेज व फ्रेंच लोकांची लढाई सुरू झाली. त्याच्या पूर्वींचें सालीं ४७ लाख रुपये किंमतीचे हे जिन्नस बाहेर देशीं हिंदुस्थानांतून गेले. १८५४–५५ सालीं हें मान एकदम दुपटीचें झालें. १८५५–५६ सालीं हेंच मान तिपटीचें झालें, म्हणजे सव्वा कोट रुपयांचा माल

बाहेर गेला. पुढें इकडील जिनसाची चहा अशी वाढली कीं, लढाई बंद झाली तरी हें मान वाढत गेलें. हल्लीं कांहीं कमती झालें आहे तरी सव्वा कोटीला तूट नाहीं. तांदुळाविषयीं हाच चमत्कार झाला आहे. बंगाल्यांतून व पूर्वेकडील मुलखांतून पूर्वी दोन सव्वादोन कोट रुपयांचा हा माल बाहेर जात असे. अमेरिकेंतील लढाई सुरू झाली तेव्हांपासून युरोपांतील एकंदर मुलखांत आपले तांदूळ गोड लागूं लागले. त्यांचा खप इतका वाढला कीं, १८६० सालीं जे २। कोटी रुपयांचे तांदूळ बाहेर गेले, त्यांचे ठिकाणीं १८६२ सालीं ३॥ कोटी, १८६४ सालीं ४ कोटी, १८६५ सालीं ५॥ कोटी रुपयांचे तांदूळ आपण धाडूं लागलों. लढाई संपून बरींच वर्षे झालीं तरी पेगू व सयाम व बंगाली तांदूळ युरोपांतील देशांत आवडीनें लोक घेतात.

वर तपशिलवार हकीकत मुख्य मुख्य व्यापाराच्या जिनसांबद्दल लिहिली आहे, त्याजवरून आपल्या देशाची समृद्धि व वैभव कशी असाधारण आहेत हें लक्षांत आलें असेल. चीन देशांतील जिन्नस, अरबस्थानांतील जिन्नस, अमेरिकेंतील जिन्नस, रूस देशांतील जिन्नस ह्या देशांत हवे तसे, हवे तितके पिकतात हें आपलें महत्भाग्य आहे, असें मानण्यास काय अडचण आहे? जमीन, पाणी व हवा यांची अनुकूलता आहे, मनुष्यबळाची मात्र आप्ति आहे. आपल्या लोकांच्या दौर्बल्यामुळें एक जिन्नस पिकविण्याकडे विशेष लक्ष आपण पुरविल्यास दुसऱ्या जिनसाची कमतरता होते हा अनुभव कापसाचें पीक वाढलें त्या सालीं धान्य महाग झालें तेव्हां प्रत्यक्ष सर्वत्रांस आला. हें असो. या संबंधानें विशेष विस्तार आतां करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

एकंदरींत आपला परदेशाशीं व्यापार कसा वाढत गेला आहे याचें स्वरूप लक्षांत येण्याकरितां १८३४ सालापासून आजपर्यंत दर पांच सालाची सरासरी काढून खालील कोटक तयार केलें आहे त्यावरून मान ध्यानांत येईल.

| | माल देशांत बाहेरून आला तो रुपये | माल देशांतून बाहेर गेला तो रुपये | व्यापाराची एकंदर बेरीज रुपये |
|---|---|---|---|
| १८३४–३९ | ७$\frac{२}{३}$ कोटी<br>७,३१,५९,५३२ | ११$\frac{१}{३}$ कोटी<br>११,३२,२५,९८६ | १८$\frac{२}{३}$ कोटी<br>१८,६३,८५,५१८ |
| १८३९–४४ | १०$\frac{१}{२}$ कोटी<br>१०,४५,३५,९३० | १४$\frac{१}{४}$ कोटी<br>१४,२५,२५,६१४ | २४$\frac{३}{५}$ कोटी<br>२४,७०,६१,५४४ |
| १८४४–४९ | १२$\frac{१}{५}$ कोटी<br>१२,२०,९३,७५४ | १७ कोटी<br>१६,९९,५५,४८० | २९$\frac{१}{५}$ कोटी<br>२९,२०,४९,२३४ |
| १८४९–५४ | १५$\frac{४}{५}$ कोटी<br>१५,८५,१३,३९६ | २० कोटी<br>२०,०१,७१,२४४ | ३५$\frac{४}{५}$ कोटी<br>३५,८६,८४,६४० |
| १८५४–५९ | २६$\frac{४}{५}$ कोटी<br>२६,८५,२५,४१६ | २५$\frac{१}{५}$ कोटी<br>२५,८४,७२,६७८ | ५२$\frac{४}{५}$ कोटी<br>५२,६९,९८,०९४ |
| १८५९–६४ | ४१ कोटी<br>४१,०६,२९,६७० | ५३$\frac{१}{६}$ कोटी<br>४३,१६,९२,०६० | ८४$\frac{१}{४}$ कोटी<br>८४,२३,२१,७३० |
| १८६४–६९ | ४९$\frac{१}{३}$ कोटी<br>४९,३१,४७,३५० | ५७$\frac{२}{३}$ कोटी<br>५७,६६,४७,०२८ | १०७ कोटी<br>१०६,९७,९४,३७८ |
| १८७० | ४६$\frac{५}{६}$ कोटी<br>४६,८८,२३,२६० | ५३$\frac{१}{२}$ कोटी<br>५३,५१,३७,२८० | १०० कोटी<br>१००,३९,६०,५४० |
| १८७१ | ३८$\frac{५}{६}$ कोटी<br>३८,८५,८७,२८० | ५७$\frac{४}{५}$ कोटी<br>५७,५५,२५,९०० | ९६$\frac{२}{५}$ कोटी<br>९६,४१,१३,१८० |

*परिशिष्ट टीप ४ पहा.*

सदरील तपशिलावरून तीन गोष्टींची फोड वाचणारांच्या ध्यानांत सहज येइल. ( १ ) बाहेरून येणाऱ्या मालाचा आंकडा माल बाहेर जातो त्यापेक्षां पुष्कळ कोटीचे फरकानें कमी असतो. ( २ ) हा फरक दरसाल वाढत चाल्ला आहे. १८३४ सालीं चार कोटींचा फरक होता, तो १८७० सालीं साडेसात कोटी, व १८७१ सालीं १९ कोटींचा फरक पडला. ज्या मानानें बाहेर जाणाऱ्या मालाची किंमत अथवा मान वाढलें आहे, त्या मानानें देशांत येणाऱ्या मालाचें मान अथवा किंमत वाढली नाहीं. आपला व्यापार दोन्ही रीतीनीं वाढला आहे, तरी स्वतंत्र

मुलखाचा व्यापार जसा सारखा दोन्ही अंगानें वाढतो तसा वाढला नाहीं. मूळ बाहेर जाणारा माल बाहेरून येणाऱ्या मालापेक्षां कमी असावा हें ज्या देशांतील व्यापाराचें स्वरूप अविकृत असतें त्या देशाच्या व्यापारांत मुख्य लक्षण आढळतें. तें लक्षण आपल्या देशाच्या व्यापारांत दिसत नाहीं एवढेंच नाहीं, परंतु ही विकृति दिवसेंदिवस वाढत चालली आहे. याविषयींच्या कारणाचा विचार पूर्वीं झाला आहे तेव्हां पुनरुच्चार करणें जरूर नाहीं. आपल्या देशाची संपत्ति वाढत आहे किंवा नाहीं, याचें मान देशांतून जो माल बाहेर जातो त्यावर केवळ बांधतां येत नाहीं. जो देशांत बाहेरून माल यतो तो माल दिवसेंदिवस जास्ती खपविण्याचें सामर्थ्य देशाच्या अंगीं आल्यास देशांत संपत्ति वाढल्याचें अनुमान करण्यास विशेष कारण होतें. आपल्या देशांतून बाहेर माल जातो त्याचें मान वाढलें आहे, याचें एक उघड कारण देशावरील कराचें ओझें फार वाढलें आहे. जितकें कराचें ओझें फार वाढतें तितक्या अंशानें माल विकणारे लोकांस आपला माल विकण्याचें विशेष जरूर पडतें. आतां हें कराचें मान कसें वाढलें आहे याचें प्रमाण पाहिलें असतां १८३४—३९ या पांच सालांत सरासरीनें २२ कोटी रुपये दरसाल इंग्रजी अमलांतील हिंदुस्थानची वसुली बेरीज होती. ही वसुलाची रकम पुढील पांच सालांत सरासरीनें २४ कोट रुपये झाली. पुढील पांच सालांत वसुलाची बेरीज दरसाल सरासरी २५ कोट रुपयांची होती. पुढील पांच सालांची सरासरी २८ कोट रुपयेपर्यंत वाढली. पुढील पांच सालें, म्हणजे १८५४—५९, यांत हें सरासरीचें मान ३४ कोट रुपयेपर्यंत चढलें. त्याचे पुढील पांच सालांत हें मान ४५ कोट रुपयांचें झालें. पुढील पांच सालांत हें मान ४७ कोटींचें झालें. व आलीकडे पांच सालें हें मान ५० कोटींवर येऊन बसलें आहे. एकंदरींत तीस वर्षांपूर्वीं जो हिंदुस्थानाचा वसूल होता त्याचे दुपटीनें हल्लीं वसुली बेरीज झाली आहे. इतका वसूल वाढला आहे, यामुळें त्याची फेड करण्याकरितां शेतकरी व इतर धंद्याचे लोकांस बाहेर

देशीं माल पूर्वीपेक्षां ज्यास्ती पाठवावा लागतो. आपल्या देशांतच सदर माल खपवूं म्हटल्यास सवड नाहीं. बाहेर देशीं आपल्या मालास किंमत बरी येते. यामुळें आपण बाहेर माल धाडतों. जितका माल आपण बाहेर धाडतों, त्यापैकीं जेवढा भाग कराची रक्कम दुप्पट झाली आहे त्याची भरती करण्याकरितां बाहेर देशीं जातो, तितक्या मानानें आपला व्यापार खरोखरी वाढला असें म्हणवत नाहीं. एकाद्या गृहस्थास पुष्कळ सावकार लोकांचें कर्ज असलें म्हणजे त्याचें फेडीकरितां त्याचा महिन्याचा पगार आला, किंवा सालीना त्यास तैनात पोंचते ती पोंचली, म्हणजे त्याच्या पगाराचा किंवा तैनातीचा सर्व ऐवज रुपयांच्या रूपानें किंवा त्याचें रूपांतर होऊन बाजारांत वांटला जातो, यासंबंधानें त्याचा सर्व पैसा घराबाहेर जातो म्हणून त्याचा बाजारांत व्यापार मोठा चालला आहे असें म्हणतां येणार नाहीं. तद्वत् आपल्या देशाची स्थिति आहे. आपल्या देशाच्या वसुलापैकीं विलायतेस जो भाग खर्चला जातो त्याच्या संबंधाचा विचार वेगळा आहे. त्याची फोड समजुतीपुरती पूर्वीं झाली आहे. हल्लींचा विचार स्वतंत्र आहे. जो आपला बाहेर देशांशीं व्यापार होतो त्यापैकीं सरकारच्या वसुलाची बेरीज भरून देण्याकरितां रयत लोकांस आपला माल विकण्याचें जितकें जरूर पडतें, व त्या संबंधानें जितका माल बाहेर जातो, तितक्या अंशानें देशाचा व्यापार वाढला असें म्हणतां येत नाहीं. हा विचार सर्वत्रांचे ध्यानांत सहज येत नाहीं, परंतु यांत विशेष गूढ म्हणण्यासारखें कांहीं नाहीं. मागील तीस वर्षांत आपला व्यापार कांहींच वाढला नाहीं असें म्हणतां येत नाहीं. व्यापार वाढला आहे परंतु वर जे तपशिलवार आंकडे दिले आहेत त्याजवरून व्यापार वाढल्याचें जें मान कळून येतें तें मात्र वास्तविक मान नाहीं. त्यापैकीं जितका माल कराचे फेडीकरितां आपण बाहेर देशीं धाडला तितका व्यापार वाढला नाहीं, असें समजणें जरूर आहे. हें अनुमान खरें आहे अशा विषयीं दुसरें प्रमाण असें आहे. पृथ्वीतील सर्व स्वतंत्र देशांच्या

व्यापाराची स्थिति अशी आहे कीं, एका देशाचे निरनिराळे प्रांतांचा देशांतले देशांत जो परस्पर व्यवहार होत असतो त्यापेक्षां त्या देशाचा अन्य देशाशीं व्यवहार कमी असतो, किंवा निदान या दोन्हीमध्यें कांहीं सारखें प्रमाण असतें. आपल्या देशाची स्थिति तशी नाहीं. बाहेर देशाशीं आपली एकंदरींत व्यापार संबंधानें सुमारें १०० कोट रुपयांची घडामोड चालते. परंतु आपल्या देशांतील बंदरांचा एकमेकांशीं व्यापार अवघा २५ कोटी रुपयांचा होतो. यावरून विचार पाहतां, २० कोटी प्रजेची एकमेकांशीं जी देवघेव होते तिचें मान सदर प्रजेचा दूरदेशस्थ द्वीपांतील लोकांशीं जो व्यवहार घडतो त्याच्या चौथ्या हिशानें आहे. यावरूनही वरील अनुमानास बळकटी येते, म्हणजे आलीकडे जो आपला माल बाहेर जास्ती जातो तितक्या अंशानें आपला व्यापार वाढला असें म्हणतां येत नाहीं.

आपल्या देशांतून बाहेर देशीं जो माल जातो त्याचें मान वीस वर्षांत पुष्कळ वाढलें आहे, तथापि आंकड्यांवरून जो बोध होतो तो खरा नव्हे, त्याप्रमाणें देशाची संपत्ति व सामर्थ्यहीं वाढलीं नाहींत; देशांतून पुष्कळ माल सरकारच्या वसुलीची बेरीज दुप्पट वाढली त्याच्या नडीनें बाहेर देशीं पाठविला जातो, तितक्या मानानें व्यापार वाढला असें होत नाहीं; ह्या सर्व गोष्टींचा खुलासा वर विस्तारानें केला आहे, व सदरील अनुमानास बळकटी आणणारें दुसरें प्रमाण दाखविण्यांत आलें कीं, देशाची खरोखर संपत्ति वाढून आपला व्यापार वाढला असता तर, आपल्या देशांतील बंदराचा एकमेकांशीं व्यापारही त्या मानानेंच वाढला असता. तो व्यापार तसा वाढला नाहीं तेव्हां परद्वीपस्थ लोकांशीं जो आपला वाढलासा दिसतो तो पुष्कळ अंशानें मिथ्याभास आहे, ह्याचेंही स्पष्टीकरण वर केलें आहे. हल्लीं देशांत जो माल बाहेरून येतो त्याबद्दल थोडा विचार कर्तव्य आहे. आपल्या देशांत सोन्यारुप्याच्या खाणी नाहींत, व दागिन्यांच्या कामीं व चलनीकरितां कोट्यावधी रुपयांच्या किंमतीच्या सोन्यारुप्याचा खप आपल्या देशांत

दरसाल होतो, या दोन कारणांमुळें बाहेरून येणाऱ्या मालामध्यें सोनें व रुपें हे जिन्नस कांहीं अंशीं मुख्य आहेत, व हे जितके विपुलतेनें आपणांस मिळतील तितकी या देशाची स्थिति चांगली होणार आहे. एकंदर २० कोटी प्रजेच्या दागिन्यांच्या कामीं कोटयावधी रुपयांचें सोनें व रुपें दरसाल झिजून मातींत मिळत आहे, तशीच चलनीच्या कामीं ही झीज बहुत होत आहे. एकंदरींत अनुमान असें आहे कीं, दरसाल चार कोट रुपयांचें चलनींच्या कामीं सोनें व रुपें लागतें, व त्याच मानानें दागिन्यांची झीजही होत असेल. एकंदरींत आठ कोटी रुपयांचें सोनें व रुपें या देशांत आलें नाहीं तर या देशाची दरसाल सर्वस्वीं अडचण होणारी आहे. यामुळें ह्या सोन्यारुप्याची जरूर आपणांस पृथ्वींतील इतर देशांच्या लोकांपेक्षां फार नडीची आहे. फ्रेंच लोकांनीं मागील दोन सालांत जर्मन लोकांस लढाईचे खर्चाकरितां सुमारें दोनशें कोट रुपये भरले, त्यांपैकीं सुमारें एक तृतीयांश रकमेची फेड नवीन कर न बसवितां चलन बदलून केली. म्हणजे पूर्वी चलन सोन्यारुप्याची होती, ती कमी केली, व त्या ऐवजीं नोटींचे कागद चालवून सर्व चलनीचें सोनें व रुपें जर्मन लोकांच्या पदरांत घातलें. यामुळें एक तृतीयांश रक्कम नवीन कर न बसवितां त्यांस एकदम देतां आली. तसें आपल्या लोकांचे अंगीं शहाणपण, समज, व विश्वास नाहीं, यामुळें चलनीच्या कामीं कोटयावधी रुपयांचें सोनें व रुपें गुंतून राहिलें आहे, तसेंच, दागिन्यांच्या वेडामुळेंही सोन्यारुप्याचा मोठा खप आपणांत होतो. सदरील कारणांकरितां बाहेरून येणाऱ्या मालामध्यें सोन्यारुप्याची योग्यता विशेष गणली आहे.

बाहेरून येणाऱ्या मालाचें प्रमाण सालोसाल कसें वाढलें आहे याचें दिग्दर्शन पूर्वी एके ठिकाणीं केलें आहे, परंतु त्यांत सोन्यारुप्याची व इतर जिनसांची फोड केली नाहीं. ती फोड समजणें अवश्य आहे याजकरितां पुढील कोष्टक तयार केलें आहे.

| | बाहेरून सोनें व रुपें आलें तें एकंदर | सोनें व रुपें धरून एकंदर माल आला तो | बाहेर माल गेला तो |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| १८३४–३५ | २ कोटी | ६। कोटी | ८ कोटी |
| | | ६,१५,४१,२९० | ८,१८,८१,६१० |
| १८३५–३९ | २¼ कोटी | ७⅓ कोटी | ११¼ कोटी |
| | २,३४,५०,००० | ७,३१,५९,५३२ | ११,३२,२५,९८६ |
| १८३९–४४ | २¾ कोटी | १०⅔ कोटी | १४ कोटी |
| | २,७६,२१,६४० | १०,४५,३५,९३० | १४,२५,२५,६१४ |
| १८४४–४९ | ३ कोटी | १२¼ कोटी | १७ कोटी |
| | ३,०७,३२,५०० | १२,२०,९३,७५० | १६,९९,५५,४८० |
| १८४९–५४ | ४ कोटी | १६¾ कोटी | २० कोटी |
| | ४,७९,२८,०१० | १५,८५,१३,३९० | २०,०१,७१,२४० |
| १८५४–५९ | ११¼ कोटी | २६¾ कोटी | २६ कोटी |
| | ११,२७,५१,४९० | २६,८५,२५,४१० | २५,८४,७२,६८० |
| १८५९–६४ | १७ कोटी | ४१ कोटी | ४३ कोटी |
| | १७,०९,१५,१४० | ४१,०६,२९,६७० | ४३,१६,९२,८६० |
| १८६४–६५ | २१ कोटी | ४९¼ कोटी | ६९½ कोटी |
| | २१,३६,३३,५२० | ४९,५१,४२,७५० | ६९,४७,१७,९४० |
| १८६५–६६ | २६ कोटी | ५६ कोटी | ५७½ कोटी |
| | २६,५५,७३,०१० | ५६,१५,६५,२९० | ६७,६५,६४,७७० |
| १८६६–६७ | १४ कोटी | ४५ कोटी | ५० कोटी |
| | १३,२३,६९,०४० | ४२,२७,५६,११० | ४४,२९,१४,९७० |
| १८६७–६८ | ११ कोटी | ४९ कोटी | ५१½ कोटी |
| | ११,७७,५३,७३० | ४७,४८,११,५७० | ५२,४४,६०,०२० |
| १८६८–६९ | १५ कोटी | ५१ कोटी | ५४ कोटी |
| | १५,१५,५९,५३० | ५१,१४,६०,९५० | ५४,४५,७७,४४० |
| १८६९–७० | १४ कोटी | ४७ कोटी | ५३ कोटी |
| | १३,९५,४८,०६० | ४६,८८,२३,२६० | ५३,५१,३७,२८० |
| १८७०–७१ | १५॥ कोटी | ४९ कोटी. | ५८ कोटी |
| | ५,४४,४८,२२० | ३८,८५,८७,२८० | ५७,५५,२५,९०० |

परिशिष्ट टीप ५ पहा.

सदरील तपशिलावरून असें कळून येईल कीं, बाहेरून येणारा माल व सोनेंरुपें ह्यांचें मान आलीकडील दहा वर्षांत पहिल्या वीस वर्षांपेक्षां फार वाढलें आहे, तथापि सोनें रुपें व इतर जिन्नस धरूनहा देशांत येणारा माल दरसाल देशांतून बाहेर जाणाऱ्या मालाच्या रकमेहून फार कमी आहे. ही तूट पूर्वीं जो राज्यव्यवस्थेच्या संबंधानें खंडणीचा प्रकार सांगितला त्या रूपानें आपणांस सोसावी लागते. ही खंडणी देण्याचें जरूर न पडतें तर हल्लीं जें सोनें रुपें आपल्या देशांत येतें त्यापेक्षां पुष्कळ कोटी ज्यास्त आलें असतें. हा विचार पूर्वीं विस्तारानें झाला आहे, याजकरितां त्याचा पुनः विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. बाहेरून येणारा माल आलीकडे दहा वर्षांत वाढला आहे ही जरी गोष्ट खरी आहे, तथापि या सर्व विषयाचें स्वरूपच असें आहे कीं, यांतील प्रथम दर्शन सत्य नसतें. बाहेरून येणारा माल पुष्कळ पटीनें वाढला आहे असें दिसतें खरें, परंतु त्याची बारीक फोड करून पाहिली असतां प्रथम झालेला भास दूर होतो. साधारणतः सरळ व बरोबरीच्या व्यापारांत जितका बाहेरील देशांचा जिन्नस आपल्या देशांतील चालू उद्योगांत कमतरता न होतां देशांत खपेल तितकें देशाचें सामर्थ्य वाढलें असें मानण्यास हरकत नाहीं. देशांतील उद्योगास वाळवी लागून बाहेर देशाचा माल जास्ती बाहेर जाऊं लागल्यानें केवळ एकंदर देशाचें सामर्थ्य वाढलें असें ह्मणतां येणार नाही. हा बारीक विचार सर्वत्रांचे ध्यानांत यावा म्हणून दृष्टांत घेऊं. एक मोठें कुटुंब आहे असें समजा. त्यांतील पुरुष निरनिराळे धंदे करून एकमेकांची गरज पुरवितात; कोणी शेतकी करतो, कोणी वस्त्रें विणतो, कोणी व्यापार करतो, कोणी शिवतो; कोणी फाडतो, कोणी कांहीं, कोणी कांहीं, धंदा करून एकमेकांस साह्य करतात, असें मानलें तर अशा कुटुंबाचें काम कुटुंबाबाहेर दुसऱ्या लोकांस फार थोडें मिळेल; व त्या संबंधानें त्याचा बाहेर व्यापारही थोडाच चालेल. त्याच कुटुंबांत आळस शिरल्यानें ह्मणा, किंवा भांडणें लागल्यानें म्हणा, कोणी कोणास मदत करीनासा झाला, सर्व

मागील मिळवलेली संपत्ति मोडून तोडून खाऊं लागले, व कुटुंबाबाहेरील लोकांकडून आपआपलीं सर्व कामें करून घेऊं लागले, असें झालें तर त्या कुटुंबांत बाहेर तयार झालेल्या मालाचा खप पुष्कळपट वाढला असें दिसेल, येवढ्यानें त्या कुटुंबाच्या पहिल्या स्थितीपेक्षां ह्या दुसऱ्या स्थितींत तें कुटुंब अधिक सधन किंवा समर्थ झालें असें कोणी म्हणणार नाहीं.

त्या आळशी व चैनी कुटुंबाप्रमाणें आपल्या देशाची हल्लीं स्थिति आहे. केवळ आंकड्यांच्या तपशिलावर जाऊन उपयोग नाहीं. बाहेर देशांतून जो जास्ती माल येतो तो कोणच्या तऱ्हेचा आहे, त्या मालाच्या तोडीचा दुसरा माल पूर्वीं आपल्या देशांत उत्पन्न होत होता किंवा नाहीं, नवीन बाहेरून माल आल्यानें देशांतील एकंदर उद्योगास कमतरता आली किंवा उद्योग वृद्धि पावला आहे, हे सर्व विचार अवश्य झाले पाहिजेत.

शिवाय वर जे सालवार आंकडे लिहिले त्यांवरून जितका बाहेरचा माल या देशांत जास्ती खपतो असें आपणांस वाटतें, तितका खरोखरी आपल्या देशांत, आपल्या लोकांत खपत नाहीं. सदर मालापैकीं पुष्कळ माल आपल्या देशांत येतो, परंतु आपल्या देशांतील लोकांत त्याचा खप होत नाहीं. आपल्या देशांत साहेब लोकांची वस्ती आहे, त्यांचे सोयींकरितां व त्यांचे कारखान्यांकरितां पुष्कळ माल येतो व खपतो. तेव्हां तितक्या मानानें बाहेर देशाच्या मालाचा खप आपल्या लोकांत वाढला असें ह्मणतां येत नाहीं.

या दोन्ही संबंधानें विचार पहातां विलायतेखेरीज दुसऱ्या देशांशीं आपला व्यापार चालतो त्यापासून आपला खरोखर नफा आहे. म्हणजे सरळ व्यापारांत बरोबरीच्या नात्यानें सदर देशांतील माल आपल्या देशांतील मालाच्या मोबदल्यानें येतो. व बहुतकरून त्या मालाच्या संबंधानें देशांत पूर्वीं उत्पन्न अगर तयार होणाऱ्या मालास विशेष प्रकारचा प्रत्यवाय येत नाहीं, अशा तऱ्हेचा हा व्यापार आहे. विलायतेशीं जो व्यापार घडतो त्याचें स्वरूप या दोन्ही संबंधानें वेगळें आहे. मूळ व्यापार बरोबरीच्या नात्यानें होत नाहीं. शिवाय आपल्या देशांत उत्पन्न अथवा तयार होत

नाहीं अशा मालाच्या मोबदला तिकडील माल येत नाहीं. बहुतकरून या देशांत पूर्वी उत्पन्न व तयार होत असणाऱ्या मालाच्या ठिकाणीं सदर माल येतो, व जो माल असा येतो त्याचा बोजा आपणांवर पडून किफायत त्या लोकांसच होते. या तऱ्हेचा हा व्यापार आहे, या करितां बाहेरून येणाऱ्या मालापैकीं विलायतेहून येणाऱ्या मालाचा व इतर देशांतून येणाऱ्या मालाचा विचार स्वतंत्र केला पाहिजे.

विलायतेहून येणाऱ्या व विलायतेखेरीज अन्य देशांतून येणाऱ्या मालाची फोड केली असतां मागील १४ वर्षांत खालीं लिहिल्याप्रमाणें आपल्या व्यापाराचा क्रम वाढत चालला आहे असें कळेल.

| | विलायतेहून माल आला त्याची किंमत रु. | इतर देशांतून आला त्याची किंमत रु. |
|---|---|---|
| १८५८–५९ | २२ कोटी | ९ कोटी |
| | २२,१०,८७,२६० | ८,९८,४३,३१० |
| १८५९–६० | २१॥ कोटी | १३ कोटी |
| | २२,५७,८४,६९० | ११,९६,७१,८१० |
| १८६०–६१ | ३२ कोटी | ८॥ कोटी |
| | ३२,००,२५,०४० | ८,६१,९६,०१० |
| १८६१–६२ | २५$\frac{१}{४}$ कोटी | ८॥ कोटी |
| | २५,४१,८०,४३० | ८,७५,२७,५०० |
| १८६२–६३ | २५$\frac{३}{४}$ कोटी | १२। कोटी |
| | २५,७५,३१,९७० | ११,५१,८४,२०० |
| १८६३–६४ | २८ कोटी | १५ कोटी |
| | २८,०९,६१,३१० | १५,०४,५२,१२० |
| १८६४–६५ | ३३$\frac{१}{३}$ कोटी | १६$\frac{३}{४}$ कोटी |
| | ३३,३१,७९,१३० | १६,७९,०२,५८० |
| सरासरी | ७ ) १८८ कोटी | ७ ) ८३ कोटी |
| | २७ कोटी | १२ कोटी |
| | ७ ) १८९,२७,५७,९१० | ७ ) ८१,६७,७७,६१० |
| | २७,०३,९३,९८७ | ११,६६,८२,५१५ |

| | विलायतेंतून माल आला त्याची किंमत रु. | इतर देशांतून आला त्याची किंमत रु. |
|---|---|---|
| १८६५–६६ | ३०। कोटी | १९। कोटी |
| | ३०,२४,००,०१० | १९,२७,४२,७४० |
| १८६६–६७ | ३३॥ कोटी | २२ कोटी |
| | ३३,५३,०७,१९० | २२,६२,५८,१०० |
| १८६७–६८ | २५॥ कोटी | १६॥ कोटी |
| | २५,४८,४५,०७० | १६,७९,११,१२० |
| १८६८–६९ | ३३⅓ कोटी | १४⅓ कोटी |
| | ३१,६२,९३,१५० | १५,८५,१८,४२० |
| १८६९–७० | ३६½ कोटी | १५ कोटी |
| | ३५,३९,१०,७३० | १५,७४,७०,२२० |
| १८७०–७१ | ३१⅔ कोटी | १५॥ कोटी |
| | ३०,३५,७०,५५० | १६,५२,५८,७१० |
| १८७१–७२ | २९¾ कोटी | ९ कोटी |
| | २८,८४,९१,०३० | १०,००,८८,२५० |
| सरासरी | ७ ) २२० कोटी | ७ ) ११३ कोटी |
| | ३१॥ कोटी | १६ कोटी |
| | ७ ) २१५,४९,०५,७३० | ७ ) ११६,८२,४१,५६० |
| | ३०,७८,४३,६७५ | १६,६८,९१,६५१ |

*परिशिष्ट टीप ६ पहा.*

एकंदरींत मागील चौदा वर्षांत विलायतेशीं व विलायतेखेरीज इतर देशांशीं आपला व्यापार वाढला आहे. त्याचें मान पाहतां पहिल्या सात वर्षांच्या सरासरीनें दरसाल विलायतेहून माल आला त्याचें २७ कोटीचें मान होतें, तें पुढील सात वर्षांत सरासरीचें मान एकतीस कोट झालें. अन्य देशांहून येणारा माल पहिल्या सात वर्षांच्या सरासरीनें दरसाल १२ कोट रुपयांचा आला, त्याचेंच मान दुसऱ्या सात वर्षांत १६ कोट रुपयांचें सरासरीनें झालें. एकंदरींत आपला व्यापार विलायतेशीं वाढला आहे त्याहून ज्यास्त प्रमाणानें अन्य देशांशीं वाढला आहे असें कळून येईल, हें एकंदरीच्या आंकड्यांवरून कळतें. याचा पोटतपशील पाहिला असतां हा प्रकार विशेष रीतीनें स्पष्ट होतो.

आपल्या देशांत व्यापाराच्या संबंधानें जो बाहेरून माल येतो

त्यापैकीं जो विलायतेहून माल येतो त्यामध्यें व अन्य देशांतून येतो त्यामध्यें तीन प्रकारचा भेद आहे, असें वरील तपशिलावरून ध्यानांत येईल.

प्रथम, विलायतेहून जो माल येतो त्याबद्दलची देवघेव बरोबरीच्या नात्यानें सरळ व्यापाराची होत नाहीं. दुसरें, विलायतेहून जो माल येतो तो बहुशा या देशांत उत्पन्न व तयार होत नाहीं अशा प्रकारचा नसून पूर्वकाळीं व अंशतः हल्लींही ज्या कच्च्या व तयार केलेल्या मालाबद्दल या देशांतील कारागीर लोकांची सर्व पृथ्वीवर कीर्ति होती, त्या लोकांच्या उद्योगास कमतरता आणून त्या ठिकाणीं सदर विलायती मालाचा खप होत आहे.—व तिसरें, अशा तऱ्हेचा जो माल नाहीं तो आपल्या देशांत येतो येवढेंच मात्र खरें, परंतु आपल्या लोकांच्या सोयीचें व गरजेचें कामीं त्याचा विशेष उपयोग होत नाहीं, तद्देशीय वस्तींतच त्याचा विशेष खप होतो. पहिल्या प्रकाराची फोड आंकड्यानें दाखवितां येत नाहीं. कारण विलायतेशिवाय इतर देशांतन जो माल येतो तो व्यापार बहुशा विलायतेंतील व्यापारी लोकांच्याच हातीं आहे. चीन देशास आपण नऊ कोट रुपयांची अफू धाडतों व तिकडून तीनपासून चार कोट रुपयांचा चहा व रेशमी कापड आणतों, हे दोन्ही व्यापार मुख्यत्वेंकरून इंग्रज लोकांच्याच स्वाधीन असल्यामुळें या व्यापारांत जी आपल्या नफ्याची बाकी आपल्या पदरांत पडावी ती प्रत्यक्ष चीन देशांतून आपल्या देशास मिळत नाहीं. विलायतेचा चीन देशाशीं व्यापार होतो त्यांत चीन देशाची बाकी विलायतेकडे निघते त्यांत वजावाट होऊन विलायतेंहूनच तो पैसा आपल्या पदरांत पडतो, यामुळें पहिल्या गोष्टीचा खुलासा आंकड्यानें दाखवितां येईल असा नाहीं. तथापि एकंदरींत त्याच्या सत्यतेविषयीं शंका वाटण्यास कारण नाहीं. या संबंधानें पुढें तपशिलवार विलायतेहून माल आल्याबद्दलचे जे आंकडे दिले आहेत त्यांचे पोटांत सरकारी माल व रेलवेचा माल तसेंच सोनेंरुपें या सर्वांचा समावेश होतो असें समजावें. पुढील पृष्ठावर कोष्टक दिलें आहे त्यावरून मागील चौदा वर्षांत विलायते-हून माल आला व विलायतेस गेला, तसाच अन्य देशांहून माल आला व अन्य देशीं आपण धाडला, याचें मान ध्यानांत आणलें असतां हा प्रकार उघड लक्षांत येईल.

| | विलायतेहून माल आला त्याची किंमत | विलायतेस गेला त्याची किंमत | अन्य देशांहून आला | अन्य देशांस गेला |
|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. |
| १८५८–५९ | २२ कोटी | १० २/३ कोटी | ९ कोटी | १७ २/३ कोटी |
| | २२,१०,८७,२६० | १०,६६,९८,४८० | ८,९८,४३,३९० | १७,६०,८६,२६० |
| १८५९–६० | २१॥ कोटी | ११ कोटी | १३ कोटी | १९॥ कोटी |
| | २२,५७,८४,६९० | ११,०१,४८,१६० | ११,९६,७१,८१० | १९,५१,७४,८२० |
| १८६०–६१ | ३२ कोटी | ११।।। कोटी | ८॥ कोटी | १७ २/३ कोटी |
| | ३२,००,२५,०४० | ११,२६,१३,७५० | ८,६१,९६,०१० | १७,६२,७८,३५० |
| १८६१–६२ | २५ १/३ कोटी | १४ १/३ कोटी | ८।।। कोटी | १९ २/३ कोटी |
| | २५,४१,८०,४३० | १४,२१,००,७२० | ८,७५,२७,५०० | १९,८८,००,८२० |
| १८६२–६३ | २५ १/२ कोटी | १८ २/३ कोटी | १२। कोटी | १८ १/२ कोटी |
| | २५,७५,३९,९७० | १८,५६,६९,०३० | ११,५१,८४,२०० | १८,४३,३४,९४० |
| १८६३–६४ | २८ कोटी | २७ २/३ कोटी | १५ कोटी | २१ १/२ कोटी |
| | २८,०९,६१,३९० | २७,५४,४२,८४० | १५,०४,५२,१२० | २१,४२,६५,०१० |
| १८६४–६५ | ३३ १/४ कोटी | ४५ कोटी | १६ २/३ कोटी | २२ कोटी |
| | ३३,३१,७९,१३० | ४४,९७,१२,६३० | १६,७९,०२,५८० | २१,९२,४६,२१० |
| १८६५–६६ | ३०। कोटी | ४८ १/४ कोटी | १९। कोटी | २२॥ कोटी |
| | ३०,२४,००,०१० | ४६,८७,३२,०८० | १९,२७,४२,७४० | २२,५९,८५,८६० |

| | विलायतेहून माल आला त्याची किंमत | विलायतेस गेला त्याची किंमत | अन्य देशांहून आला | अन्य देशांस गेला |
|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. |
| १८६६–६७ | ३०॥ कोटी<br>३३,५३,०७,१९० | ४३ १/३ कोटी<br>४३,३९,७६,४०० | २२ कोटी<br>२२,६२,५८,१०० | २४ १/३ कोटी<br>२४,२५,८८,३७० |
| १८६७–६८ | २५॥ कोटी<br>२५,४८,४५,०७० | २२ २/३ कोटी<br>२३,६७,७२,९३० | १६॥ कोटी<br>१६,७९,११,१२० | २० २/३ कोटी<br>२०,६१,४२,०४० |
| १८६८–६९ | ३३ १/४ कोटी<br>३१,६२,९३,१५० | २७ १/४ कोटी<br>२७,२०,६२,८३० | १४ ३/४ कोटी<br>१४,८५,१८,४२० | २५ १/४ कोटी<br>२५,२३,९७,१९० |
| १८६९–७० | ३६ १/२ कोटी<br>३५,३९,९०,७३० | २९ ३/४ कोटी<br>२९,७८,९६,४७० | १५ कोटी<br>१५,७४,७०,२२० | २४ ३/४ कोटी<br>२४,६६,८०,९७० |
| १८७०–७१ | ३१ ३/४ कोटी<br>३०,३५,७०,५५० | २७ ३/४ कोटी<br>२७,७९,८६,९८० | १५॥ कोटी<br>१६,५२,५२,७१० | २५ ३/४ कोटी<br>२५,७१,५०,३०० |
| १८७१–७२ | २९ ३/४ कोटी<br>२८,८४,९९,०३० | ३१ ३/४ कोटी<br>३२,०८,३८,८३० | ९ कोटी<br>१०,००,८८,२५० | २६ कोटी<br>२५,४६,८७,०७० |
| एकंदर | ४०६ कोटी<br>४०४,७६,६३,६४० | ३८० कोटी<br>३६९,०६,५२,१३० | १९६ कोटी<br>११८,५०,१९,१७० | ३०६ कोटी<br>३०४,९८,१८,२१० |

परिशिष्ट टीप ७ पहा.

या कोष्टकावरून विचार पहातां विलायतेहून माल व सोनेंरुप मिळून दरसाल या देशांत जिन्नस आला त्याचा आकार आपण त्या देशास माल धाडला त्यापेक्षां जास्त होत असल्यासारखें दिसतें, व अन्य-देशीं आपण माल जास्त धाडला, व अन्य देशांहून आपल्या देशांत माल कमी आला, व हें अंतर सालोसाल वाढत चाललें आहे, असें दिसतें.

एकंदरींत मागील १४ वर्षांत विलायतेहून माल व सोनेंरुपें आल त्याची बेरीज ४०६ कोट रुपये होते, व अन्य देशाहून माल आला त्याची बेरीज १९६ कोटी होते. त्याच १४ वर्षांत विलायतेस आपण माल धाडला त्याची बेरीज ३८० कोट रुपये होते व इतर देशांत जो माल धाडला त्याची बेरीज ३०६ कोट रुपये होते. एकंदरींत ८४ कोटी रुपयांची तफावत चौदा वर्षांच्या व्यापारांत पडली. ८४ कोटी रुपयांच्या मोबदला आपणांस व्यवहारदृष्ट्या कांहीं मिळालें नाहीं. आपण विलायतेस माल धाडला त्यापेक्षां जे सुमारें २६ कोट रुपये जास्त विलायतेहून आल्यासारखे वाटतात ते २६ कोट रुपये विलायतेच्या व्यापाराची खरी बाकी नव्हे, नुसत्या विलायतेच्या व्यापारांत आपणांस दरसाल तूट पडते हें वर सांगितलेंच आहे. अन्य देशांहून माल आला त्यापेक्षां जो आपण ११० कोट रुपयांचा माल जास्त अन्य देशीं धाडला त्याबद्दल आपल्यास ११० कोट रुपये खरोखर मिळावे, परंतु तो व्यापार साहेब लोकांचे स्वाधीन असल्यामुळें आपण जें विलायतेचें मोठें कर्ज दरसाल देणें लागतों त्यांत वजावाट होऊन बाकी आपल्या हातीं ११० कोटींच्या ऐवजीं ८४ कोटी रुपये आजी बुडत खातीं जाऊन बाकी २६ कोट रुपये मात्र आले असें दिसतें. सरळ व्यापाराचा संबंध असता तर हा असा प्रकार घडून आला नसता. यामुळें अन्य देशांकडून आपणांस योग्य मोबदला मिळत नाहीं असें त्रिलकूल समजूं नये. त्यांजकडून योग्य मोबदला मिळावयाचा त्याची वजावाट होते, व विलायतेशीं आपला संबंध विशिष्ट रीतीचा असल्यामुळें हा असा प्रकार घडतो. आपला व्यापार विलायतेशींच असता

व इतर देशाशीं आपला व्यापार बिलकूल चालत नसता, तर आपल्या देशांत व्यापाराच्या संबंधानें एक रुपयाही फाजील बाकीचा आला नसता. अन्य देशांशीं आपला व्यापार चालतो यामुळेंच विलायतेची बूड जाऊन बाकी दरसाल कांहीं थोडेंबहुत सोनेंरुपें आपल्या पदरांत पडतें.

आतां दुसऱ्या गोष्टीचा खुलासा पाहूं जातां विलायतेहून आपल्या देशांत माल येतो, त्यांतील आपल्या लोकांत ज्या मालाचा खप विशेष होतो अशा तऱ्हेच्या मालपैकीं सर्व जातींचें कापसाचें तसेंच रेशमी व लोकरी कापड, व लोखंड, पितळ, तांबें वगैरे धातु व भांडीं व मीठ हे तीन जिन्नस मुख्य आहेत. कापड सर्व तऱ्हेचें ५ कोट रुपयांचें सन १८५०–५१ सालीं आलें. तें १८६०–६१ सालीं दहा कोट रुपयांचें म्हणजे दुप्पट झालें. हल्लीं १८७०–७१ सालीं तेंच मान २० कोट रुपयांचें झालें आहे. आपल्या देशांतून कापूस, लोकर वगैरे गेलीं त्याचें मान मध्यें वाढलें होतें तें आलीकडे बरेंच कमी झालें, परंतु त्या संबंधानें विलायती कापडामध्यें अंतर पडलें नाहीं. त्याचा एकसारखा वृद्धीचा क्रम चालू आहे. वीस वर्षांत चौपटीनें मान वाढलें आहे. त्याचप्रमाणें तांबें, पितळ, लोखंड वगैरे धातूंचा माल १८५०–५५ सालांत सरासरीनें ८० लाख रुपयांचा आला. तें मान पुढील पांच वर्षांत म्हणजे १८५५–६० सालांत १ कोटी ६० लाखाचें, म्हणजे दुपटीचें झालें. पुढील पांच वर्षांत सरासरीनें पाहतां हें मान २ कोट १० लाखाचें झालें. त्या पुढील सात वर्षांत म्हणजे १८६५–७१ सालांत हें मान ३ कोट वीस लाख सरासरीच्या मानानें झालें आहे. म्हणजे वीस वर्षांत ह्या जिनसांचा खप चौपट वाढला. इकडे होणाऱ्या जिनसांपैकीं विलायतेहून इकडे येतो असा तिसरा जिन्नस मीठ, त्याचें मान १८५०–५१ सालीं ७ लाख रुपयांचें होतें, तें १८७०–७१ सालीं १७ लाखांचें झालें आहे. हें मीठ विलायतेहून येथें येतें याबद्दल सर्वत्रांस चमत्कार वाटल्यावांचून रहाणार नाहीं. या देशांत मिठाची स्वाभाविक उत्पत्ति समुद्राचें पाणी अडवून धरलें म्हणजे आयासाविना

होत असतां, तीन हजार कोसांवरून हा जिन्नस येथें येतो कसा, व येथें येऊन ह्या देशांतील मिठाहून स्वस्थ खपतो कसा, ह्याबद्दलची समजूत पुष्कळांची होत नाहीं. परंतु याविषयींची खरी माहिती अशी आहे कीं, विलायतेहून मीठ येथें तें विकण्याचा जिन्नस म्हणून जहाजांत भरून आणीत नाहींत. इकडील बंदरांतून माल भरून नेण्याकरितां जीं रिकामीं जहाजें व आगबोटी विलायतेहून इकडे येतात, त्यांत गलबतास बुडीं वजन पाहिजे म्हणून दगड, माती, वाळू वगैरे भरण्याची रीत आहे, ती दगड, वाळू, माती, येथें आल्यावर काढून समुद्रांत ओतून टाकून नंतर जहाज भरतात. त्या वाळू, माती, व दगडांचे ठिकाणीं तिकडील व्यापाऱ्यांनीं मीठ भरून धाडण्याची तजवीज केली आहे. जसें आपल्याकडे मीठ अल्पायासें तयार होतें तसेंच तिकडेही होतें. माती व वाळू जहाजांत भरल्यास त्यास या बंदरांत किंमत येत नाहीं, त्या ठिकाणीं 'निरीमा' साठीं मीठ भरलें असतां त्याचा इकडे खप होतो, व गलबत रिकामें आल्यासारखें होत नाहीं. ह्या तजविजीनें विलायती मीठ बंगाल प्रांतीं खपतें. हे तीन जिन्नस एकंदरींत केलें असतां १८५०–५१ सालीं सोनें व रुपें खेरीज करून एकंदर माल विलायतेहून ८। कोट रुपयांचा आला, त्यापैकीं सुमारें सात कोटींची भरती होतें. १८५८–५९ सालीं सोनें व रुपें खेरीज करून माल १७ कोटींचा आला, पैकीं वरील तीन जिन्नसांची बेरीज मिळून १२॥ कोटींची भरती होते. १८६७–६८ सालीं एकंदर माल सोनें-रुपें खेरीज करून ३०॥ कोटींचा आला, पैकीं वरील तीन जिनसा मिळून १८॥ कोटींची बेरीज होते. १८७१–७२ सालीं एकंदर माल ३३॥ कोटी रुपयांचा आला, पैकीं वरील तीन जिन्नस मिळून २४ कोटी रुपयांची बेरीज होते. सदरीं वर लिहिल्याप्रमाणे या जिनसांची हकीकत आहे. विलायती कापडाचा खप दिवसेंदिवस इकडे जास्ती होत चालल्यानें आपले सर्व माग व कोष्टी लोकांचे धंदे कसे बसले हा सर्वत्र अनुभव आहेच. त्याचप्रमाणें

धातूच्या संबंधानेंही इकडील व्यापारास मंदी आली आहे, व मिठाच्या संबंधानें पूर्वेकडील मुलुखांत विलायतेहून सदर मीठ येऊं लागण्यापूर्वी मीठ तयार करण्याकरितां सरकारचा मोठा कारखाना होता, त्यांत हजारों लोकांचा चरितार्थ चालत होता, तो सरकारी कारखाना सदर विलायती मीठ येऊं लागल्यापासून सरकारानीं बंद केला. याप्रमाण तीन जिनसांची हकीकत आहे.

तिसरा प्रकार वर सांगितला आहे त्याचाही खुलासा तपशिलवार दाखवितां येतो. विलायतेहून येणाऱ्या मालपैकीं वरील तीन जिनसांचा व बाकी किरकोळ जिनसा, बुकें, कागद, काचेचें सामान, छत्र्या, लांकडी सामान, वगैरे खेरीज करून पुष्कळ जिनसा आपल्या देशांत येतात येवढेंच खरें, परंतु त्यांचा खप आपल्या लोकांत होत नाहीं, व तत्संबंधानें आपल्या देशाचा व्यापार वाढला असेंही होत नाहीं. ह्या जिनसा येणेंप्रमाणें, दारू-सामान, बंदुकी, हत्यारें वगैरे, विलायती कोळसा, विलायती स्टोर लष्करी व रेल्वे खात्याकडे वगैरे खर्चावयास आणितात तो, ह्या सर्व जिनसांचा खप बहुशः आपल्या लोकांत होत नाहीं. साहेब लोकांची वस्ती व त्यांचे कारखाने इकडे वाढल्यामुळें हे जिन्नस पूर्वीपेक्षां आपल्या मुलुखांत जास्त येतात. एक कोट रुपये किंमतीची दारू, एक कोट रुपये किंमतीचे कोळसे, दीड कोट रुपयांचें रेल्वेचें सामान, व बाकी किरकोळ जिन्नस सुमारें अर्धा कोट मिळून सुमारें चार पासून पांच कोट रुपयांचा माल हरतऱ्हेचा ह्या देशांत अलीकडे दर साल येतो. या जिनसांचा खप आपल्या लोकांत विशेषतः होत नाहीं, ह्यामुळें त्या मानानें आपला व्यापार वाढला असें ह्मणणें बरोबर नाहीं.

एकंदरींत विचार पाहतां विलायतेशीं आपला व्यापार थोडाबहुत वाढत आहे तें मान कायम राहून अन्य देशांशीं व्यापार दिवसेंदिवस जास्त प्रमाणानें वाढत चालला आहे हें चिन्ह चांगल्यापैकीं आहे. हा बाहेरील देशांशीं जितका आपला व्यापार वाढेल तितक्या अंशान

विलायतेची खंडणी जाऊन, तसेंच आपल्या देशांत दरसाल दागिन्याच्या व चलनीच्या कामीं सोनें रुपें जेवढें झिजतें ती तूट पुरून, कांहीं शिल्लक नफ़ा ठेवण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं येईल. आपण दोन गोष्टींनीं लंगडे आहोंत. राज्य सत्तेच्या संबंधानें अदमासें दहा कोट रुपयांची रक्कम आपणांस खंडणी दाखल भरावी लागते. त्या ऐवजीं थोरांच्या आश्रयाखालीं आपण राहतों, तथापि केवळ व्यवहाररीत्या आपणांला नफा होत नाहीं. ही दहा कोटीची रक्कम भरून, शिवाय दरसाल चलन व दागिन्याचें कामीं सोन्यारुप्याची झीज व खप होतो ती रक्कम भरून आली पाहिजे. ह्या दोन अडचणी सांभाळून जो नफा शिल्लक राहील त्यांतून आपला संचय होऊन त्या संचयाचें साह्यानें देशांत उद्योग वगैरे वाढणार आहे. विलायतेस जी खंडणी द्यावी लागते, त्यापैकीं अंशतः आपल्याला जो मोबदला मिळतो त्याबद्दल विवेचन पूर्वींच केलें आहे. चलन व दागिन्याचें कामीं जें सोनेंरुपें आपण गुंतवून टाकतों त्याचें मान जेवढें कमी होऊन उद्योगाचें कामीं त्या संचयाची योजना होईल तितकें आपणांस हितावह होणार आहे. देशांत येणाऱ्या व देशांतून जाणाऱ्या जिनसांच्या व्यापारांचा क्रम मागील वीस वर्षांत कसा वाढला आहे, व त्याबद्दल जें प्रथम दर्शन होतें तें किती अंशीं सत्य आहे, तसेंच ह्या दोन्ही व्यापारांचें वास्तविक स्वरूप कशा प्रकारचें आहे, इत्यादि गोष्टींचा खुलासा थोडाबहुत वर झाला आहे.

आतां ज्या प्रसंगाच्या स्वाधीन हल्लीं आपला देश झाला आहे त्या संबंधानें देशावर बरे वाईट परिणाम होतात, त्यांपैकीं बरे परिणाम व्हावेत व वाईट परिणाम टळावेत, ह्याबद्दल ह्या देशच्या लोकांच्या हातीं तजविजी कोणच्या आहेत, व कोणच्या नाहींत, अशाविषयीं विचार करून हा विषय पुरा करूं.

साधारणतः सर्व हिंदुस्थान देशाच्या व्यापाराची स्थिति व त्याचा वृद्धीचा क्रम कसा झाला आहे, त्याबद्दल पूर्वी सर्व तपशिलवार विवेचन

केलें आहे, त्यावरून या देशाचें पुढील भवितव्य काय आहे, व तें इष्ट किंवा अनिष्ट आहे व इष्ट सिद्ध होऊन अनिष्ट टळेल अशा रीतीच्या तजविजी दुःसाध्य किती आहेत, व प्रयत्नानें साध्य किती आहेत, याबद्दल आतां विचार करणें आहे. एकंदरींत मागील वीस वर्षांच्या हकीकतीवरून खालील गोष्टींविषयीं सिद्धान्त कायम ठरतात. म्हणजे प्रथमतः या देशांतून बाहेर जाणाऱ्या मालाचा व देशांत बाहेरून येणाऱ्या मालाचा व्यापार मागील वीस वर्षांत आंकड्यांच्या मानावरून सुमारें तिप्पट वाढला आहे असें दिसतें. दुसरें, बाहेर जाणाऱ्या मालापैकीं शेतीच्या उद्योगानें उत्पन्न झालेले सर्व प्रकारचे जिन्नस, चहा, तांदूळ, अफू, काफी, कापूस, लोकर, नीळ, इत्यादिकांच्या स्थितींत बाहेर देशीं जाण्याचें मान फार वाढलें आहे. तिसरें, देशांत उत्पन्न झालेले जिन्नस येथेंच कमावून तयार होऊन पूर्वी बाहेर देशीं जात होते, म्हणजे रेशीम व कापसाचें सर्व तऱ्हेचें कापड, कलाबतु, शाली, साखर वगैरे, या जिनसांच्या व्यापाराचा अलीकडे बहुतेक ऱ्हास झाला आहे. चवथें, जितक्या मानानें केवळ आंकड्यांच्या तपशिलावरून आपणांस व्यापार वाढला असें दिसतें, तितक्या मानानें खरोखर व्यापार वाढला नाहीं. हिंदुस्थानासंबंधीं विलायतेस जो खर्च होतो त्याचे फेडीस्तव, तसेंच येथील संचय अन्य रीतीनें विलायतेस जातो त्याचें फेडीस्तव, व एकंदरींत सरासरी वसुलाची बेरीज मागील वर्षांत सुमारें दुप्पट झाली आहे त्या वसुलाचे नडीस्तव, पुष्कळ माल विलायतेस व अन्य देशीं धाडला जातो. त्या मालाचा व्यवहाररीतीनें योग्य मोबदला आपणांस मिळत नाहीं. तितक्या मानानें आपला व्यापार वाढला असें म्हणतां येत नाहीं. पांचवें, परस्थ ब्रिटिश लोकांचा अंमल या देशावर असल्यामुळें आपला व विलायतेचा बरोबरीच्या नात्यानें सरळ व्यापार होत नाहीं. एकंदरींत पृथ्वींतील सधन देशांतील व्यापाराचें मुख्य लक्षण हें आहे कीं, बाहेरून येणारा माल बाहेर जाणाऱ्या मालापेक्षां जास्ती किंमतीचा असतो. त्या उलट या देशाच्या व्यवहाराचें

साधारण स्वरूप आहे. प्रत्यक्ष विलायतेस आपण माल धाडतों त्यापेक्षां त्या देशांतून माल व सोनेंरुपें धरून जास्ती माल देशांत येतो असें दिसतें, परंतु राज्यसंबंधीं जी खंडणी आपणांस विलायतेस धाडणें जरूर पडतें, त्या खंडणीची रक्कम भरण्याकरितां विलायतेशिवाय इतर देशांशीं जो आपला व्यापार होतो तो व्यापार विलायतेंतील व्यापाऱ्यांच्या हातीं असल्यामुळें अन्य देशांकडून आपल्यास प्राप्त होणारा सर्व नफा विलायतेंतील लोकांच्या पदरांत आपणांस घालावा लागतो. सदर खंडणीच्या रकमेच्या मानानें आपला दरसालचा संचय कमी होतो. याशिवाय सहावें, या देशांत सोन्यारुप्याच्या खाणी नाहींत, व लोकांत सोन्यारुप्याचे दागिने करण्याची चाल विशेष आहे व चलनही सर्व रुप्याच्या नाण्याची आहे. या दोन्ही संबंधानें विलायत आदिकरून अन्य देशांहून जो माल आपण आणतों त्यांत दरसाल आठपासून दहा कोटी रुपयांचें सोनेंरुपें आणल्याशिवाय आपल्या लोकांचा निर्वाह होत नाहीं. असें दरसाल दागिन्यांचें कामीं व चलनीचें कामीं जें सोनेंरुपें गुंतलें जातें, तें एकदां रूपांतर पावल्यावर व्यवहारांत विशेष उपयोगी न पडतां बहुतेक कांहीं काळानें झिजून जातें; त्याच मानानें देशांतील संचयाचा निष्कारणा व्यय झाल्याप्रमाणें होऊन उद्योगास कमतरता येते. सातवें, बाहेरून येणाऱ्या मालामध्यें बहुशः सर्व मोठमोठे जिन्नस याच देशांत पूर्वी विशेषेंकरून तयार होत होते, व हल्लींहि अंशतः तयार होत आहेत, त्या उद्योगास कमतरता आणून सदरचे जिन्नस बाहेरून म्हणजे मुख्यत्वेंकरून विलायतेहून येतात, यामुळें देशांत निवळ शेतकीशिवाय इतर सर्व धंदा मंद पडला आहे. आठवें, बाहेरून जो माल येतो त्याच्या संबंधानें देशाच्या सामर्थ्याचें मान केवळ आंकड्यावरून जितकें वाढलें आहे असें वाटतें, तितकें खरोखरी वाढलें नाहीं; कारण त्यापैकीं पुष्कळ जिन्नस या देशांत नांवाला मात्र येतात, परंतु त्यांचा खप सरकारचें व रेल्वेचें व लष्करी कारखान्याचें कामीं व परस्थ वस्तींतच बहुशः होतो. यामुळें त्या प्रमाणानें आपल्या देशांतील लोकांचें सामर्थ्य वाढलें असें होत नाहीं. नववें, विला-

यतेशिवाय इतर देशांशीं आपला व्यापार बऱ्याच मानानें वाढत चालला आहे. सुएजमधून आगबोटी थेट येऊं जाऊं लागल्यापासून युरोपांतील इतर देशांशीं आपला व्यापार नवीनच सुरूं झाला आहे, हें चांगल्यापैकीं लक्षण आहे.

एकंदरींत आपल्या देशाच्या व्यापाराची स्थिति पहातां विलायतेशीं व अन्य देशांशीं आपला व्यवहार हल्लीं बऱ्याच मानानें वाढला आहे, यामुळें साधारणतः आनंद मानण्यासारखें कारण आहे. तथापि त्यांतील बारीक विचार पाहिला म्हणजे पुष्कळ अंशीं खेद व चिंता वाटण्याजोगा प्रकार सदर व्यवहाराचा दिसून येतो. बाहेर देशांशीं आपली देवघेव वाढावी हें सर्वथा इष्ट आहे. देवघेव जितकी वाढेल तितकें आपलें ऐश्वर्य व सामर्थ्य वाढेल. परंतु, यांत अनिष्ट प्रकार हा आहे कीं, दिवसेंदिवस आपल्या लोकांस शेतकीच्या उद्योगाशिवाय दुसरा उद्योग नाहींसा होत चालला आहे. आपण पिकवावें, विलायतेंतील कारागिरांनीं तें कमवावें, तें आपण वापरावें, ही स्थिति आपणांस प्राप्त होत आहे. आपल्या सर्व लोकांनीं शेती करावी व इतर कामधंदे व्यापार सोडून द्यावे, ही स्थिति इष्ट आहे किंवा अनिष्ट आहे, याचा विचार सर्वांनीं करण्यासारखी ही गोष्ट आहे. प्रथम तर हें सर्वांस ठाऊकच आहे कीं, शेतकीचा उद्योग फार पराधीनपणाचा आहे. स्थल, काल, ऋतुमान इत्यादिकांवर शेतकीचा उद्योग अवलंबून आहे. इतर कामधंद्याचे लोकांस सर्व स्थळें, सर्व काल, सर्व ऋतु हीं बहुतांशीं सारखींच आहेत. हा पराधीनतेचा प्रकार इतका बळवत्तर आहे कीं, वर्षभर काबाडकष्ट केले, आणि भलतेच वेळीं पाऊस पडला, किंवा वारा सुटला, तर सर्व वर्षाचे श्रम व्यर्थ होऊन सारी प्रजा दुष्काळाचें मुखांत सांपडते. आपल्या देशांत सर्व देशांतील उत्कृष्ट जिन्नस पिकतात हें जरी खरें आहे, तरी एकंदरींत पुष्कळ भागांत पाण्याची फार कमतरता असल्यामुळें शेतकीच्या उद्योगास बरकत कमी आहे. कष्ट करणाऱ्या कुटुंबाचें पोट देखील वेळेस भरण्याची मारामार पडते. अमेरिकेसारख्या नव्या

वस्तीचा व अतोनात समृद्धीचा मुलख या देशांत फार थोडा आहे. सदरील कारणाकरितां एक शेतकीचाच उद्योग आपल्या सर्व प्रजेनें करावा, इतर गोष्टींचा नाद सोडून द्यावा, हा उपदेश आपल्यावर हल्लीं जे सत्ता चालवितात त्यांच्या मुखानें आपण ऐकतों हें नीटच आहे, परंतु तेच शब्द पोपटाप्रमाणें आपण कांहीं न विचार करितां पुष्कळ प्रसंगीं बडबडतों हें मात्र आपणांस शोभत नाहीं. शेतीच्या उद्योगांत सदरील पराधीनतेचा व मर्यादित फलद्रुपतेचा जो अडचणीचा प्रकार सांगितला, त्याचप्रमाणें तिसरी अडचण सरकारी अंमलाची आहे. ही अडचण शेतीच्या उद्योगास जशी बाधते तशी इतर धंदेवाले लोकांस बाधत नाहीं. मुलखांतील सर्व जमीन आपल्या मालकीची, त्यावर आपल्या स्वामित्वाचा भाग, सोय अगर जरूर पडेल त्याप्रमाणें मागण्याचा आपला अधिकार आहे, असें सरकार म्हणतें, व त्याप्रमाणें अंमलहि होत आहे, तेव्हां या उद्योगांत आपल्या लोकांची किफायत होईल हा संभव विशेष दिसत नाहीं. इतर धंद्याच्या उद्योगास काल स्थलाची अडचण विशेष नाहीं. मनुष्याच्या स्वाधीन सर्व व्यवसाय असतो, यामुळें त्यांत श्रमव्यवस्था विशेष करितां येते, व थोड्या मनुष्यांच्या उद्योगानें त्यांचे पोटास पुरून पुष्कळ माणसांच्या निर्वाहाची तजवीज होईल, अशा रीतीनें सार्थक होतें, त्याप्रमाणें शेतीच्या कामाची व्यवस्था नाहीं. विलायत देश विस्ताराच्या मानानें यःकश्चित् आपल्या मुलखांतील एखाद्या प्रांतायेवढा देखील नाहीं, त्या देशांत शेतकीच्या उद्योगाकडे प्रजा फार कमी गुंतली आहे, इतर काम धंद्यांतच बहुतेक लोक खपतात, यामुळें त्या लहान मुलखांत चार कोटी प्रजा सुखानें नांदते. केवळ शेतकीचाच उद्योग त्यांनीं केला तर त्यांच्या निम्मे प्रजेचा निर्वाह चवथाई सुखाच मानानेंही झाला नसता हा अनुभव आपणां सर्वत्रांस आहे. खेरीज कोणत्याहि देशांत सुपीक जमीन विस्ताराच्या, व दूरत्वाच्या, व हवा-पाण्याच्या, समृद्धीच्या, व अंगच्या फलद्रूपतेच्या संबंधानें फार थोडी असते. ती जमीन सर्व आटपून गेल्यावर कनिष्ठ-

प्रतीची जमीन नांगरली जाते, व त्यांत उत्पन्नाहि होतें, परंतु असा नियम आहे कीं, श्रमाच्या प्रमाणानें उत्पन्न होत नाहीं, कमी होतें. एकंदर दुप्पट श्रम केला, अथवा दुप्पट जमीन नांगरली, तर पीक दुप्पट होत नाहीं, दीडपट होतें असा प्रकार इतर धंद्यांच्या कामांत नाहीं. दुप्पट श्रम केला, दुप्पट उद्योग वाढविला, तर दुपटीहून ज्यास्त प्राप्ति होते, असा सर्वसाधारण नियम आहे.

सदरील विचार ज्यास पूर्णपणें कळून येतील त्यास व्यवहाराच्या संबंधानें या देशांत मुख्य शेतकीचा धंदा सर्व लोकांनीं केल्यानें आपल्या लोकांचें इष्ट सिद्ध होत नाहीं, अनिष्ट घडून येतें, हा प्रकार उघड रीतीनें समजेल. याशिवाय हल्लींच्या स्थितीचा आपण विचार केला तरी देखील ह्याचप्रमाणें आपली मनोदेवता साक्ष देईल. साधारण शेतकरी लोक घेतले, व इतर कामधंद्याचे लोक आपल्या देशांत हल्लीं आहेत, तेच जरी घेतले, तथापि वर जो दोन्ही धंद्यांमधील थोडासा भेदाचा प्रकार वर्णिला आहे, त्या योगानें उभयतांच्या स्थितींत नेहमीं अंतर किती राहतें हें सर्वांचें ध्यानांत येईल. साधारणपणें कामधंदा करणारी प्रजा शेतांत कष्ट करणाऱ्या प्रजेपेक्षां सधन, शहाणी, समंजस, एकजुटीनें वागणारी, अशी असते. शहरांतील वस्तींत व खेडे-गांवच्या वस्तींत जो भेद दिसून येतो तो भेद अंशतः याच संबंधानें उत्पन्न होतो असें ह्मटलें असतां चालेल. तांबट, सुतार, लोहार, रंगारी, कासार, गवंडी, कुंभार, सर्व जातीचा क्रय विक्रय करणारे वाणी--उदमी लोक, या लोकांमध्यें शेती कुणबी लोकांपेक्षां स्वतंत्रता, सधनता, शहाणपणा, जास्ती नाहीं, असें कोण म्हणेल. ही सर्व प्रजा नष्ट झाली, व या व्यवहाराच्या संबंधानें शहरें उद्ध्वस्त पडून आपण सर्व शेती करणारें बनला तर एकंदरींत सर्व देशाच्या सुखांत व सौर्यांत व सौभाग्यांत किती कमतरता पडेल याचा विचार ज्याचा त्यानींच करावा.

आपल्या हिंदुस्थान देशांतील उद्योगाची स्थिति बाहेर देशांशीं

आपला व्यापार होतो त्या संबंधानें दिवसेंदिवस कोणच्या तऱ्हेची होत चालली आहे, म्हणजे आपण ओबडधोबड शेतीचा उद्योग करून कच्चा माल पिकवावा, तो माल कमावण्याचा दुसरा कोणताही धंदा आपण करूं नये, त्या मालाची पुढील सर्व व्यवस्था विलायतेंतील लोकांनीं पहावी, व त्यांचे उद्योगाचें फळ मात्र आपण भोगावें, अशी स्थिति आपणांस प्राप्त होत आहे, याबद्दल पूर्वीं विवेचन केलें. अशी देशांतील उद्योगाची स्थिति होणें हें इष्ट नाहीं, कारण शेतीचा धंदा नैसर्गिक रीतीनेंच पराधीन, परिमित फळ देणारा, सरकारच्या संबंधानें फार त्रास होणारा, अशा तऱ्हेचा हा धंदा आहे. याशिवाय साधारणतः समंजसपणांत व सुखसंपत्तींतही इतर कामधंदे करणारे लोकांपेक्षां शेतकरी लोक हे सर्वदा अडाणी व दुर्बळ असतात असा अनुभव आहे. शेतकरी लोकांची मजुरी इतर धंदेवाले लोकांच्या मजुरीपेक्षां कमी असते. शेतीच्या धंद्यानें पोट भरणारांचें सामर्थ्य पूर्वीं विस्तारानें लिहिल्याप्रमाणें परिमितीचें असतें. त्याच प्रमाणानें इतर धंदे करणारे लोकांचें सामर्थ्य अपरिमित आहे असें म्हटलें असतां चालेल. ज्या देशांत केवळ शेतकरी लोकांपेक्षां, म्हणजे खेड्यांत राहाणारे अथवा खेडूत लोकांपेक्षां, नगरवासी लोकांची म्हणजे इतर कामधंदे करणारे उदमी व कारागीर लोकांची वस्ती जास्त असते, तोच देश सधन व सुखी असा साधारण सिद्धांत आहे. राजकारणी विचाराच्या संबंधानेंही असेंच अंतर दिसून येतें. शेतकरी लोकांवर जुलूम झाला असतां त्यांची एकजूट होत नाहीं व त्या जुलमाचा बोभाटा होत नाहीं. इतर कामधंदे करणारे लोक बहुधा मोठ्या समुदायानें राहतात यामुळें, व त्यांस फुरसतही चांगली असते, व समजही चांगली असते, यामुळें, जुलुमाचा जोर फार वेळ चालत नाहीं, निदान बोभाटा तरी विशेष होतो. परस्थ लोकांच्या अमलाखालीं जो देश आहे त्याच्या संबंधानें हा विचार विशेष महत्त्वाचा आहे. जमिनीचा सारा दुप्पट वाढला, त्याची दाद कोठें लागत नाहीं. परंतु इन्कमटॅक्स वगैरे उदमी लोकांवरील कर फार कमी दराचा असला तरी सर्व देशभर गवगवा होतो.

हें प्रत्यक्ष उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहे. वरील सर्व विचार ध्यानांत आणले असतां परदेशाशीं जो आपला व्यापार होतो तत्संबंधानें जे बरें वाईट परिणाम देशांतील लोकांवर घडत आहेत, त्या परिणामांपैकीं सर्वांस अनिष्टकारक असा हा प्रकार आहे हें कळून येईल. साधारणतः आपण आगगाडींतून बसून जातों, तारायंत्रांतून आपले निरोप धाडतों, विलायतेंत यंत्रसामर्थ्यानें जे सर्व सोयीचे व षोकाचे पदार्थ तयार होतात ते आपण आवडीनें भोगतों, या सुखांत आपण मग्न असतों, हा सर्व उत्साह आपण करितों, व आपले डोळे दिपतात, त्यावेळीं उत्साहतेजाची पडछाया आपणांस दिसत नाहीं, ह्मणून आपणांस यांतच सुख वाटतें. परंतु आपल्या-सारख्या समृद्ध देशांतील लोकांची अशी स्थिति व्हावी कीं, त्यांच्या निर्वाहाचे, सोयीचे, व शोकाचे, सर्व पदार्थ त्यांस तयार करतां येऊं नयेत, केवळ पदार्थ आयते तयार केलेले भोगण्याची मात्र अकल आपणांस असावी ही मोठी दुःखाची गोष्ट आहे असे कोण ह्मणणार नाहीं, यामध्यें देशाचें सामर्थ्य वाढलें असें होत नाहीं, उलट दिवसेंदिवस आपण सर्व पुरुष बायका झालों आहोंत अथवा लहान मुलें झालों आहोंत, त्या अवस्थेंत जसें दुसऱ्यावर अवलंबून राहणें जरूर पडतें, तद्वतच सर्व देशांतील प्रजेची-स्थिति होत आहे, हें इष्ट आहे असें कोण ह्मणेल. आपल्यास असें वाटतें कीं, पहिल्यापेक्षां आपल्या देशाचा बंदोबस्त चांगला आहे. ह्या घमेंडींत आपण निःशस्त्र झालों आहों ही गोष्ट विसरतों. हाच अनुभव सर्वत्र येत आहे. ह्मणजे राज्यसत्तेच्या संबंधानें आपल्या स्वतःचा बचाव करण्यास जसे आपण निर्बळ झालों आहों, त्याप्रमाणेंच व्यापार व व्यवहार यांच्या संबंधानें आपण आपलें पोषण व आच्छादन करण्यासही असमर्थ झालों आहों. ज्याप्रमाणें राज्यसत्तेच्या संबंधानें आपण परद्वीपस्थ लोकांचे दास झालों आहोंत, त्याचप्रमाणें व्यवहाराच्या संबंधानेंही आपण त्यांच्या दासांचे दास बनलों आहोंत. या व्यवहारसंबंधानें ज्या वेळेस विचार होतो त्यावेळीं अशा प्रकारची स्थिति आपली झाली आहे हें सर्व कबूल करतात.

परंतु ह्याबद्दल आपणांवर कोणी जुलूम केला नाहीं, आपण सुखानें या पाशांत सांपडलों तेव्हां यांत कुरकूर करण्यास जागा नसून विशेष शहाणपणहि नाहीं, असें कित्येक ज्ञाते व सुखेच्छु पुरुष ह्मणतात. अमेरिकेंत ज्यावेळीं गुलामांची वस्ती होती, त्या वेळीं त्या देशांतील कित्येक ज्ञाते व सुखेच्छु पुरुष असेंच म्हणत कीं, गुलामास आपल्या पोटापाण्याची कांहीं काळजी करावी लागत नाहीं, तोच गुलाम स्वतंत्र झाल्यास त्यास ही काळजी करावी लागेल, गुलामाची सर्व सोय त्याचा धनी पाहतो, यांत गुलामांचें काय वाईट होतें, शिवाय अशा स्थितींस गुलाम लोक फार खुष आहेत, इत्यादि अनेक प्रकारचें प्रतिपादन होत असे त्याच तऱ्हेचें हें वरील प्रतिपादन कांहीं अंशीं आहे. ज्या गोष्टी खरोखरी अनिष्ट असून त्यांचें प्रथम दर्शन उलट दिसतें, व लोकांस मोह पडतो, त्यांविषयींच विशेष जपलें पाहिजे. आपले लोक बिनबोभाट ह्या भवितव्यास अनुसरत आहेत ह्मणूनच त्याविषयीं आरडाओरड केली पाहिजे. एकंदरींत दिवसेंदिवस व्यवहारसंबंधानें पराधीनपणाची व निःसत्त्वपणाची दशा देशास प्राप्त होत आहे ही गोष्ट अनिष्ट आहे, इष्टफलदात्री नाहीं, ही गोष्ट सर्वांनीं गृहीत केली पाहिजे.

यांत दुसरा विचार असा आहे कीं, हा देश अगदी रानटी स्थितींत असता तर असली पराधीनताहि इष्ट झाली असती, परंतु ज्या पदार्थांच्या संबंधानें आपण आज इतके विलायतेवर अवलंबून राहत आहोंत तेच पदार्थ उलटे आपल्या देशांतून आज ३०–४० वर्षांपूर्वीं विलायतेस जात होते, हा विचार मनांत आणला ह्मणजे आपण हल्लींची स्थिति बरी आहे असें मानून समाधान करून घेतों यांत आपल्या मूर्खपणाची पराकाष्ठा होते. ह्याबद्दल मुंबई बंदराच्या व्यापाराची तपशिलवार हकीकत मिळाली नाहीं, परंतु कलकत्त्याबद्दल हकीकत तिकडील एका एतद्देशीय विद्वान् गृहस्थानें छापली आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं, १८१३–१४ सालीं विलायतेहून ९०००० रुपयांचें कापड इकडे

आलें, तेंच कापड १८७१–७२ सालीं म्हणजे साठ वर्षांत ९॥ कोट रुपयांचें आलें, म्हणजे साठ वर्षांत शंभर पटीनें फरक पडला. खालील कोष्टकावरून हा प्रकार स्पष्ट होईल.

| | कापड हिंदुस्थानांतून अन्य देशीं गेलें रु. | अन्य देशांहून हिंदुस्थानांत आलें रु. |
|---|---|---|
| १८१३–१४ | ५२ लाख | ९२००० |
| | ५२,११,४५८ | १२,०७० |
| १८१४–१५ | ८५ लाख | ४५००० |
| | ८४,१०,७६० | ४५,००० |
| १८१५–१६ | १३१ १/२ लाख | २ २/३ लाख |
| | १३१,५१,४२७ | २,६३,८०० |
| १८१६–१७ | १६६ लाख | ३ १/६ लाख |
| | १,६५,१४,३८० | ३,१७,६०२ |
| १८१७–१८ | १३२ ३/४ लाख | ११ १/४ लाख |
| | १३२,७२,८५४ | ११,२२,३७२ |
| १८१८–१९ | ११५ १/४ लाख | २६ १/२ लाख |
| | ११५,२७,३८५ | २६,५८,१४० |
| १८१९–२० | ९० १/३ लाख | १५ ४/५ लाख |
| | ९०,३०,७६६ | १५,८२,३५३ |
| १८२०–२१ | ८५ ४/५ लाख | २५ १/२ लाख |
| | ८५,४०,७६३ | २५,५१,६४२ |
| १८२१–२२ | ७६ २/३ लाख | ४६ ३ लाख |
| | ७६,६४,८२० | ४६,७८,६५० |
| १८२२–२३ | :८० लाख | ६५ ४/५ लाख |
| | ८०,०१,४३२ | ६५,८२,३५१ |

| | कापड हिंदुस्थानांतून अन्य देशीं गेलें. रु. | अन्य देशांहून हिंदुस्थानांत आलें. रु. |
|---|---|---|
| १८२३–२४ | ५८ ३/४ लाख | ३५ ५/६ लाख |
| | ५८,७०,५२३ | ३७,२०,५४० |
| १८२४–२५ | ६० १/६ लाख | ५३ लाख |
| | ६०,१७,५५१ | ५२,१६,८१६ |
| १८२५–२६ | ५८ १/३ लाख | ४१ १/४ लाख |
| | ५८,३४,६३८ | ४१,२४,१५१ |
| १८२६–२७ | ३९ १/२ लाख | ४३ १/२ लाख |
| | ३९,४८,४४२ | ४३,४६,०५४ |
| १८२७–२८ | २६ ३/४ लाख | ५२ १ लाख |
| | २८,७६,३१३ | ५२,५२,७१३ |
| १८२८–२९ | २२ १/४ लाख | ८० लाख |
| | २२,२३,१६३ | ७१,१६,३८३ |
| १८२९–३० | १३ १/४ लाख | ५२ १/४ लाख |
| | १३,२६,४२३ | ५२,१६,२२६ |
| १८३०–३१ | ८ १/२ लाख | ६० १/८ लाख |
| | ८,५७,२८० | ६०,१२,७२१ |
| १८३१–३२ | ८ १/२ लाख | ४५ १/२ लाख |
| | ८,४१,८८७ | ४५,६४,०४७ |
| १८३२–३३ | ८ १/४ लाख | ४२ १/२ लाख |
| | ८,२२,८११ | ४२,६४,७०७ |

*परिशिष्ट टीप ८ पहा.*

एकंदर वीस वर्षांत किती फरक पडला हें वरील आंकड्यांवरून कळेल. १८३३–३४ चे सुमारास वाफेच्या सामर्थ्यानें मोठीं यंत्रें चालविण्याचे प्रथम कारखाने विलायतेस निघूं लागले, तेव्हांपासून सर्वच चक्र फिरलें. त्यांच्या यंत्रसामर्थ्यापुढें आपल्या हस्तकौशल्यानें झालेलें कापड टिकाव धरील असें दिसत नाहीं. तथापि जेथें जेथें धर्माच्या संबंधानें किंवा प्रचाराच्या संबंधानें कांहीं विशेष निग्रह किंवा प्रत्यवाय करून ठेवला

आहे, तितक्या पुरतें अजून या देशांत कापड तयार होत आहे. साधारणतः जेथें दोन पैशांत काम होणार आहे, तेथें चार पैसे द्यावे अशी बुद्धि कोणासही व्यवहारांत होत नाहीं, हें म्हणणें खरें आहे, तथापि हें जितकें खरें आहे, तितकेंच मानानें उंच ठेवलेल्या पदार्थांस हात लावणें असेल तर पायाखालीं कांहीं घेऊन त्यावर उभें राहिलें पाहिजे हेंही म्हणणें खोटें नाहीं. मुळींच सवड दिली नाहीं तर लोकांच्या हातून उद्योग तरी कसा व्हावा. विलायतेबरोबर अखेर धांव मारणें असेल तर यंत्रसामर्थ्यानेंच मारली पाहिजे, हें खरें आहे. तथापि कांहीं काळपर्यंत ज्याप्रमाणें हल्लीं आवड, विशेष गुणाच्या संबंधानें नाहीं, परंतु केवळ लौकिक अनुकरणानें विलायती मालावर जशी बसली आहे, तशी गांवठी मालावर बसल्यास कांहीं उद्योग करण्यास अवकाश मिळेल. या संबंधानें अन्य देशाच्या लोकांचें वर्तन पाहूं जातां ते आपल्याप्रमाणें अर्थशास्त्राचे सिद्धांत घोकून कपाळास हात लावीत नाहींत. जो उद्योग आपल्या देशांत व्हावा, ज्या उद्योगाच्या संबंधानें देश स्वतंत्र असावा असें त्यांस वाटतें, त्या उद्योगास उत्तेजन येण्याकरितां त्या तऱ्हेचा माल बाहेर देशांतून येतो त्यावर जबर जकात ठेवून तसा माल आपल्या मुलखांत तयार करितात. त्या जकातीच्या संबंधानें प्रथम थोडी बहुत जास्त किंमत द्यावी लागते, तथापि ते लोक त्या तोटयाकडे विशेष पहात नाहींत. अमेरिकेची स्थिति याप्रमाणें आहे. विलायतेहून कापड तिकडे जातें, त्यावर विशेष जकात त्यांनीं ठेवली यामुळे अमेरिकेंत कापड तयार करण्याचा प्रथम उद्योग वीस वर्षांत सुरूं झाला. हल्लीं निम्मा अधिक कापूस अमेरिकेंतील कारखान्यांत खपून कापड तयार होतें. फ्रान्स, बेलजम, वगैरे देशांतहि याचप्रमाणें राजकारणी पुरुष व्यवस्था करितात. विलसन साहेबानीं १८६० सालीं विलायतेहून येणाऱ्या कापडावर शेंकडा पांच टक्के जकात होती ती दहा टक्के केली, तेवढ्या अवकाशांत मुंबईंत सुताचे व कापडाचे कारखाने पुष्कळ निघाले, त्याची व्यवस्था सर्व प्रकारें नीट नाहीं तथापि ते कारखाने आज-

पर्यंत जीव धरून आहेत येवढेंच नाहीं, परंतु जकात पुनः पूर्ववत् झाली तरी कारखान्यांची संख्या वाढत चालली आहे. हल्लीं या कारखान्यांचें कामीं तीन कोट रुपये आपल्या लोकांचें भांडवल गुंतलें आहें, व त्यावर २०००० मजूर लोकांचा निर्वाह होत आहे. सब वेळ स्वहिताकरितां इंग्लिश लोक जो आपणांस या संबंधानें बोध करितात कीं, आपण कारखान्यांच्या व यंत्राचया नादीं लागूं नये, कच्चा माल पिकवून विलायतेस धाडावा, हाच आपला कृतार्थ व्यवहार संबंधानें आहे, तो बोध खरा असें मानणें हें आपल्या स्वामिभक्तीस मोठें भूषण आहे, परंतु एकंदरींत त्यांत शहाणपणा नाहीं.

आपल्यास जीं शस्त्रें व दारू लढाईच्या कामीं उपयोगीं पडतात तीं हवीं असलीं तर अन्य देशांत तीं आपल्यापेक्षां स्वस्त होतात, येवढ्याच कारणानें आपल्या देशांत तीं स्वतंत्र उत्पन्न करण्याचा उद्योग करूं नये असें कोण ह्मणेल? ज्याप्रमाणें स्वतःच्या बचावाविषयींच्या तजविजीबद्दल केवळ पैशाच्या नुकसानीकडे पाहाणें बरोबर नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या अन्नाच्छादनाचा विचार आहे. याविषयीं तरी निदान प्रत्येक मोठा देश स्वतःसिद्ध असावा हें जरूर आहे, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हा विचार केवळ अर्थशास्त्राचा नाहीं. एकंदर राजकारण, व देश व्यवस्था, व सर्व राष्ट्ररूपी कुटुंबाचा प्रपंच या तिन्ही व्यवस्था पाहिल्या असतां यांतील गूढार्थ ध्यानांत येईल.

समाप्त

# परिशिष्ट

## कोष्टकांवरील टीपा

टीप १ : रानडे यांनी दिलेले आंकडे Statistical Abstract relating to British India (1840–1870) या पुस्तकांतून घेतलेले आहेत; तेथूनच आम्ही मूळचे संपूर्ण आंकडे घेऊन कोष्टकामध्ये तिरक्या वळणाच्या आंकड्यांत दिले आहेत.

रानडे यांनी दिलेल्या व मूळ आंकड्यांमध्ये फरक मुख्यत: १८६३ साली देशांत आलेलें आणि १८६८ व १८७० साली देशांतून बाहेर गेलेलें रुपें, त्याचप्रमाणें १८६९ व १८७० या दोन वर्षांत देशांतून बाहेर गेलेलें सोनें यांत दिसतो. पैकी १८७० सालच्या बाहेर गेलेल्या रुप्याच्या आंकड्यांतील फरक हा ९ ऐवजी ८ अशा मुद्रणदोषामुळे असण्याचा संभव आहे, परंतु इतर चार ठिकाणचा फरक मूळ आंकडे उतरवून घेतांना झालेल्या चुकांमुळे झालेला असावा.

या देशांतून बाहेर गेलेलें सोनें व रुपें यांच्या रानडे यांनी दिलेल्या आंकड्यांच्या बेरजाहि चुकल्या असून, त्या १०९ लाख व १२१५ लाख न येतां १८९ लाख व १२३० लाख अशा अनुक्रमें येतात. मूळ आंकड्यांच्या बेरजा तिरक्या वळणाच्या आंकड्यांत कोष्टकांत दाखविल्या आहेतच.

टीप २ : रानडे यांनी दिलेले आंकडे Statistical Abstract relating to British India (1840–1870) या पुस्तकांतून घेतलेले आहेत; तेथूनच आम्ही मूळचे संपूर्ण आंकडे घेऊन कोष्टकामध्ये तिरक्या वळणाच्या आंकड्यांत दिले आहेत.

रानडे यांनी दिलेल्या व मूळ आंकड्यांमध्ये फरक मुख्यत्वाने १८६६ सालच्या रुपें व तांबें यांत व त्यामुळेच त्या वर्षीच्या एकूण आंकड्यांत दिसतो. हा फरक मूळ पुस्तकांतील आंकडे उतरवून घेतांना झालेल्या चुकांमुळे झालेला असावा.

रानडे यांनी दिलेल्या आंकड्यांच्या सर्व बेरजाहि चुकल्या असून, त्या ४० लाख, ७५ कोटी, १५८ लाख व ७७ कोटी अशा न येतां अनुक्रमें ५० लाख, ६४ कोटी, १४५ लाख, व ६७ कोटी अशा येतात. मूळ आंकड्यांच्या बेरजा तिरक्या वळणाच्या आंकड्यांत कोष्टकांत दाखविल्या आहेतच.

टीप ३ : रानडे यांनी दिलेल्या व मूळच्या आंकड्यांमध्ये फरक १८६३–६४ व १८६७–६८ या दोन वर्षींच्या हिंदुस्थानांतल्या कापूस गठ्ठयांच्या आंकड्यांत दिसतात. हे दोन्ही फरक मूळ आंकडे उतरवून घेतांना झालेल्या चुकीमुळे अगर मुद्रणदोषामुळे झालेले असूं शकतील.

टीप ४ : रानडे यांनी दिलेले आंकडे Statistical Abstract relating to British India (1840–1873) या पुस्तकांतून घेतलेले आहेत; तेथूनच आम्हीं मूळचे संपूर्ण आंकडे घेऊन कोष्टकामध्ये तिरक्या वळणाच्या आंकड्यांत दिले आहेत.

रानडे यांनी दिलेल्या व मूळ आंकड्यांत फरक फक्त १८५९–६४ मध्ये देशांतून बाहेर गेलेल्या मालाच्या आंकड्यांत दिसतो. तो मुद्रणदोषामुळे झाला असण्याचा संभव आहे.

टीप ५ : रानडे यांनी दिलेले आंकडे Statistical Abstract relating to British India (1840–1873) या पुस्तकांतून घेतलेले आहेत; तेथूनच आम्ही मूळचे संपूर्ण आंकडे घेऊन कोष्टकामध्ये तिरक्या वळणाच्या आंकड्यांत दिले आहेत.

१८३४–३५ सालीं बाहेरून सोनें व रुपें आलेल्या किंमतीचा मूळ आंकडा आम्हांस मिळाला नाहीं.

रानडे यांनी दिलेल्या व मूळ आंकड्यांत सहा ठिकाणी पुष्कळच फरक दिसतो. यापैकीं १८६५–६६ सालीं बाहेर गेलेला माल व १८७०–७१ सालीं सोनेंरुपें धरून एकंदर माल आला त्यांच्या किंमतींत दिसणारा फरक मुद्रण-दोषामुळे झाला असावा; आणि १८६६–६७ व १८६७–६८ या वर्षी सोनेंरुपें धरून एकंदर माल आला, १८६६–६७ सालीं बाहेर माल गेला व १८७०–७१ सालीं बाहेरून सोनेंरुपें आलें तें एकंदर यांच्या किंमतींत दिसणारा फरक मूळ आंकडे उतरवून घेतांना झालेल्या चुकांमुळे झालेला असण्याचा संभव आहे.

टीप ६ : रानडे यांनी दिलेले आंकडे Statistical Abstract relating to British India (1840–1873) या पुस्तकांतून घेतलेले आहेत; तेथूनच आम्ही मूळचे आंकडे घेऊन कोष्टकामध्ये तिरक्या वळणाच्या आंकड्यांत दिले आहेत.

रानडे यांनी दिलेल्या व मूळ आंकड्यांत नऊ ठिकाणीं बराच फरक दिसतो. यापैकीं १८५९–६० व १८६९–७० या वर्षीं विलायतेंतून माल आला, १८५९–६० व १८७०–७१ सालीं इतर देशांतून माल आला त्यांच्या किंमतींत दिसणारे फरक मुद्रणदोषामुळे झालेले असावे; आणि १८६८–६९, १८७१–७२ या वर्षीं विलायतेंतून व इतर देशांतून माल आला त्यांच्या आंकड्यांत व १८७०–७१ सालीं विलायतेंतून माल आला त्याच्या आंकड्यांत दिसणारे फरक मूळ आंकडे उतरवून घेतांना झालेल्या चुकांमुळे झाले असण्याचा संभव आहे.

टीप ७ : रानडे यांनी दिलेले आंकडे Statistical Abstract relating to British India ( 1840–1873 ) या पस्तकांतून घेतलेल आहेत; तेथूनच आम्ही मूळचे आंकडे घेऊन कोष्टकामध्ये तिरक्या वळणाच्या आंकड्यांत दिले आहेत.

रानडे यांनी दिलेल्या व मूळ आंकड्यांमध्ये दहा ठिकाणीं बराच फरक दिसतो. विलायतेहून माल आला त्याचे किंमतीचे १८५९–६० व १८६९–७० सालचे आंकडे; १८६७–६८ सालीं विलायसेत गेलेल्या मालाची किंमत, त्याचप्रमाणे अन्य देशांहून १८७०-७१ सालीं आलेल्या मालाची किंमत या आंकड्यांतील फरक मुद्रणदोषामुळे असावा असें वाटतें; आणि १८६८–६९, १८७०–७१, १८७१–७२ सालीं विलायतेहून माल आला त्याची किंमत, १८६५–६६ सालीं विलायतेस माल गेला त्याची किंमत व अन्य देशांहून १८६८–६९ व १८७१–७२ या वर्षीं आलेल्या मालाची किंमत येथे दिसणारे फरक मूळ आंकडे उतरवून घेतांना झालेल्या चुकांमुळे पडत असावेत असें वाटतें.

विलायतेस माल गेला त्याच्या रानडे यांनीं दिलेल्या आंकड्यांची बेरीज चुकली असून ती ३८० न येतां ३७० येते. हाहि मुद्रणदोषच असावा. मूळ आंकड्यांची बेरीज तिरक्या वळणाच्या आंकड्यांत कोष्टकांत दाखविली आहेच.

टीप ८ : रानडे यांनी दिलेल्या व मूळ आंकड्यांमध्ये फरक १८२३–२४ सालीं अन्य देशांहून हिंदुस्थानांत आलेल्या व १८२७–२८ सालीं हिंदुस्थानांतून अन्यदेशीं गेलेल्या कापडाच्या किंमतींत आहे. हा फरक मुद्रणदोषामुळे झालेला दिसतो.

# गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें ४

# मराठी प्रकाशनें

१. पुणें जिल्ह्यांतील फळांची पैदास व विक्री :
लेखक : ध. रा. गाडगीळ व वा. रा. गाडगीळ, १९३६
(आवृत्ति संपली आहे.)

२. महाराष्ट्रांतील मोटार वाहतूक :
लेखक : ध. रा. गाडगीळ व ल. वि. गोगटे, १९३६
(आवृत्ति संपली आहे.)

३. आर्थिक घडामोडी (१९३०-१९५०) :
लेखक : ध. रा. गाडगीळ व नी. वि. सोवनी, १९५१,
आकार ९" × ५३/४", पानें २८७, किंमत रु. ८·००

४. पंचवार्षिक योजनेचें समीक्षण :
लेखक : ध. रा. गाडगीळ, १९५१, आकार ९" × ५३/४", पानें ३१,
किंमत रु. ०·५०

५. महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना :
लेखक : वि. म. दांडेकर व म. भा. जगताप, १९५७,
आकार ९" × ५३/४", पानें १०२, किंमत रु. २·५०

६. महाराष्ट्र कृषिजीवन : सांख्यिकीय दर्शन :
१९६१, आकार ९" × १११/२", पानें २१२, किंमत रु. १५·००

७. पुणें शहरांतील महाजन व नगरशेठ :
लेखक : ध. रा. गाडगीळ, १९६२, आकार ५" × ७१/२",
पानें २९, किंमत रु. १·००

८. नागाव : आर्थिक व सामाजिक जीवन (१७६०-१८४०) :
लेखक : शां. वि. आवळसकर, १९६२,
आकार १०" × ६३/४", पानें १५२, किंमत रु. १०·००

९. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व
पंचायती राज्य – परिसंवाद (१९६२) :
१९६३, आकार ९" × ५३/४", पानें २८७, किंमत ६·००

आगामी प्रकाशन :

सहा ग्रामीण विभागांची जनसांख्यिकीय पाहणी :
लेखिका : कुमुदिनी दांडेकर

मराठी प्रकाशन ६ वें—

## महाराष्ट्र कृषिजीवन-सांख्यिकीय दर्शन

शेतकी खात्याच्या अगर इतर सरकारी अहवालांतून शेतीविषयक जी आंकडेवार माहिती प्रसिद्ध होते ती बहुतेक जिल्हा पातळीपर्यंतची असते. नियोजनाचा ज्यावेळीं खालपासून आपण विचार करूं लागतो त्यावेळीं शेतीच्या विविध अंगोपांगांची तपशीलवार व आंकडेवार माहिती यापेक्षा खालच्या पातळांवर जाणून घेणें अवश्य होतें. नियोजकांची ही गरज कांही प्रमाणांत पुरी व्हावी या हेतूने या पुस्तकांत शेतीविषयक व अन्य संबंधित बाबींसंबंधाने तालुका पातळीपर्यंतची आंकडेवार माहिती दिलेली आहे.

शेतीचें क्षेत्र, लोकसंख्या, पाणीपुरवठ्याची साधनें, बागायत क्षेत्र व पिकें, बाजारपेठा, वाहतुकीचे मार्ग व साधनें, पशुधन, जंगल-खनिज संपत्ती, शेतीची अवजारें इत्यादि गोष्टींची तालुकावार आंकडेवार माहिती या पुस्तकांत दिलेली आहे. आणि विशेष म्हणजे ही सर्व माहिती अनेक नकाशांत चित्रित केली असून प्रत्येक जिल्ह्याचा वेगळा व सर्व महाराष्ट्राचा एक असे एकूण २६ नकाशे या पुस्तकांत दिलेले आहेत.

किंमत रु. १५

मराठी प्रकाशन ८ वें—

## नागाव

उत्तर कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावरील बागायत गावांपैकी एका गावचा नागाव—इ. स. १७६० ते १८४० या कालखंडांतील आर्थिक व सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे. प्रकाशित ऐतिहासिक साधनांबरोबरच अप्रकाशित साधनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला आहे. पुस्तकाचें स्वरूप संकलनात्मक व संशोधनात्मक असे उभयविध आहे.

आरंभीं राजकीय इतिहास पार्श्वभूमीदाखल सांगून गावची आर्थिक व सामाजिक परिस्थिति मांडली आहे. ऐतिहासिक काळांतील आर्थिक व सामाजिक ग्रामीण जीवनाचा एक अभ्यास या दृष्टीने या साधनग्रंथाचें महत्त्व आहे.

लेखक : शां. वि. आवळसकर — किंमत रु. १०

मराठी प्रकाशन ९ वें—

## महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायती राज्य – परिसंवाद (१९६२)

लोकशाही शासनाचें विकेंद्रीकरण ही थोडीफार आपणांस नवीनच गोष्ट असल्यामुळे त्यामागची तात्त्विक बैठक लोकांनी नीटपणें समजून घेणें अवश्य आहे. समाजकार्यांत आस्थेने लक्ष घालणाऱ्या तसेंच ग्रामीण जनतेचें पुढारीपण करणाऱ्या कार्यकर्त्यांची तसेंच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या कायद्याचाहि अभ्यास करणाऱ्यांची गरज हें पुस्तक बऱ्याच प्रमाणांत पुरी पाडूं शकेल अशी अपेक्षा आहे.

किंमत रु. ६